नि. ६२५८



श्यामचा जीवनविकास

साने गुरुजी

श्यामचा जीवनविकास

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

श्यामचा जीवनविकास : साने गुरुजी

प्रकाशक
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

अक्षरजुळणी
रावजी देसाई

मुखपृष्ठ
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

आवृत्ती
१५ ऑगस्ट, २०११

किंमत
रुपये १४०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

दोन शब्द...

जीवनविकास अर्थात् श्याम खंड ३ रा प्रथमत: मन्वंतर मासिकातून प्रसिद्ध झाला. तो पुन्हा पुस्तकरूपाने एकत्र करीत आहे.

श्री. साने गुरुजी यांच्या लिखाणात जिवंतपणा आहे. सद्भावनांचा व उच्च विचारांचा वर्षाव आहे. ज्ञानाचा नंदादीप अखंड तेवत असावा ही त्यांची आवडती सद्भावना. या ज्ञाननंदादीपाच्या प्रशांत प्रकाशात सर्व धर्माच्या अशिक्षित सुशिक्षितांनी अज्ञानाचा नायनाट करून आपापल्या जीवनाचा विकास करून घेतला पाहिजे. त्याकरिता आनंद, सहकार्य, सेवा, बंधुभाव यांची वाढ करणारी चळवळ झाली पाहिजे. माणुसकीचा मार्ग दाखविणारी संस्कृती निर्माण झाली पाहिजे, द्वेषाचा नायनाट होऊन जातीय वाद हटले पाहिजेत व निर्मळ संघटना झाली पाहिजे. हीच त्यांची इच्छा.

पण ही संघटना होणार केव्हा? कधी तो सुदिन उगवणार? हीच विवंचना त्यांना सारखी असते. या दिव्याकरिता ते रात्रंदिवस भटकत असतात. प्रचार करीत असतात. ज्ञानाची ज्योत हाती घेऊन समतेच्या मंत्राची दीक्षा देत असतात. 'समता' हाच मंत्र जपत असतात. त्यांचे हृदय भावनाप्रधान असून आपत्तीला ठोकरणारे कठोरही आहे याचेच यथायोग्य प्रतिबिंब या पुस्तकात दिसून येईल.

आणि त्यांच्या कडक टीकेमुळे, स्पष्ट व निर्भीड मतप्रचारामुळे या पुस्तकाची प्रथमावृत्ती मुंबई सरकारने आक्षिप्त ठरविली व सर्व प्रती जप्त केल्या. ही बंदी काँग्रेस सरकारने नुकतीच उठविली. त्यामुळेच या पुस्तकाचे आम्हाला पुनर्मुद्रण करून वाचकांचे हाती देता आले.

+++

अनुक्रमणिका

१. शाळेतील शेवटचे वर्ष ७

२. संस्कृती म्हणजे काय? १५

३. मॅट्रिकची परीक्षा व मालणचे लग्न २१

४. दादाचा संसार सुरू झाला २६

५. एक अमर प्रसंग ३५

६. स्वयंसेवक ४२

७. स्वराज्याच्या मंत्राचे ऋषी ५०

८. मानमोडी ५६

९. मनाची ओढाताण ६७

१०. क्षुद्र मन ७६

११. सत्याग्रह ८५

१२. दवाखान्यात ९०

१३. धाकट्या भावाचे पत्र ९९

१४. इंग्रजीचे वेड १०९

१५. यमुताई ११७

१६. बालवीर चळवळ १२६

१७. निष्ठुर श्याम १३६

+++

शाळेतील शेवटचे वर्ष

हिंदुस्थानात पुन्हा महान् सत्याग्रह संग्राम सुरू होण्याची चिन्हे दिसत होती. श्यामच्या खिन्न चेहऱ्यावर पुन्हा तेज चमकू लागले. तो आश्रमातील सवंगड्यांस म्हणाला, ''आपला देश आता स्वतंत्र झाल्याखेरीज राहणार नाही. या स्वातंत्र्ययुद्धात, या अपूर्व अशा अहिंसक समरात माझा देह पडो एवढीच माझी इच्छा आहे. डोक्यावर लाठी पडो, छातीत गोळी घुसो, हा देह कृतार्थ होवो. देशासाठी मरणाचे डोहाळे मला होत आहेत.''

''श्याम, हा कदाचित् शेवटचा स्वातंत्र्यसंग्राम होईल. महात्मा गांधी मागे इंग्लंडमध्ये वाटोळ्या परिषदेचे वेळी म्हणाले होते, 'पुन्हा केव्हातरी माझ्या आयुष्याच्या सायंसमयी महान् स्वातंत्र्यसंग्राम मी करीन. त्या वेळेस ६० हजार लोक बरोबर घेऊन नाही उभा राहणार तर ६० लाख लोक बरोबर घेऊन नि:शस्त्र संगरार्थ उभा राहीन.'' महापुरुषाचे ते महान् शब्द खोटे कसे होतील? लाखो लोक सिद्ध आहेत. किसान, कामगार, विद्यार्थी, स्त्रीपुरुष सर्व सिद्ध आहेत. सत्याग्रहींची नोंद होत आहे. काल गोविंदा व मी नांदेडला गेलो. तेथे ५० लोकांनी नावे दिली. २० भगिनींनी दिली.

उद्या लढा प्रत्यक्ष सुरू झाला तर आणखीच जनता उचंबळेल. श्याम, तू अशक्त व आजारी. एकदा झगडा सुरू झाला म्हणजे आपण कोण कोठे जाऊ, कोणाला माहीत? आपण मग केव्हा परत भेटू ते देव जाणे. श्याम, तू रागावशील परंतु सांगतो. तुझ्या उरल्यासुरल्या काही आठवणी सांगून टाक एकदा. पुष्कळच उरले असेल ते देऊन टाक. सांग सारे भराभर. कर जीवनाचा सिंधू आमच्यासमोर रिकामा. तू म्हणशील, ही वेळ गतकाळाच्या स्मरणाची नाही. ही वेळ भारताच्या उद्धरणाची आहे. प्रत्येक क्षण आता प्रचारात गेला पाहिजे. सर्वत्र पवित्र परंतु तेजस्वी, उचंबळणारे परंतु संयमी स्वातंत्र्यप्रेमाचे वातावरण निर्मिले पाहिजे. ते आपण करूच; परंतु मिळेल थोडासा वेळ त्यात तुझे सारे सांग. श्याम, नाही म्हणू नकोस. मी हाक मारतो सर्वांना. बोलावू?'' सुभानने विचारले.

श्याम स्तब्ध होता. त्याचे लक्ष नव्हते. ''बोलवू का श्याम? आता वेळ नको. बोलत का नाहीस? रागावलास?'' त्याने पुन्हा विचारले.

''सुभान, तुझ्यावर मी कधी तरी रागावेन का? जा, सर्वांना बोलाव. माझी इच्छा मी कधीच मारली. आता तुमची इच्छा ती माझी इच्छा. तुमच्या इच्छाशक्तीने तर जगत आहे मी.'' श्याम म्हणाला.

सुभानने सर्व मित्रांना हाक मारली. इतरही काही प्रेमी मंडळी जमली. सहृदय श्रोते गोळा झाले. श्यामच्या डोळ्यांसमोर भूतकाळ गोळा होत होता. त्याने आरंभ केला.

''माझी आई गेली. तिच्या चिरवियोगाचे तीव्र दु:खही हळूहळू गेले. डोळ्यांसमोर आता मॅट्रिकची परीक्षा होती. अभ्यास केला पाहिजे होता. आई गेली तरी वडील होते. आपली मुले मोठी होतील व आपली खाली झालेली मान वर होईल या आशेवर ते जगत होते. आशा म्हणजे अमर रसायन. आशा म्हणजे निराधारांचा आधार. आशा म्हणजेच परमेश्वर. जीवनातून आशा जर अस्तंगत झाली तर जीवन भेसूर व भयाण वाटेल. आशा म्हणजे संगीत, आशा म्हणजे प्रकाश.

मी व माझा मित्र राम इंग्रजी ७ वीत होतो परंतु एका तुकडीत नव्हतो. राम हुशार मुलांच्या तुकडीत होता. त्या तुकडीला प्राध्यापक शिकवायला येत. नूतन मराठी विद्यालयाचे महाविद्यालय त्या वेळेस नुकतेच सुरू झाले होते. त्याचे त्या वेळचे नाव ''न्यू पूना कॉलेज'' असे होते. प्राध्यापक तुळपुळे, घारपुरे, फडके, करमरकर वगैरे

रामच्या वर्गाला शिकवीत. खरे म्हटले तर कमी बुद्धिमान् मुलास अधिक लायक शिक्षक हवेत. मृदू काळ्याभोर जमिनीला थोडा पाऊस पुरतो. दगडाळ भूमीला मुसळधार पावसाची जरूर असते; परंतु जगात सारे उलटे. बुद्धी बुद्धीकडे जाते, पैसा पैशाकडे जातो. अशाने जग कसे सुधारणार! प्रकाशाने अंधाराकडे जावे, बुद्धीने बुद्धिमंतांकडे जावे, धनाने दरिद्र्यांकडे जावे. मला थॉमस पेनच्या एका वाक्याची आठवण होते. थॉमस पेन हा मानवी स्वातंत्र्यासाठी झगडणारा एक वीर होता. फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली. त्या वेळेस काही अत्याचार झाले. इंग्लंडमध्ये बर्क म्हणून एक महान् पंडित त्या वेळेस होता. त्याने या क्रांतीवर एक ग्रंथ लिहिला. क्रांतीला उद्देशून काही निबंध लिहिले. बर्क बहुजन समाजाला तुच्छ मानी. थॉमस् पेनने बर्कच्या ग्रंथाला उत्तर म्हणून ''मानवी हक्क'' पुस्तक लिहिले. थॉमस् पेनचे नाव त्या वेळेस युरोप-अमेरिकेत गाजले. अमेरिकेत त्याच वेळेस बेंजामिन फ्रँकलिन म्हणून एक थोर शास्त्रज्ञ व देशभक्त झाला. एकदा त्याची व थॉमस् पेनची गाठ पडली. त्या वेळेस फ्रँकलिन म्हणाला, "Where liberty is, there is my country. जेथे स्वातंत्र्य असेल, तेथे माझा देश.'' परंतु पेन म्हणाला, Where is not liberty, there mine जेथे स्वातंत्र्य नसेल तेथे माझा देश.'' थॉमस पेनच्या या उद्‌गारांत उदार भावना आहे. जेथे जेथे पद्‌दलित लोक असतील, दास्यात खितपत पडलेले लोक असतील, तेथे तेथे तो गेला असता, त्यांच्यासाठी मेला असता. जेथे दुःख आहे, दास्य आहे, दारिद्र्य आहे, तेथे जाऊन घर करणारा, त्या सर्व अन्यायांचा परिहार करू पाहणारा असा हा थॉमस पेन होता. हे उद्‌गार आपण ध्यानी धरूया. जेथे प्रकाश आहे तेथेच प्रकाश घेऊन नका जाऊ. जेवलेल्याला जेवण देण्याने अजीर्ण मात्र व्हावयाचे.

असो. आम्हाला रामच्या वर्गाचा हेवा वाटे; परंतु हेवा करून काय मिळणार होते? त्यांना ते प्राध्यापक तुळंपुळे वर्गावर येताच आधी दहा मिनिटे जगातील वार्ता सांगत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडी सांगत. आज या क्षणी जग कोठे आहे ते मुलांना कळले पाहिजे. शाळांतून वार्ताफलक पाहिजेत. त्यावर प्रत्यही वर्तमानपत्रातील महत्त्वाच्या वार्ता लिहून ठेवल्या पाहिजेत. नाहीतर शाळेत मुले शिकत असतात; परंतु ते वर्तमानकाळापासून दूर असतात. कंपनी सरकारच्या, गव्हर्नरांच्या याद्या त्यांना पाठ असतात. त्या पवित्र नावांची स्तोत्रे करून मुलांना शिकवितात. ती पवित्र नावे माझ्या ओठांवर नाचतात; परंतु माझ्या राष्ट्राला मुक्त करू पाहणाऱ्यांची नावे मला माहीत

नसतात. राष्ट्राच्या बहुविध कार्यक्षेत्रांत निरनिराळ्या प्रांतांत कितीतरी थोर पुरुष कामे करीत आहेत; परंतु विद्यार्थ्यांना ना दाद ना फिर्याद.

एकदा पुण्याच्या एका टोलेजंग हवेलीतील शाळेत जाणारा एक विद्यार्थी मला भेटला होता. तो होता इंग्रजी ७ वीत. तो मला म्हणाला, ''महात्मा गांधी हल्ली सरहद्द प्रांतातील खेड्यांतून पायी हिंडत आहेत.'' मी त्याला म्हटले, ''अरे महात्मा गांधी तर जुहूला आहेत. ते आजारी आहेत. तेथे विश्रांती घेत आहेत.'' मी त्याला पुन्हा म्हटले, ''अरे ते सरहद्द गांधी असतील. ते हल्ली हिंडत आहेत.'' तो मला म्हणाला, ''हे सरहद्द गांधी काय प्रकरण आहे?'' त्याचे ते अज्ञान पाहून मला वाईट वाटले.

किती शरमेची गोष्ट! आपल्या या मृत राष्ट्राला जीवनकळा देणारा एक महापुरुष अहोरात्र श्रमून श्रमून आजारी पडून राहिला आहे, ही वार्ता आम्हाला माहीत नाही! आणि ज्या खैबरखिंडीतून मुसलमानांच्या लाटा आल्या, त्याच बाजूला त्या धिप्पाड पठाण बंधूंत अहिंसेचे उपनिषद गाणारा, निर्मळ देशभक्तीचा समुद्र उचंबळविणारा तो महापुरुष, ते सरहद्द गांधी, ते खान अब्दुल गफारखान, तेही आम्हास माहीत नाहीत! ही नावे माहीत नाहीत मग कोणाची ठाऊक असणार? थोर राजकीय पुढाऱ्यांची नावे माहीत नाहीत, मग इतरांसंबंधी बोलणेच नको. इक्बाल माहीत नाहीत, नंदलाल माहीत नाहीत, न्हानालाल माहीत नाहीत, गिजुभाई माहीत नाहीत; भारताची भारताला ओळख नाही. आपण स्वत:ला पारखे झालो आहोत. जो स्वत:ला पारखा झाला त्याला सारे पारखे होतात. त्याला वैभव, स्वातंत्र्य सारे पारखे होते.

परंतु काळ बदलत आहे. आज विद्यार्थ्यांत अजूनही स्वदेशाचे पूर्णपणे भान नसले तरी ते भान येत आहे. मी शिकत होतो तेव्हा तर फारच अज्ञान होते. आजच्यासारखेच महायुद्ध त्या वेळेस चालले होते. आमच्या वर्गातून युद्धाला मदत गोळा करण्यात आली. सर्व हिंदुस्थानभर शाळाशाळांतून वर्गणी गोळा करण्यात आली. काही शाळांतील विद्यार्थ्यांनी नाटके केली व त्यांचे उत्पन्न त्या युद्धाला दिले गेले. या भिकारी श्यामलाही दोन आणे द्यावे लागले. परंतु आजच्या महायुद्धाला कोणता विद्यार्थी मुकाट्याने मदत देईल? आज विद्यार्थ्यांच्या संघटना आहेत. विद्यार्थी संघ आहेत. त्यांची अभ्यास मंडळे आहेत. साम्राज्यवाद काय, साम्यवाद काय त्यांना कळू लागले आहे.

विद्यार्थी हा आधी मनुष्य आहे व मग विद्यार्थी आहे. आज मी विद्यार्थी आहे, मी मुकाट्याने शिकावे, संप पुकारू नये, विरोध दाखवू नये असे कोणी म्हणेल तर ते

हास्यास्पद आहे. मी विद्यार्थी असलो म्हणून काय झाले? मी का मानवधर्माला काडी लावावी? शाळांतून स्वातंत्र्याचे लढे शिकविले जातात, धडे पढविले जातात; परंतु आजच्या स्वातंत्र्याच्या लढ्यापासून त्याला सदैव दूर राखू पाहतात. असले संस्कारहीन शिक्षण काय किमतीचे? अमेरिकेतील निसर्गप्रेमी व स्वातंत्र्यप्रेमी थोरो एके ठिकाणी लिहितो, ''मुलगा अर्थशास्त्र शिकत असतो व घरी बाप कर्जबाजारी होत असतो.'' शिक्षणावर ही टीका आहे, यथार्थ टीका आहे. जीवनाशी फारकत करणारे शिक्षण फेकून दिले पाहिजे. एकदा आचार्य पूज्य विनोबाजी आपला एक अनुभव सांगताना म्हणाले, ''आम्ही बडोद्याला शाळेत शिकत होतो. शिवजयंतीचा दिवस आला. आम्ही सर्वांनी लांब जंगलात डोंगराच्या पायथ्याशी कोठेतरी शिवजयंती साजरी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आम्ही केले. शाळेला बुट्टी दिले. दुसरे दिवशी शिक्षकांनी विचारले, ''काल कोठे होता?'' मुलांनी उत्तर दिले, ''शिवजयंती साजरी करण्यासाठी गेलो होतो.'' शिक्षक म्हणाले, ''शाळेतच एक तास सुट्टी देऊन साजरी करता आली असती.'' मुले म्हणाली, ''बंधनाच्या दिवाणखान्यात शिवजयंती साजरी होत नसते. रानात, मोकळ्या आकाशाखाली, पहाडाच्या मुक्या अध्यक्षतेखाली शिवाजीमहाराजांची जयंती साजरी करण्यात अर्थ आहे.'' मुलांना दंड झाला. त्यांनी खिशात पैसे आणलेच होते. ते भराभर टेबलाकडे फेकले. त्या मुलांना शिवजयंती समजली. ते खरे शिक्षण होते. त्याचा जीवनावर परिणाम करणारा संस्कार होत होता; परंतु आम्ही नूतन मराठीतील त्या वेळची मुले. आम्ही त्या युद्धाला वर्गण्या दिल्या. कोणीही विरोध केला नाही.

आमच्या तुकडीला प्राध्यापक शिकवायला नसले तरी चांगले शिक्षक होते. आम्हाला श्री. लक्ष्मणशास्त्री लेले संस्कृत शिकवीत. फारच सुंदर शिकवीत. शाकुंतलातील एखाद्या श्लोकातच सारा तास जाई. अभिनय करून ते शिकवीत. लेलेशास्त्री रसिक होते. कधी कधी ते फार संतापत. उच्चार चुकलेला त्यांना सहन होत नसे. एकदा संस्कृत संख्यावाचके ते शिकवीत होते. एका मुलाने 'पंच' असे म्हटले. त्याबरोबर ते रागावले. ''पंच पंच काय म्हणता? पञ्च म्हणा. नाहीतर दुसरीत जाऊन बसा.'' स्वच्छतेचे व व्यवस्थेचे ते फार भोक्ते. शिस्त म्हणजे त्यांचा प्राण. वर्गात एकदा संस्कृत बाजूला राहिले व शिस्तीवरच प्रवचन ऐकावे लागले. कधी कधी वर्गात मौज होई. एकदा लेलेशास्त्री रागावूनच वर्गावर आले होते.

''मॉनिटर, अभ्यास काय आहे दिलेला?'' त्यांनी एकदम विचारले.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

आमचा वर्गनायक मोठा गमत्या होता. त्याचे नाव होते श्रीनिवास. त्याला मुले म्हणत शून्या.

''अभ्यास दिलेला नाही.'' तो म्हणाला.

''दिलेला नाही म्हणजे? चावटपणा काय चालवला आहे? सांग, कोणता होता दिलेला अभ्यास?'' त्यांचा चेहरा लाल झाला.

''तुम्ही मागच्या तासाला अभ्यास दिला नाही. श्लोक गुणगुणतच निघून गेलात.'' आमचा वर्गनायक शांतपणे म्हणाला.

''मग तुम्ही मला आठवण नये का करू? मॉनिटर कशाला झालात? राजीनामा द्या जागेचा. नालायक माणसे काय कामाची? योग्य जागी योग्य माणूस पाहिजे. त्याने काम चोख बजावले पाहिजे. हसता काय? बसा खाली.'' असे म्हणून ते थोडा वेळ स्तब्ध राहिले व मग अभ्यास सुरू झाला.

लेलेशास्त्र्यांचा एक मुलगा उत्कृष्ट क्रिकेट खेळणारा होता. तो पंधरा वर्षांचाही नव्हता. तरीही त्याने धावांचे शतक काढावे. त्या वेळेस क्रिकेटच्या सामन्यांचा मोसम होता. एके दिवशी लेलेशास्त्री म्हणाले, ''मुलांना उन्हात खेळावे लागते. त्यांची नीट काळजी घेतली पाहिजे. क्रिकेटचा खेळ म्हणजे शेवटी नशिबाचा खेळ. नावाजलेले खेळाडू भोपळा काढतात तर कोणी एखादा सटरफटर येतो व शंभरी काढतो. एकदा पुण्यात जगद्विख्यात क्रिकेटपटू रणजितसिंग येणार होते. ते खेळणार होते. तो दिवस आला. तिकीट होते. रणजितसिंगांचा खेळ पाहावयास सारे पुणे लोटले. टाळ्यांच्या गगनभेदी गजरात रणजितसिंग खेळावयास आले; परंतु काय आश्चर्य! पहिल्याच चेंडूला ते बळी पडले. लोकांच्या निराशेची कल्पना करा.''

प्रत्येकाची काहीना काहीतरी बोलण्यातील लकब असते. लेलेशास्त्री ''समजले की नाही'' हा शब्दप्रयोग पुन्हा पुन्हा करीत. महाराष्ट्राला चटका लावून अल्प वयात मरण पावलेले अमर कीर्तीचे गडकरी, त्यांची प्रथम पुण्यतिथी एकदा होती. किर्लोस्कर नाटकगृहात सभा होती. लेलेशास्त्रीही एक वक्ते होते. त्यांची वेळ आली. ती लाल रंगाची पगडी. ते स्वच्छ गळ्याभोवती असलेले उपरणे, ते बाकदार नाक, लाल ओठ, प्रसन्न व रसिक मुद्रा असे लेलेशास्त्री उभे राहिले. सुंदर भाषण चालले होते; परंतु ''समजले की नाही'' शब्दप्रयोग पुन्हा पुन्हा येई. ते शब्द येताच हशा होई. शास्त्रीबुवांच्याही ती गोष्ट लक्षात आली. ते म्हणाले, ''मी शिक्षक आहे. शिक्षकाला

मुलांना समजले की नाही हे पुन्हा पुन्हा विचारावे लागते. शिक्षकाचा माझा धर्म मी कोठेही गेलो तरी प्रकट व्हावाच एवढे म्हणून पुन्हा ''समजले की नाही'' हे शब्द त्यांनी एकदम उच्चारिले आणि प्रचंड हशा पिकला. मनुष्य म्हणजे सवयीचा गड्डा. सवय लागली म्हणजे प्राणांतीही जात नाही.

लेलेशास्त्री शास्त्री होते. त्यांच्या साध्या बोलण्यातही संस्कृत शब्द अधिक यावयाचे. एकदा तर एक गंमत मी पाहिली. आमच्या शाळेच्या मध्यभागी बाग होती. काही लतामंडप होते. कमानीवरून सुंदर फुलवेल सोडलेले होते. एका अगदी लहान मुलाने फुले तोडली. तिकडून लेलेशास्त्री येत होते. त्यांनी ते पाहिले. ते त्या मुलाला म्हणाले, ''काय रे बाळ, त्या लतेची सौंदर्यहानी नाही का झाली?'' मी ते शब्द ऐकले व मला हसू आले. तो लहान मुलगा काही समजले नाही अशा मुद्रेने बघत होता.

दुसरे एक भिडे नावाचे शिक्षक आम्हाला मराठीचे इंग्रजीत भाषांतर शिकवायला येत. ते गोड गोड पदार्थांची वाक्ये घालायचे. ''त्या मुलाने बरणीतून मुरंबा काढला.'' असली वाक्ये असावयाची. एकेक शब्द स्पष्ट व शांतपणे ते उच्चारीत. सकाळची शाळा असली म्हणजे त्यांना घरून चहा यायचा. ते वर्गातून बाहेर जात व चहा घेऊन परत येत. शाळेची सरकारी चाचणी ज्या वेळेस असे त्या वेळेस हे भिडे मास्तर आपली पगडी रुमालात गुंडाळून बरोबर घेऊन येत असत. ते वर्गात नेहमी टोपी घालून बसत. इन्स्पेक्टर वर्गात येताच ते शांतपणे टोपी काढीत व रुमालातील पगडी काढून डोक्यावर चढवीत! आम्हाला हसू येई व इन्स्पेक्टरांचे तोंडही जरा हसे; परंतु भिडे मास्तर शांत गंभीर असत. जणू काही झालेच नाही.

इंग्रजी गद्य व्ही. आर. जोशी शिकवीत. ते मोठे रुबाबदार दिसत. आम्ही त्यांना रोमन सिनेटर म्हणत असू. ते सुधारक पत्र काही दिवस चालवीत होते. त्यांना शिकवताना मध्येच खोकला आला म्हणजे आम्हाला भीती वाटे. ते गुदमरून जात अगदी. माझ्याजवळ इंग्रजी गद्याचे नेमलेले पुस्तक नव्हते. रामचे व माझे मिळून एकच पुस्तक होते. रामचे पुस्तक मी घरी वाचत असे. वर्गात दुसऱ्याच्या पुस्तकाकडे बघे. एके दिवशी ते मला वर्गाबाहेर म्हणाले, ''तुमच्याजवळ पुस्तक नाही वाटते?''

''नाही.''

''मग मी घेऊन देऊ का?''

''नको. माझ्या मित्राचे मी घरी वाचतो.''

''संकोच नका करू. हवे असेल तर मी देईन.''

''जरूर पडली तर मी सांगेन.''

शिक्षकाने विद्यार्थ्याविषयी सहानुभूती दाखवली तर विद्यार्थ्याला किती आनंद होतो! ते शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनात अमर होतात. परंतु आजच्या प्रचंड शाळांतून विद्यार्थ्यांच्या जीवनाविषयी शिक्षकाला अज्ञान असते. गुरू व शिष्य परस्परांपासून दूरच राहतात. एकमेकांच्या जीवनात कोणी शिरत नाही. शिक्षक म्हणतात, ''आमच्या हाताखालून हजारो विद्यार्थी गेले.'' त्यांच्या हाताखालून गेले, हातात एकही सापडला नाही. एकाही विद्यार्थ्यांशी त्यांचा चिरसंबंध जडला नाही. असे हे शिक्षण आहे. भावनाहीन, संस्कारहीन शिक्षण!

हुशार मुलांच्या तुकडीचे एक प्राध्यापक फडके आमच्याही वाट्यास आले होते. महाराष्ट्रातील प्रतिभावान प्रख्यात ललितकलालेखक फडके तेच हे. ते आम्हाला इंग्रजी कवितांचे सोप्या भाषेत गद्य रूपांतर करणे, इंग्रजी गद्य उताऱ्यांचे इंग्रजीतच सारांश सांगणे वगैरे प्रकार शिकवीत. ते सहृदय वृत्तीचे असल्यामुळे त्यांच्या शिकवण्यात मला रस वाटे. एखादे वेळेस ते फार रागावत. वयाने ते मोठे नव्हते. असतील २५-२६ वर्षांचे. त्यांनी आमच्या वर्गनायकाच्या तोंडावर आपल्या हातातील पुस्तक फेकून मारले आणि त्यालाच ते परत आणून देण्यास सांगितले. परंतु त्यांची आठवण मला विशेष करून का बरे राहिली आहे?

एके दिवशी मला ताप आला होता. मधून मधून मला ताप येई; परंतु तो मी तसाच रेटीत नेत असे. फडके यांचा तास संपला. ते मुलांच्या वह्या घेत होते. मी माझी वही देऊन बाहेर गेलो. मी खिन्नपणे उभा होतो. दुःखाने उभा होतो. अंग दुःखत होते. कपाळ तापले होते. इतक्यात फडके बाहेर आले.

''काय रे येथे का उभा? असा का खिन्न चेहरा? बरे नाही का वाटत तुला?'' ते म्हणाले.

मी काही बोललो नाही. त्यांनी माझा हात हातात घेतला.

''अरे तुला ताप आला आहे. घरी जा. प्रकृतीला जप.'' असे म्हणून ते गेले.

त्या प्रेमळ शब्दांनी जणू मला औषध मिळाले. दोन प्रेमळ शब्द; परंतु त्यात केवढे सामर्थ्य असते!

✦✦✦

संस्कृती म्हणजे काय?

मी रामकडे राहात होतो. त्या भावंडांत मीही वाढत होतो. रामची आई माझीही आईच झाली होती. मी रात्री खरोखरचा जेवून आलो असलो तरीही त्या जर जेवत असल्या तर म्हणायच्या, ''श्याम, ये थोडी भाकर उरते आहे, टाक खाऊन. ही बघ पिठल्याची कढई. तुला आवडते ना? घे खरडून.''

रामची आई हालअपेष्टांत वाढली होती. रामचे वडील कठोर स्वभावाचे होते. ते अती निष्ठुर होते. त्यांनी पत्नीला प्रेम कधी दिले नाही. मुलांना माया दाखविली नाही. रामच्या आईला बारा बारा वर्षांत त्यांनी माहेरी पाठविली नाही. लग्न लागून एकदा जी ती माऊली सासरी आली, ती परत माहेरी गेली नाही. त्यांचा पत्नीवर कधी विश्वास नसे; सारे मोजून मापून द्यावयाचे. काड्याच्या पेटीतील काड्याही मोजून द्यावयाचे. काड्याची पेटी इतके दिवस पुरलीच पाहिजे असे सांगायचे. जर ती पेटी लवकर संपली तर रागे भरत. रामच्या आईला विश्रांती माहीत नसे, सुखसंवाद माहीत नसे. नऊ महिने भरत आले तरी सारे काम करावे लागे. बाळंतपणातही घरात कोणी नसे. दहा दिवस होताच पुन्हा सारे बघावे लागे. वर्षानुवर्षे असे हे जीवन चालले होते. कोठला आनंद,

कोठला विरंगुळा? मुले तर वडील घरात येताच थरथरत. एकदा मारू लागले म्हणजे मुलांना रक्तबंबाळ करीत. माता मध्ये पडू शकत नसे. पित्याचा मार संपला म्हणजे माता मुलांच्या जखमांना मलम लावी. तेही चोरून लावावे लागे.

परंतु मरताना रामच्या वडिलांना पश्चात्ताप झाला. आपण आपल्या पत्नीला कसे तरवारीच्या धारेवर वागविले, कसा पदोपदी अविश्वास दाखविला, याचे त्यांना वाईट वाटले. शेवटचा क्षण गोड झाला. ते अश्रूपूर्ण नयनांनी पत्नीला म्हणाले,

''मी तुला दुखविले. तुझ्यावर कधी विश्वास ठेवला नाही. सुख दिले नाही. तू निर्मळ, निर्दोष आहेस. मी तुला आगीत घातले. तू सोने ठरलीस. थोर आहेस तू.''

पतीचे हे शेवटचे शब्द म्हणजे रामच्या आईची पुंजी होती. साऱ्या जीवनात जे मिळाले नाही ते पतीच्या मरणप्रसंगी मिळाले. पतीने मरता मरता अमृताचा घोट दिला. एखादे वेळेस तो शेवटचा प्रसंग सांगताना ती माउली गहिवरे व मलाही भरून येत असे.

राम चौथीत असतानाच त्याचे वडील वारले होते. रामचे वडील गेले परंतु त्यांनी काही पैसे शिल्लक ठेवले होते. आगपेटीतील काड्या मोजून त्यांनी जी काटकसर केली ती मुलांच्या शिक्षणाला पुढे उपयोगी पडली. त्या शिलकेतून कष्टाळू माता मुलांना शिकवीत होती, माझ्यासारख्या गरिबांनाही आधार देत होती.

वडील वारले. त्यांचे दु:ख होतेच. मोठा आधार गेला; परंतु राम एकदा मला म्हणाला, ''श्याम, वडील वारल्याची तार जेव्हा आली, तेव्हा खरोखर पहिली भावना मनात आली ती ही की सुटलो एकदाचे आपण. या भावनेनंतर मग दु:ख झाले, सारे झाले. परंतु पहिली भावना छळातून सुटल्याची.''

रामची आई व ती सारी भावंडे आता मोकळेपणा अनुभवीत होती. जीवनात कधीही अनुभवता आला नाही असा मोठा मोकळेपणाचा आनंद आता मिळत होता. सुटी वगैरे असली म्हणजे रामची आई व आम्ही पत्ते खेळत बसू. कधी कधी कवड्यांनी खेळत असू. शेजारच्या मुलीही खेळायला येत. मी कधी कधी विनोदी गोष्टी सांगायचा. विशेषत: जावईबुवांच्या गोष्टी. त्यांनी खूप हशा पिके. दत्ताच्या देवळातून रात्री भजन संपल्यावर आम्ही घरी येत असू. घरी आल्यावर रात्र असली तरीही एखादे वेळेस आम्ही खेळत असू.

रामची बहीण मालण ही आता लग्नाची झाली होती. फार मोठी नव्हती. असेल चौदा वर्षांची. पुण्याच्या मेडिकल स्कूलमध्ये रामच्या घरच्या सर्वांच्या परिचयाचा एक

तरुण शिकत होता. त्या तरुणाच्या घरच्या सर्व मंडळींशी रामच्या घरच्यांचा घरोबा होता. तो तरुण रामच्या घरी येत असे. हळूहळू रामच्या आईच्या मनात आले की या तरुणालाच आपली मुलगी द्यावी. मालण कोणालाही आवडेल अशीच होती. तो तरुणही हुशार व तरतरीत होता. चांगला होता अनुरूप जोडा.

तो तरुण आमच्याबरोबर दत्ताच्या देवळात येई. तेथे मालण गाणी म्हणे. त्या गाण्यात गणपती शब्द येई. त्या तरुणाचे तेच नाव होते. चरण म्हणताना मालण लाजे व आम्हाला हसू येई. दत्ताच्या देवळातून रात्री १०-११ ला घरी यावे. मालणची आई एखादे वेळेस इतक्या रात्री थालीपीठ लावी. आई भाजणी कालवी, मी शेगडी पेटवी, हसत खेळत, गोष्टी सांगत थालीपीठ खाणे होई. तो तरुण निघून जाई. आम्ही मग झोपत असू.

मातेच्या देखरेखीखाली मालण व तो तरुण यांचे प्रेमवर्धन होत होते. रामच्या वडील भावाला आपली आई त्या तरुणाची इतकी बडदास्त ठेवते हे आवडत नसे. त्याला मातृहृदय काय माहीत? जावयाबद्दल, होणाऱ्या जावयाबद्दल मुलीच्या आईला काय वाटत असते ते मुलीची आईच जाणे! आपल्या मुलीला चांगला पती मिळावा याची मातेला चिंता असते. त्या तरुणाची बडदास्त ठेवून ती माता मुलीचे भविष्यकालीन जीवन सुखमय करू पाहात होती. मुलीचा भावी संसार भक्कम पायावर उभारू पाहात होती.

त्या तरुणाच्या घरी त्याची आई होती. वडील भाऊ होते. सर्वांत वडील असलेले भाऊ एकदा रामच्या घरी आले. आपल्या धाकट्या भावाची भावी वधू पाहण्यासाठी म्हणून जणू ते आले होते. रामच्या घरातील मोकळेपणा त्यांना मानवला नाही. घराचे कोंडवाडे करणारी संस्कृती त्यांना पाहिजे होती. आम्ही मुले खेळत असू. आमच्याबरोबर रामची आईही खेळे. त्या वेडजडाला हे सहन झाले नाही! त्या कर्मठाला हा अधर्म वाटला!

एके दिवशी स्वतःचा सनातन धर्म ते सांगू लागले. ''या थिल्लरपणाला काय म्हणावे? पत्ते काय ते खेळत बसतात, हसतात काय, खिदळतात काय? चालरीत कशी ती नाही. आईच अशी, मग मुलांना तरी कोण वळण लावणार? पती मेला, त्याचे जणू दुःख नाही. बरेच झाले जणू. खेळायला मोकळीक झाली. शेजारच्या पोरीही जमा करतात. वास्तविक यांनी आता देव देव करावा, वेळ मिळेल तो जप करण्यात दवडावा,

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

व्रतवैकल्ये, उपासतापास करावे; परंतु ते येथे काही नाही. कांदे खातील, लसूण खातील. सोवळे नाही ओवळे नाही. विधिनिषेध काडीचा नाही.कोण करील अशा घरातील मुलगी? ती आमच्या उद्या डोक्यावर बसेल. मुलगी कशीही असली तरी चालेल. तिला चालरीत असली म्हणजे झाले. तिने जास्त बोलता कामा नये, फाजील हसता कामा नये; परंतु येथील मुलगी अशी थोडीच असणार? मला हे चाळे बघवत नाहीत. माझी बहीण आहे. आहे चांगली मोठी; परंतु तिच्याही अजून मी थोबाडीत मारीन, जर हसेल तर. मर्यादा पाहिजे, येथे तर सारा पोरखेळ चालला आहे. काय म्हणावे या गोंधळाला. छट्! नको या घराण्याशी संबंध. ही मुलगी करायची असेल तर माझे घर बंद. या लग्नाला आम्ही कोणी येणार नाही. परंतु माझा भाऊ असा मूर्खपणा करणार नाही. तो माझे ऐकेल. दुसऱ्या मुलींना गेला तोटा. सुंदर अप्सरा मिळतील आणि हुंडा मिळेल. येथे कोठला हुंडा नि काय? माझ्या भावाला फसवणार आहेत ही सारी.''

तो महापुरुष असे बडबडत होता. त्या दिवशी त्या वेळेस मी घरी होतो. रामच्या आईला ऐकायला जाईल अशा हेतूने तो बोलत होता. मी तेथे वाचीत होतो. ते शब्द ऐकून माझा संताप वाढत होता.

''काय श्याम, खरे की नाही मी म्हणतो ते? तूही पत्ते खेळत बसतोस? तुलाही काही वाटत नाही ना?'' ते आढ्यतेने मला म्हणाले.

''मी काही बोललो नाही.''

''माझ्या घरी मी असे कधी चालू देणार नाही. थोबाडीन एकेकाला. घर आहे का बाजार आहे?'' ते पुन्हा बडबडले.

''मग का ज्या घरात सर्वांचा कोंडमारा होतो त्याला घर म्हणायचे? ते घर नसून तुरुंग होय. तुम्ही का घराचा तुरुंग करणार? त्यात पुरुषार्थ मानणार? आपल्या पोक्त बहिणीसही का तुमचे हात मारणार? आग लागो त्या हातांना? असे हात ज्याचे असतील, त्याला मी माणूस म्हणणार नाही. त्याला राक्षस म्हणेन. वाघ म्हणेन, लांडगा म्हणेन. पत्ते खेळणे म्हणजे का पाप? तुम्ही कोकणातून तमाशे बघता. वाटेल तो चावटपणा करता आणि घरात घडीभर बायका खेळल्या तर का अधर्म झाला? दिवसभर ज्या राबतात, त्यांना का थोडा आनंद नको? जो धर्म अशा आनंदाला मज्जाव करणार असेल तो धर्म नसून अधर्म आहे. तुमचा मला तिरस्कार वाटतो. तुम्ही बोलत

असताना कानात बोटे घालावीत. ऐकू नये असे मला वाटत होते. त्या थोर माउलीला तुम्ही नावे ठेवलीत. सारे जीवन म्हणजे जिचे सतीचे वाण होते, सर्व जीवनात मोकळा क्षण जिला मिळाला नाही, त्या कष्टाळू सतीला आज क्षणभर खेळावे, जरा हसावे असे वाटले तर तो का अधर्म? हे क्षणभर हसणे खेळणे पाहून अपार सहानुभूती हृदयात उत्पन्न व्हावी. मालणच्या आईने श्याम ये रे जरा खेळायला असे म्हटले की मी एकदम जातो. तिचे ते पूर्वजीवन माझ्या डोळ्यांसमोर उभे राहते. मी न खेळू जाईन तर ते महान् पाप होईल. अपार दु:खाने भरलेल्या जीवनात जाऊ दे थोडा मोकळेपणाचा आनंद. दुष्ट आहात तुम्ही. तुम्हाला हृदय नाही, भावना नाही. तुम्ही दगड आहात, पाषाण आहात. दुसऱ्याच्या जीवनाच्या अंतरंगात ज्याला पाहता येत नाही, तो माणूस नसून पशू. बोलू नका येथे असले अभद्र. ऐकवू नका आम्हा हे पाप.''

मी किती बोललो, मला भान राहिले नाही.

''भिकारड्या वारकऱ्या, तू कोण मला सांगणार बोलू नको म्हणून?'' तो म्हणाला.

''मी भिकारी असलो तरी या घरातील आहे. रामची आई माझीही जणू आईच आहे. तिला वेडेवाकडे बोलाल तर मी ते सहन करणार नाही. माणुसकी काही आहे की नाही तुम्हाला?'' मी म्हटले.

''श्याम, तू खाली ये.'' रामची आई जिन्यातून म्हणाली.

मी खाली गेलो. रामच्या आईच्या डोळ्यांतून पाणी येत होते. त्या पाण्यात किती भावना असतील, किती दु:खे असतील?

''पाहूया तुमच्या मुलीचे कसे लग्न होते ते.'' असे म्हणून ते तिरशिंगरावही निघून गेले.

माझ्या मित्रांनो, संस्कृतीच्या अशा विचित्र कल्पना पुष्कळांच्या असतात. जीवनात संयम हवा ही गोष्ट खरी; परंतु कोंडवाडा म्हणजे संयम नव्हे. जीवनात मोकळेपणाला वाव हवा. आनंदाला, हास्यखेळालाही काही स्थान हवे. खेळ हीही एक पवित्र वस्तू आहे. गुलामगिरी म्हणजे संयम नव्हे. मानव्याचा विकास करील ती खरी संस्कृती. माझ्या एका मैत्रिणीची आई शिकलेली होती. ती शिक्षकीण होती; परंतु पतीचा तिच्यावर विश्वास नसे. शाळा सुटताच तिने घरी आले पाहिजे. पतिराज घरी हातात घड्याळ घेऊन बसलेले असत. पाच मिनिटे उशीर झाला तरी विचारायचे.

पत्नीने एकटे बाहेर फिरायला नाही जाता कामा. रविवारी जर पती बाहेर गेला तर तो जाताना कुलूप लावून जात असे; सुशिक्षित पत्नीला घरी कोंडून ठेवीत असे. काय हे संसार? परंतु अशा संसारालाही भारतीय माता सारभूत करतात. विश्वासाने विश्वास वाढतो, प्रेमाने प्रेम वाढते. ज्या संसारात पतिपत्नीचा परस्परांवर विश्वास नाही, त्या संसारात सुख कसे पिकणार? संशय सर्व सुखाचा नाश करणारा आहे. संशयात्मा विनश्यति असे भगवंतांनी सांगून ठेवले आहे.

✦✦✦

मॅट्रिकची परीक्षा व मालणचे लग्न

परीक्षा जवळ येत चालली. रात्री आम्ही अभ्यास करीत नसू. रात्रीचा माझा वेळ मंदिरात जात असे. मंदिरातून घरी आल्यावरही रामतीर्थ, विवेकानंद वगैरेंची पुस्तकेच मी वाचीत बसत असे. काय अभ्यास होईल तो सकाळच्या वेळी. राम व मी संस्कृतचा अभ्यास तेवढा बरोबर करीत असू. आम्ही गीतेतील काही अध्याय पाठ केले. भर्तृहरीची नीती व वैराग्यशतके पाठ केली. सकाळी स्नानाला बसताच हे संस्कृत पाठांतर राम व मी सुरू करीत असू. बाणभट्टाच्या कादंबरीतीलही पहिली काही पाने आम्ही पाठ केली. कादंबरी लावताना मजा होत असे. एखादा कठीण संस्कृत शब्द आला की मी त्याचा प्रथम अंदाजाने अर्थ सांगत असे. राम मग कोशात बघे. माझा अर्थ खरा ठरे. तो मग रागावे. तो म्हणे, "तुला वास्तविक शब्दाचा अर्थ येत असतो. मग असे ढोंग का? असा अर्थ असेल असा संशय का दाखवतोस?" मी त्याला म्हणे, "मला निःसंशय अर्थ खरोखरच माहीत नसतो. माझा अंदाज खरा ठरतो, त्याला मी काय करू? मी मुळीच बोलू नको का?"

रविवारी राम एखादे सुंदर चित्र काढी. त्याच्या चित्राकडे आम्ही सारी बघत असू. चित्र काढून झाले म्हणजे तो ते आईला नेऊन दाखवी व म्हणे, ''बय, बघ कसे आहे चित्र.'' माता चित्राचे कौतुक करी. रामला समाधान वाटे. तो चित्र काढीत बसला म्हणजे मी समोरच्या देवळात जाऊन रामरक्षा म्हणत बसे. आमच्या वाड्यातील एक मुलगा माझ्याबरोबर रामरक्षा शिके. मी रामरक्षा म्हणण्यासाठी का बरे जात असे? त्या वेळेस का भक्तिप्रेम हृदयात असे? मी वाईट वाटून जात असे. आपणात कला नाही असे वाटून मी खिन्न होत असे. राम कधी कधी बांबूची बासरी वाजवी. तो बाहेर गेला व घरात कोणी नसले म्हणजे ती बासरी घेऊन मी वाजवू बघे. शेवटी माझी मला लाज वाटे व ती मी ठेवून देत असे. आपल्याला अमुक एक येत नाही म्हणून वाईट वाटे; परंतु ती गोष्ट आपणाला आली पाहिजे म्हणून त्या गोष्टीचा पिच्छा पुरविणे हा प्रयत्नवाद मजजवळ नव्हता. अलौकिकता म्हणजे ९९ टक्के प्रयत्न व एक टक्का ईश्वरी देणगी. प्रयत्नहीन इच्छा म्हणजे पंखहीन पाखरू. अचली दुबळी इच्छा चढणार नाही, उडणार नाही. ती पडेल व रडेल.

मॅट्रिकची परीक्षा जवळ येत होती व मालणचे लग्नही जवळ येत होते. त्या तरुणाशीच लग्न होणार होते. तो तरुण अविचल राहिला. तिरशिंगराव वडील भावाचे त्याने ऐकले नाही. त्याचे वडील भाऊ येऊन वाटेल ते बोलले याचे त्याला वाईट वाटे. वडील भावाच्या त्या तामसी वृत्तीमुळे तर या लहान भावाचा निश्चय अधिकच पक्का झाला. झगड्याशिवाय तीव्रता उत्पन्न होत नाही. त्याची डॉक्टरीची शेवटची परीक्षा होणार होती. तो कोठेही स्वतंत्रपणे राहता व संसार थाटता. घरच्यांवर विसंबून राहण्याची जरूरी नव्हती. पुष्कळ वेळा परावलंबन माणसाला पंगू करते. त्यामुळे मनाप्रमाणे वागता येत नाही. परावलंबनामुळे सद्सद्विवेकबुद्धी पुष्कळ वेळा गुंडाळून ठेवावी लागते. परावलंबन म्हणजे स्वातंत्र्य, स्वावलंबन म्हणजे स्वातंत्र्य. दुसऱ्याला साहाय्य करूनही त्याला स्वातंत्र्य देणे ही गोष्ट दुर्मीळ आहे. आपण जे साहाय्य करतो, जी मदत देतो, ती पुष्कळ वेळा सापेक्ष असते, सशर्त असते. नदीच्या पाण्याप्रमाणे, सूर्याच्या प्रकाशाप्रमाणे, फुलाच्या सुगंधाप्रमाणे ती सहज देणगी नसते.

त्या तरुणाच्या घरचे कोणीही लग्नाला येणार नव्हते. तरी तो तरुण डगमगला नाही. त्याच्या वर्गातील अनेक मित्र त्याचे वऱ्हाडी बनले. त्यांनी पुढाकार घेतला. लग्नात दागदागिने कोठले? तो तरुण तर अकिंचन होता. मालणची आई लग्नासाठी चार पाचशे रुपये खर्चणार होती. तेवढ्यात कितीसे दागिने होणार?

''हे पाहा जिजी, मुलाम्याचे करून घालावे दागिने. मंडपशोभा झाली म्हणजे झाले.'' तो तरुण मालणचे आईला म्हणाला.

''नथ खरी घ्यावी. इतर दागिने तुम्ही म्हणत असाल तर करावे तसे. परंतु दागिने पाहिजेतच असे थोडेच आहे?'' ती म्हणाली.

''दागिने हवेत. ते कसेही असोत. आज नकली आणा. उद्या मी मिळवता झालो म्हणजे खरे करीन. जगासमोर दारिद्र्य का दाखवा? वरवर बघणाऱ्या जगाला वरवर चमचम करणारे दागिने दिसले म्हणजे झाले. तुम्ही करा मी म्हणतो तसे.'' त्या तरुणाने आग्रहाने सांगितले.

शेवटी आम्ही काही अलंकार असे कृत्रिम करवून घेतले. रामची आई मलाच बरोबर नेत असे. रामच्या वडिलांचे एक निकट स्नेही. ते सल्ला देत, सारे बघत. मोती चौकात सराफाकडे रामच्या आईबरोबर मी जात असे. दागिने तयार झाले. लग्नाची इतरही तयारी झाली. कापडचोपड खरेदी करण्यात आले.

ज्या दिवशी आमची परीक्षा सुरू होणार होती, त्याच दिवशी लग्न होते! आमची कोण धांदल. त्या तरुणांच्या एका वर्गमित्राने देवोदक ठेवले. एका वर्गात शिकणारे, ते एकाच जातीचे. आम्ही सकाळी लवकर जेवून घेतले. आम्हाला परीक्षेला जावयाचे होते. परीक्षेला जाण्याचे आधी तास अर्धा-तास तरी पत्ते खेळणे असे आमचे व्रत असे. त्याप्रमाणे राम व मी इतरांबरोबर पत्ते खेळलो. खेळ आटोपून देवांना नमस्कार करून परीक्षेला निघालो. मी वाटेत वाराच्या एका ठिकाणी जाऊन तेथील वृद्ध आजींचा आशीर्वाद घेतला. त्या वृद्ध आजींनी गणपतीच्या दोन दुर्वा प्रसाद म्हणून मला दिल्या.

परीक्षेला जाण्याच्या आधी पत्ते खेळणारे आमच्यासारखे वीर जगात फार थोडे असतील. शेवटच्या क्षणापर्यंत टिप्पणी व वह्या वाचणारेच फार; परंतु

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

रात्रंदिवस डोक्यात परीक्षा कोंबणारे हे विद्यार्थी प्रश्नपत्रिका हातात पडताच गांगरतात. त्याच्या डोक्यात गोंधळ उडतो, त्यांना अर्धा तास काही सुचत नाही. परीक्षा ज्याच्या मानगुटीस बसली, त्याची कीव येते. परीक्षेचा दिवसही नेहमीच्या दिवसांप्रमाणे वाटावा. जीवनातील सहजता कधी नष्ट होऊ नये. आनंद व शांती नष्ट होऊ नयेत. पुस्तकातील पानाला ज्याप्रमाणे चोहोबाजूला कोरी जागा सोडलेली असते, चोहोबाजूस समास सोडलेला असतो, तसे जीवनातही हवे. पुस्तकाचे पान जर काठोकाठ छापलेले असेल तर बरे वाटणार नाही. जीवनात मोकळेपणाचा समास सोडलेला असावा. थोडा रिकामपणा असावा. थोडा रिकामपणा महत्त्वाची वस्तू आहे.

मालणचे लग्न लागले. सविधी व समंत्र असे लग्न लागले. होम झाले. सारे झाले. मेजवानी झाली. परीक्षेहून आल्यावर सायंकाळी आम्ही लग्नातील गोड वस्तू खात असू. वरात मोठ्या थाटाने काढली. नळे, चंद्रज्योती होत्या. मौज होती. नवरदेवाचे मित्र मोठे खटपटी. हसत खेळत व विनोदही करीत. सारे ईश्वरकृपेने पार पडले. कोणतेही विघ्न आले नाही. वधुवरांचे सुंदर फोटो काढण्यात आले.

आमचीही परीक्षा संपली. राम हुशारच होता; परंतु मलाही उत्तीर्ण होण्याविषयी शंका नव्हती. मी आता कोकणात घरी जाणार होतो. तेथे आई नव्हती. दादाच्या लग्नाचीही घरी खटपट चालली होती. आईला मरून सहा महिनेही झाले नव्हते. अद्याप दुःख ताजे होते. मग लग्नाची का बरे घाई? घरात कोणी नाही म्हणून. आई जिवंत असतानाच एका मुलीजवळ दादाचे लग्न ठरविले जात होते; परंतु त्या वेळेस जमले नाही. आई मेल्यावर पुन्हा त्याच मुलीजवळ लग्न ठरल्याचे माझ्या कानी आले. योगायोग म्हणतात तो असा.

साने गुरुजी

मी एके दिवशी उदास बसलो होतो.

"श्याम, असा का दिसतोस? घरी जाणार ना आता?" रामने विचारले.

"घरी जायला मन धजत नाही. राम, दोन प्रकारचे दुःख मनात आहे. एकतर घरी आई नाही हे दुःख. दुसरे दुःख म्हणजे मी पुढे काय करायचे? मॅट्रिक तर होईन. पुढे काय? जावे कोठेतरी असे मनात येते. घर नको दार नको. देवाजवळ जाऊन बसावे." मी म्हटले.

''तू पुन्हा आमच्याकडे ये. तुला कॉलेजात नादारी मिळेल. शेकडा ५० तरी मार्क तुला मिळतीलच. तुझे वार आहेतच. आमचे घर हे तुझेच घर. आम्हाला तुझा कंटाळा नाही. मला तर नाहीच नाही. घरी तुझ्या दादाचे लग्न आहे तर जा. मालणच्या लग्नात काम केलेस, आता भावाच्या लग्नासाठी जा. उगीच वेडेवाकडे मनात आणू नकोस. दुःखीकष्टी होऊ नकोस. तू मुद्दाम दुःख उत्पन्न करतोस. थोडे हसायला शीक.'' राम म्हणाला.

मी शेवटी घरी कोकणात गेलो.

✦✦✦

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय सातारा
दाखल नं ११५७७५ ग्रंथानुक्रमांक नि. ६२५८
किंमत १७०/- पाने १७७

दादाचा संसार सुरू झाला

मी घरी गेलो. आज़ोळच्या घरी दादाच्या लग्नाची तयारी होत होती. कारण आमच्या घरी कोण होते? आजोळी आजोबा होते, आजी होती. माझी बहीणही सासरहून आली होती. अंगणात मांडव घातला गेला. लग्नाचे दळणकांडण सुरू झाले. लगीनघाई सुरू झाली.

ज्या मुलीशी लग्न लागणार होते, तिचे घर शेजारीच होते. माझी आई व तिची आई दोघी मैत्रिणी होत्या. तिच्याकडून मी कितीदा तरी लहानपणी ताक आणीत असे. ती व मी लहानपणी खेळलो होतो. तिच्या भावांबरोबर मी खेळलो होतो. माझी नवीन येणारी वहिनी माझ्या परिचयाचीच होती.

लग्नाचा दिवस उद्यावर आला; परंतुन वरदेव अद्याप मुंबईहून आला कसा नाही? बोटीच्या गाड्या तर येऊन गेल्या. आम्ही सारे सचिंत बसलो; परंतु आमची दुर्वांची आजी भविष्य पाहू लागली. तिने डोळे मिटले. थोड्या वेळाने डोळे उघडून ती म्हणाली, ''भिऊ नका. घाबरू नका. नवरदेव वाटेत आहे. तासा दोन तासांनी येईल.'' परंतु मला धीर निघेना. का बरे दादा आला नाही? त्याला लग्न नसेल का

इतक्यात करायचे? त्याला नव्हतेच करायचे. त्याने वडिलांस तसे कळविले होते. परंतु वडिलांनी ऐकले नाही. गरीब व आज्ञाधारक दादा तयार झाला. मग अद्याप आला कसा नाही? मी गाडी येते का पाहायला निघालो. दापोलीच्या रस्त्याने निघालो. मैल दोन मैल मी गेलो नसेल तोच दादाची गाडी दिसली. आजीचे भविष्य खरे ठरले.

''श्याम, श्याम'' दादाने हाक मारली!

''आम्ही सारी वाट बघत होतो गाडीची. मी पाहायला पुढे आलो. न्या आता गाडी पळवीत.'' मी म्हटले.

''श्याम, तूही ये गाडीत.'' मुंबईहून बरोबर आलेली आत्या म्हणाली.

''नको. बैलांना ओझे होईल. मग ते पळणार नाहीत. न्या लवकर गाडी.'' मी म्हटले.

''तू का चालत येणार?'' दादाने विचारले.

''हो. हरणासारखा पळत येईन.'' मी म्हटले.

''भावजी, या ना गाडीत.'' आत्याची सून म्हणाली.

''तो येणार नाही. हट्टी आहे श्याम.'' आत्या म्हणाली.

गाडी पळत निघाली. मीही पळत निघालो का? नाही. माझे पाय पळत नव्हते. मन पांगुळले होते, म्हणून पायही पांगुळले. दादाच्या लग्नात सारी जमली; परंतु आई नव्हती. माझे डोळे तेथे रस्त्यात भरून आले. मी एका झाडाखाली बसलो. मी आईजवळ लहानपणी दादाच्या लग्नाविषयी बोलत असे. मी औंधहून घरी गेलो होतो तेव्हा एके दिवशी चुलीजवळ आईला म्हटले, ''आई, तुझा श्याम लग्न करणार नाही. दादाचे लग्न करा थाटाने. आपण गरीब आहोत, पुढे श्यामच्या लग्नात करू थाटमाट, घेऊ मानपान, अशी आशा नको ठेवू. जे काय करायचे असेल ते दादाच्या लग्नात करून घे हो आई. खरेच तुझा श्याम होणार आहे संन्यासी. जाणार आहे देवाकडे पळून, होईल गोसावी.''

''देवाकडे जाणार आहेस पळून, आणि तुझ्या आईला रे कोण? आईजवळ नाही वाटते देव? पुंडलिकाला तर आईजवळ देव भेटायला आला. श्याम, अजून अवकाश आहे. लहानपणी सारेच म्हणतात लग्न नाही करायचे म्हणून. पुढे चांगला संसार करतात. एक मेली तर दुसरी आणतात. संन्यासी कशाला व्हायचे? संसारात

राहून संन्यासी होईल तो खरा. पाण्यात राहून तरंगता आले पाहिजे. खरे ना!'' आई म्हणाली.

आईजवळचे ते सारे बोलणे आठवले. ते बोलणे आठवले, परंतु आई कोठे होती? तीही स्मृतिरूपच झाली होती. आईला आज किती आनंद झाला असता. आपल्या संसारात मुलाचे पहिले लग्न! ती एक धन्यतेची गोष्ट असते. मुलाचा संसार मांडून देण्यात एक प्रकारची कृतकृत्यता असते. एक प्रकारचे आनृण्य त्यात असते.

दादाने मुंबईहून एक लग्नासाठी म्हणून लांब कोट करून आणला होता; परंतु ते काळे कापड होते. काळा कोट का लग्नाच्या वेळेस घालायचा? सर्वांची तोंडे सुरू झाली. अलीकडील मुलांना धोरणच नाही असे शब्द ऐकू आले. शेवटी दुसऱ्या कोणाचा तरी कोट दादाला अंगात घालावा लागला. घोड्यावर बसून नवरदेव वधुगृही गेला. लग्न लागले.

लग्न लागून मी घरी आलो व मला अश्रू आवरत ना. ज्या खोलीत आई मरण पावली, ज्या खोलीत आईची मथी मांजरी मरण पावली, त्याच खोलीत मी अखंड अश्रू ढाळीत बसलो. मला त्या खोलीत जणू सर्वत्र आईच दिसत होती. अक्का, आत्या, आजी, साऱ्याजणी माझी समजूत घालीत होत्या.

''श्याम उगी; रडू नको. हवी होती आज तुमची आई. परंतु ईश्वरी सत्तेपुढे काय उपाय. मंगल कार्याचे वेळेस असे रडू नये. पूस डोळे.'' आत्या म्हणाली.

''श्याम, तिकडे दादा एकटाच बसला आहे. तो खेळावयाला बोलावत आहे. चल.'' कोणीतरी म्हणाले.

दादाची काय बरे मन:स्थिती असेल? त्याला नसेल का आईची आठवण आली? परंतु तो सारे मनात गिळावयाला शिकला होता. दु:ख लपवित होता. मी रडून मोकळा होत होतो; परंतु ज्या दु:खाला रडण्याचीही चोरी असते, ते दु:ख फारच असह्य होते. ते दु:ख आतून जाळते. गेले पाहिजे दादाकडे. त्याच्या अश्रूहीन दु:खाला धीर दिला पाहिजे. खेळले पाहिजे. त्याच्याबरोबर हसले पाहिजे. असे मनात येऊन मी गेलो.

दादाचे लग्न लागले. माझ्याही लग्नाच्या गोष्टी निघाल्या. माझे धाकटे मामा आज नाहीत; परंतु त्यांना या गोष्टींचा आनंद. ते माझ्यासाठीही मुली पाहू लागले. वडील म्हणाले, ''इतक्यात काय घाई आहे?'' मामा म्हणाले, ''पाहून ठेवायला काय हरकत? यंदा नाही तर पुढील वर्षी करू.'' परंतु शेवटी सारे बोलण्यावरच गेले.

दादा पुन्हा मुंबईला गेला. मी, अक्का वगैरे आजोळहून आमच्या घरी आलो. वहिनीही आमच्या घरी आली. सासरी आली. मला लहानपणी श्याम म्हणून हाक मारणारी ती मैत्रीण मला आता भावजी म्हणू लागली. मला मनात वाटे की, वहिनीने मला श्यामच म्हणावे व मी तिला तिच्या नावाने, माहेरच्या नावानेच हाक मारावी. लहानपणी वहिनीने आपणास भावजी म्हणावे म्हणून मुलांना हौस असते. माझे एक मित्र मला एकदा गंमत सांगत होते. ते होते लहान. त्यांच्या वडील भावाचे लग्न होऊन वधू सासरी आली होती; परंतु ती या छोट्या भावाला भावजी हाक मारीना. शेवटी या लहान भावाने आपल्या वडील भावाकडे या हक्कासाठी तक्रार केली.

''ऐकलेस का गं, याला भावजी म्हणून हाक मारीत जा. रडतो आहे हा, रागावला आहे.'' वडील भाऊ पत्नीला म्हणाले.

''काय भावजी?'' तिने हसत हाक मारली.

परंतु भावजी म्हणून घेण्यासाठी हपापलेले ते लहान भाऊ भावजी हाक कानी पडताच लाजून पळून गेले. सुख दूर आहे तोच कधी कधी मजा असते. अपेक्षेतील आनंद अपेक्षापूर्तीनंतर उरत नाही.

मला भावजी म्हणून घेण्याची इच्छा नव्हती. श्याम असेच सदैव म्हणून घेण्याची इच्छा होती; परंतु सनातनी जगात ते शक्य नव्हते. वहिनी प्रथमच सासरी आलेली. मी तिच्याजवळ हसत होतो, बोलत होतो. त्या दिवशीचा प्रसंग मला आठवतो आहे. दुधीभोपळा वडिलांनी भाजीसाठी आणला होता. अक्का आजोळी गेली होती. वहिनीला भाजी चिरावयाची होती. वहिनीने दुधीभोपळा साध्या भोपळ्याप्रमाणेच चिरला. जाड्या जाड्या फोडी तिने काढल्या. मी बाहेर फुले वगैरे वेचित होतो, इतक्यात वडिलांचा मोठा आवाज कानावर आला.

''दुधी भोपळ्याची भाजी अशी का चिरतात? कधी पाहिली आहे की नाही भाजी चिरलेली?'' वगैरे कठोर शब्द वडील बोलत होते. मी एकदम घरात गेलो. वहिनी विळीवर बसलेली होती. हातात भोपळ्याचा तुकडा होता. ती रडू लागली. सासरी येऊन दोन दिवससुद्धा झाले नव्हते तो गंगायमुना वाहू लागल्या.

''वहिनी रडू नको. मी चिरतो हो भाजी.'' मी प्रेमाने म्हटले.

''रडायला काय झाले? साधी भाजी का चिरता येऊ नये!'' वडील पुन्हा म्हणाले.

"पण अशी चिरली म्हणून शिजणार का नाही? बारीकच चिरली पाहिजे असे का शास्त्र आहे? का उगीच बोलता? का रडवता? आईच्या भाजीत मीठ एखादे वेळेस नसले तरी तुम्ही बोलत नसा. ते तुमचे हृदय आज कोठे गेले? आई गेली व तिच्या बरोबरच का तुमची सहानुभूती गेली? नको रडू वहिनी!" मी वहिनीचा कैवार घेऊन वडिलांना बोलत होतो. ते शांतपणे माझे म्हणणे ऐकून घेत होते. निमूटपणे ते बाहेर निघून गेले.

मी, अक्का, वैनी, धाकटा भाऊ, पुरुषोत्तम सारी शेतावर जात असू. अक्का आंब्याच्या झाडावर चढे व वरुण आंबे काढून खाली टाकी. शेतावर कधी कधी फराळाचे घेऊन आम्ही जात असू. विहिरीच्या कडेला आंब्याच्या झाडाखाली बसत असू. थालिपीठ, दशमी, पोहे खात असू. वैनी आंब्यांना दगड मारी व कैऱ्या पाडी. सासरी आहे असे तिला वाटू नये म्हणून माझी खटपट असे. वहिनी घरच्यासारखे वागावे, माहेराप्रमाणे राहावे असे मला वाटे. ती हसली, बोलली म्हणजे मला आनंद होई.

कोकणच्या बोटी लवकरच पावसाळ्यासाठी बंद होणार होत्या. वहिनी, अक्का वगैरेंना घेऊन मी मुंबईस आलो. मुंबईच्या वेधशाळेत दादाला नोकरी होती. तेथे राहायला त्यांना जागा होती. तेथे जणू कोकणच वाटे. घरासमोर अंगण असे. फणस, आंबे, शेगट वगैरे झाडे होती. केळी होत्या, फुलझाडे होती. अशा दादाच्या त्या नवीन बिऱ्हाडी आम्ही आलो.

अक्का लवकरच सासरी गेली. माझी मॅट्रिकची परीक्षा पास झाली होती. शेकडा ५० मार्क होते. मी कॉलेजमध्ये शिकायला जाणार होतो; परंतु अद्याप अवकाश होता. दादाचा नवीन संसार सुरू झाला. वहिनी डाळतांदूळ पाहू लागली. घरात व्यवस्था लावू लागली. वहिनीला भाकरी नीट करता येत नसे. कोकणात भाकरी नसते. शेतकरी कुणबी भाकरीच खातो. पांढरपेशे नुसता भातच खातात. परंतु आमच्या घरी मात्र असडिक तांदळाची भाकर नेहमी होत असे. कांडणातील कण्यांचीही दळून भाकरीच केली जाई. मी औंधला होतो, तेथे भाकरी खायला शिकलो होतो. पातळ भाकरी मला करता येत असे. आजोबा म्हणायचे, "श्यामची भाकरी किती पातळ असते."

"भावजी, शिकवा मला भाकरी" वैनी म्हणायची.

"शिकवितो हा." मी हसून म्हणे.

दादाचे व माझे जेवण झाल्यावर मागून वहिनी बसे. परंतु मी वहिनीजवळ गप्पागोष्टी करीत तिचे जेवण होईपर्यंत तेथेच बसत असे. रात्रीची जेवणं झाली की दादाचे मित्र खेळावयाला येत. मला थट्टेने कोणी 'शास्त्री' म्हणत.

''अरे शास्त्री, आत चुलीजवळ काय करतोस? खेळायला ये बाहेर. चौथा पाहिजे ना कोणी?'' शेजारचा बाळ म्हणायचा.

''मी थोड्या वेळाने येईन, सध्या तुम्ही खेळा मार्क डाव. नाहीतर खेळा गळेकापी.'' मी म्हणे.

''उरलेसुरले संपवीत आहेस वाटते?'' बाळ हसून विचारी.

''श्यामला ती सवयच आहे. आईजवळही तिचे जेवण चालू असले म्हणजे हा बसायचा. उरलेसुरले दाणे वगैरे खाऊन टाकावयाचा. या वालावर थोडे दही घेऊ? असे गोड विचारून ते घ्यायचा. शिळे उरलेले वाईट असे म्हणत सारं गट्ट करायचा.'' दादा म्हणे.

''भावजी, जा तुम्ही.'' वैहिनी म्हणे.

''होऊ दे जेवण.'' मी म्हणे.

मी तेथे का बरे बसत असे? मी अक्काकडे गेलो तर तिथेही तिचे जेवण होईपर्यंत मी मधून मधून तेथे जायचा, तिच्याजवळ बोलायचा. मावशीकडे गेलो तर तेथेही असेच. मी असे का करतो? मला का उरले-सुरले खायला हवे असे? मी मजेने म्हणेही, ''आहे का काही, टाकतो संपवून.'' लहानपणी कदाचित् खाण्याची आवड असेल. परंतु ती आवड पुढे नव्हती. मी वहिनीकडे कधीही गेलो तरी तिचे जेवण होईपर्यंत मी हात धुऊन तेथेच पाटावर गप्पागोष्टी करीत बसे. का, असे का मी करीत असे?

माझ्या मनात येई की आपण सारे बरोबर जेवलो. हसतखेळत, बोलत-सवरत जेवलो. परंतु वहिनी मात्र एकटी जेवत बसणार! तिला काय वाटत असेल? तिच्याजवळ कोण बोलेल, कोण हसेल? तिचे जेवण आनंदाने व्हावे असे मला वाटे, म्हणून मी तेथे बसे. सभोवती आमची उष्टी पडलेली आहेत, खरकटी भांडी समोर आहेत, स्वयंपाकाची भांडी जवळ आहेत, चुलीवर दूध तापत आहे; अशा सर्व निर्जीव वस्तूंच्या संगतीत वहिनी एकटी जेवत बसणार! आणि आम्ही तिकडे जेवण आटपून खेळत बसायचे! मला एक सवय लागली आहे. दुसऱ्याच्या हृदयाची कल्पना करून

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

घेण्याची एक नकळत सवय मला लागली आहे. पुष्कळ वेळा त्याच्या मनात काय बरे असेल? त्याच्या हृदयात कोणत्या भावना असतील? याचा विचार सारखा माझ्या मनात येत असतो.

बायकांना कदाचित काही वाटतही नसेल. त्यांना मुके मुके एकट्याने जेवण्याची परंपरेची सवयच झाली असेल. पूर्वी एकत्र कुटुंबपद्धती होती तेव्हा सर्वच सासुरवाशिणी मागून एकदम बसत. एकटे जेवण्याची पाळीच येत नसे; परंतु आज ती परिस्थिती नाही. मुंबईसारख्या शहरात सकाळी तर वेळही नसतो. जेवण आटोपून पटकन कचेरीत जावे लागते. परंतु पुष्कळशा चाळांतून नवरे कामाला गेले की शेजारच्या बायका एकत्र येऊन जेवतात. एकमेकींच्या भाज्यांची चव घेतात. बोलत, खेळत जेवणे होतात. परंतु शेजार चांगला असेल तर असे प्रकार होतात. नाहीतर एकएकट्याच रखमाया जेवत असतात. दुपारचे जेवण एक वेळ समजा, परंतु रात्रीच्या जेवणाचे वेळेस तरी पत्नी एकटी जेवत आहे तर तिच्याबरोबर जरा बोलावे, हसावे असे पुष्कळांस वाटत नाही. जेवण झाले की सुपारी खात शेजारच्या मित्रांजवळ चालतात कचेरीतील कथा, नाहीतर होतात पत्ते सुरू.

या गोष्टी सहज होतात. मुद्दाम होतात असे नाही. बायकांनाही त्याचे विशेष वाटत नाही, पुरुषांनाही वाटत नाही. परंतु गुलामगिरीचे असेच आहे. आपण एकट्याच जेवायच्या त्या खरकट्याच्या संगतीत, असेच बायकांना वाटते. हरिजनांच्या मायबहिणी लहानपणी मला म्हणायच्या ''श्याम, अरे दूर हो. आमची सावली पडेल तुझ्यावर!'' त्यांनाही तो धर्म वाटायचा! आम्ही सनातनी मंडळींनी गुलामगिरीचा धर्म इतका नैसर्गिक करून टाकला आहे, सर्वांच्या हाडीमांशी खिळवून टाकला आहे, की त्या गुलाम झालेल्यांनाही यात गुलामी आहे, यात हृदयहीनता आहे, यात मानव्याचा अपमान आहे, असे वाटत नाही.

वहिनीचे जेवण संपले म्हणजे मग मी पाटबीट उचलून जात असे खेळायला. माझ्या या अशा वृत्तीमुळे मला बायल्या अशी विशेषणेही मिळाली आहेत. परंतु त्या विशेषणांनी मला अपमान नसे वाटत. तो बायलेपणा भित्रेपणातून जन्मलेला नव्हता, सहानुभूतीतून जन्मलेला होता.

मी कधी सुटीत किंवा पुढे केव्हाही असा अकस्मात् दादाकडे गेलो व जेवणखाण आटोपून जर एकदम ओटीवर वगैरे गेलो तर वहिनी मला हाक मारी.

"बसा ना, गेलेतसे बाहेर. बसा त्या पाटावर माझे जेवण आटपेपर्यंत." असे ती म्हणे.

"मला जरा वाचायचे आहे." मी म्हणे.

"येथेच बसा वाचीत. मीही ऐकेन. इंग्रजी असले तर नको हो. मग वाचा मनातच. परंतु येथे बसा. पटकन् आटोपेल माझे जेवण." असे ती म्हणे.

संसारात सहानुभूती एक अद्‌भुत वस्तू आहे. या सहानुभूतीने सारे गोड होते, सारे सोन्याचे होते. सहानुभूतीने साधे जीवन मनोहर होते. सहानुभूतीने मीठभाकरीला अमृताची चव येते. सहानुभूतीने साधेसे घर नंदनवनाहून आनंदमय होते. एखाद्या गरीब विद्यार्थ्याला सहानुभूती दाखवावी, त्याच्याजवळ गोड दोन शब्द बोलावे. लगेच त्या विद्यार्थ्याला मोक्ष मिळाला असे वाटते. एखाद्या भांडी घासायला येणाऱ्या मोलकरणीजवळ दोन शब्द बोला, तिच्या आजारी मुलाची चौकशी करा. हे ताक ने जाताना म्हणा. तिचे तोंड लगेच फुलते. एखाद्या शेतकऱ्याजवळ, एखाद्या मजुराजवळ प्रेमाने बोला. लगेच त्याला तुमच्याबद्दल कृतज्ञता वाटू लागते. सुकलेले गवत चार पाण्याच्या थेंबांसाठी, चार दवबिंदूंसाठी हपापलेले असते, त्याप्रमाणे दारिद्र्याने भग्न झालेला हा विराट भारतीय संसार सहानुभूतीच्या स्पर्शासाठी आसावलेला असतो. हिंदुस्थानात सहानुभूतीचा अस्त आहे म्हणून दास्य आहे. ज्या दिवशी अपरंपार सहानुभूतीचा सागर येथे उचंबळेल त्या दिवशी स्वातंत्र्य आपोआप दाराशी येईल.

हिंदी सहानुभूतीला "हमदर्दी" असा शब्द आहे. मला तो फार आवडतो. "हमदर्दी" म्हणजे आम्हीही दुःखी आहोत, मीही दुःखी आहे असा भाव. दर्द म्हणजे दूःख. तूला दुःख आहे तर मीही दुःखी आहे. तुझे दर्द है तो मुझे भी है, या भावनेला "हमदर्दी" असा गोड शब्द आहे. ज्याला दुसऱ्याच्या जीवनाचा विचार सहानुभूतीने करता येऊ लागला तो धार्मिक होऊ लागला, मानव होऊ लागला, देवाला प्रिय होऊ लागला. जीवनाची किल्ली त्याला सापडली. सहानुभूती म्हणजे जीवनाची किल्ली. शास्त्र नाना प्रकारच्या पदार्थांवर तन्मय होऊन प्रयोग करतो. त्या पदार्थाच्या अंतरंगात सहानुभूतीने शिरतो. त्या शास्त्रज्ञाला मग डांबरात सुंदर रंग दिसतात, लाकडाच्या भुशात गोड साखर मिळते, समुद्रात पोवळ्याच्या रमणीय बागा दिसतात. मानवाला जड वस्तूत अनंत सौंदर्य पाहायची कला सापडली आहे; परंतु चैतन्याचे रंग पाहण्याची कला सापडली नाही.

शेक्सपिअरचे हॅम्लेट म्हणून नाटक आहे. त्या नाटकात हॅम्लेटच्या मनातील भाव समजून घेण्याची एकजण खटपट करीत असतो. हॅम्लेटला हे समजते. हॅम्लेट त्या गृहस्थासमोर एक बासरी टाकतो.

"वाजव, ही बासरी वाजव." तो म्हणतो. तो गृहस्थ बासरी वाजवतो व वेडेवाकडे सूर निघतात.

"आहा रे पागल, साध्या निर्जीव वस्तूतीलही बोल तुला काढता येत नाहीत. तिचेही अंतरंग आपलेसे करून घेता येत नाहीत; मग मानवाच्या हृदयातील बोल कसे रे काढता येतील? त्या हृदयात काय चालले आहे हे कसे कळेल?" असे हॅम्लेट म्हणतो.

हे कळायला एकच उपाय आहे. सहानुभूती. सहानुभूती म्हणजे संगीताची जननी. दुसऱ्याच्या हृदयातील संगीत ऐकायला हवे असेल, तेथील सूर ऐकायची इच्छा असेल, दुसऱ्याच्या जीवनवेणूमधून आनंदमय गीत बाहेर पडावे असे वाटत असेल तर सहानुभूती घेऊन जा. कुंजवनातील कृष्णाची मुरली शरद ऋतूतील प्रसन्न चंद्रमा पाहून पाझरली, संगीत स्रवू लागली. तुमच्या हृदयाकाशातील सहानुभूतीचा चंद्रमा दिसला म्हणजे दुसऱ्याच्या जीवनाची मुरली वाजू लागेल. परंतु ही सहानुभूती शारदीय चंद्राची हवी. शरद ऋतूत चंद्राला ढग वेढीत नाहीत त्याप्रमाणे तुमच्या सहानुभूतीभोवती स्वार्थ, दंभ, आसक्ती यांचे ढग असता कामा नयेत. पवित्र सहानुभूती म्हणजे एक महान काव्य आहे. या सहानुभूतीत सारे सुख आहे. सारे आनंद आहेत. सारे दुःखावरचे उपाय आहेत, रोगांवरचे उपचार आहेत. सहानुभूती म्हणजेच वेदांतदर्शन, परब्रह्मदर्शन, सहानुभूती म्हणजेच मोक्ष!

✦✦✦

एक अमर प्रसंग

मी व राम न्यू पूना कॉलेजमध्ये पहिल्या वर्षाला होतो. मॅट्रिकची परीक्षा झाल्यावर राममध्ये एकदम एक बदल झाला. तो व्यायामाकडे वळला. इतके दिवस या गोष्टीकडे त्याचे लक्ष नव्हते. कोकणात असताना तो उत्कृष्ट पोहायला शिकलेला होता; परंतु त्याची प्रकृती अशक्तच होती. तो आपल्या हातावरच्या बारीक निर्जीव शिरा मला दाखववावयाचा व ''मी फार अशक्त आहे नाही?'' असे म्हणावयाचा. रामचा मोठा भाऊ घरी व्यायाम करीत असे. सकाळी उठून तो अर्धापाऊण तास जोर-बैठका यांची मेहनत घेत असे. कधी कधी लांब फर्ग्युसन कॉलेजच्या व्यायामशाळेत जाऊन तेथे तो करेला वगैरे फिरविण्याचा व्यायाम करीत असे.

रामचे वडील, चुलते हे हाडापेराने मोठे बळकट होते. विशेषत: चुलत्यांचे शरीर तर फारच धिप्पाड व बांधेसूद होते. दापोलीला असताना त्यांनी एकदा एका पठाणाला एक थोबाडीत मारून काजवे पाहायला लावले होते. पठाणांनी त्यांना आपल्या मुक्कामी बोलाविले. हातात एक काठी घेऊन ते गेले; परंतु

पठाणांनी त्यांचा सत्कार केला व एक सुंदर सुरा त्यांना बक्षीस म्हणून दिला. पठाण म्हणाले, ''हिंदुस्थानात हा प्रथमच आम्ही चमत्कार पाहिला. पठाणांस सारे भितात. तुम्ही शूर आहात. पठाणाला भ्याडांची चीड येते. ते शौर्याची तारीफ करतात.''

रामचे चुलते असे होते. कोकणात एकदा त्यांनी हातातील काठीने वाघ मारला होता. त्यांना भय माहीत नव्हते. ते पुढे आफ्रिकेत गेले व मोठे व्यापारी बनले. परंतु अकस्मात मरण पावले. माझे चुलते व रामचे चुलते मित्र होते. माझे चुलतेही त्यांच्याबरोबर आफ्रिकेत गेले होते. माझ्या चुलत्यांचेही शरीर अति प्रमाणबद्ध व कसलेले असे होते. ते लोखंडी गज मोडून टाकीत. सापाला पायाखाली चिरडून टाकीत. रात्री १२ वाजता पहाडातून हिंडून येत. आमच्या घरी लहान मुले आजारी पडली किंवा एकदम कोणाला ताप आला तर ''मनी आली वाटते, तिला दहीपोहे द्या.'' असे म्हणत. मनी नावाची एक मुलगी मंगळागौरीची पूजा विसर्जावयास पहाटे इतर वसोळ्यांबरोबर विहिरीवर गेली होती. फुले विहिरीत टाकताना तीच विहिरीत पडली. ती तेथे झाडावर भूत झालेली आहे अशी सर्वांची कल्पना आहे. मनीला दहीपोहे दिले की तिच्यामुळे आजार आलेला असेल तर तत्क्षणी जाई. परंतु माझे हे चुलते अशा गोष्टींवर विश्वास ठेवणारे नव्हते. ते मजा करीत. ते माझ्या आईला म्हणायचे, ''वहिनी वहिनी, मनीला दहीपोहे बरेच द्या. बरेच घाला पोह्यांवर दही. मनीला आनंद होईल.''

मग ते दहीपोहे घेऊन काळोखातून झाडाखाली ठेवण्यासाठी म्हणून ते जात; परंतु कोठे ठेवीत असत ते? ते स्वत: झाडाखाली एका मोठ्या दगडावर बसून ते पोहे खाऊन टाकीत! त्यांना कधीही मनीची बाधा झाली नाही. झाडाखाली पोहे दिसत नसत. लोक म्हणत, ''याने पोहे ठेवले की मनी खाते!''

रामचे चुलते व माझे चुलते असे बळकट, निर्भय व शूर होते. दक्षिण आफ्रिकेत अनेक संकटांशी ते झुंजले. चोरांना तिकडेही त्यांनी चांगला हात दाखविला. रामच्या डोळ्या समोर ते चुलते जणू उभे राहिले. मोठा भाऊ व्यायाम घेतच होता. रामलाही स्फूर्ती आली. मॅट्रिकची परीक्षा देऊन मी कोकणात गेलो. इकडे राम व्यायामासाठी जाऊ लागला. तो सिंगलबार व डबलबार करण्यासाठी जाऊ लागला. नूतन मराठीच्या मराठी शाळेच्या आवारात त्या वेळेस सिंगलबार,

डबलबार असत. राम तेथे जाई. तेथे व्यायामशिक्षक शिकवायला येत असत. मी कोकणातून आलो तो रामची उंची वाढलेली, पोषाख बदललेला! त्याने आता हाफ् पँटस् शिवल्या होत्या. त्याच तो घाली. केस सुंदर विंचरून ठेवी. नीटनेटका व व्यवस्थित आता तो राही.

''श्याम, चल माझ्याबरोबर व्यायामला.'' राम म्हणे.

''मी नाही येत. मला तो सिंगलबार वगैरे येणार नाही.'' मी म्हणे.

''अरे, मी कसा त्याच्यावर उड्या घेतो त्या तरी बघ. चल. मला पाहून तुला स्फूर्ती येईल.'' तो म्हणे.

मी त्याच्याबरोबर जात असे. मी नुसता प्रेक्षक होत असे. रामचा व्यायाम झाल्यावर त्याच्याबरोबर चण्याची भिजवलेली डाळ व खोबरे हे खाण्यात मात्र मी भागीदार होत असे.

जे शिक्षक रामला व्यायाम शिकवीत त्यांना सारे ''सर'' असे म्हणत. रामचा व त्यांचा खूप परिचय झाला. राम त्यांना ''सरदादा'' असे म्हणे. या सरदादाचा पुढे ''सरदा'' एवढाच शब्द राहिला. त्या शिक्षकांना पुढे आम्ही ''सरदा'' या नावानेच हाक मारीत असू. ते फार उंच नव्हते; परंतु शरीर फार कसलेले होते. त्यांचे डोळे मोठे पाणीदार दिसत.

एके दिवशी 'सरदा' रामला शिकवायला आले नाहीत. सारी मुले सर का आले नाहीत म्हणून चौकशी करू लागली; परंतु कोणालाच काही माहीत नव्हते. राम व मी डाळ खाऊन घरी जाणार इतक्यात सरदा आले.

''काय सरदा, आज उशीरसा?'' रामने विचारले. परंतु ते काही बोलले नाहीत. त्यांचा चेहरा चिंताक्रांत होता.

''का सरदा, आज हसत नाही तुम्ही? बोलत नाही तुम्ही?'' रामने पुन्हा विचारले.

''राम, आज माझ्या आईला ताप आला आहे व काखेत दुखत आहे, प्लेग असावा असे वाटते. मी जातो आता.'' ते म्हणाले.

''तुम्ही तर घरी एकटे. मी व श्याम येऊ का तुमच्याकडे रात्री? तुम्हाला मदत होईल.'' रामने विचारले.

''परंतु प्लेगच्या माणसाजवळ तुम्ही कशाला?'' ते म्हणाले.

''अहो, आम्ही टोचून घेतले आहे आणि आमचे कोणी आजारी पडले तर आम्ही का सोडून जाणार आहोत? दवाखान्यात नेऊन ठेवले तरी तेथे इतर माणसे असणारच! आपण काळजी घ्यावी इतकेच. आम्ही येऊ हा.'' राम म्हणाला.

आम्ही रात्री सरदाच्या घरी गेलो. लहानशी होती त्यांची खोली. आजूबाजूला गरीब मजुरांची वस्ती होती. म्युनिसिपालटीचा त्या पेठेतील जणू सारा कचरा तेथे टाकलेला होता. लांबलचक ती एक चाळ होती. समोर मोकळे पटांगण होते. कोणाच्या गाई, म्हशी तेथे बांधलेल्या असत. सरदांचीही एक म्हैस होती.

आम्ही दोघे सरदांच्या आईजवळ बसलो. तिचे पाय वगैरे चेपीत बसलो. अंगात ताप होता परंतु फार नव्हता. काखेत गोळा तर आला होता.

''हा प्लेग आहे की दुसरे काही आहे? प्लेगात ताप फार येतो. एकदम पुढे वात होतो.'' राम म्हणाला.

रामचा एक भाऊ व माझाही एक भाऊ प्लेगामुळे देवाघरी गेलेले होते.

''ताप फार नाही; परंतु काखेत तर गोळा आहे.'' सरदा म्हणाले.

''मग काय करायचे?'' मी विचारले.

''गुलबक्षीचा कांदा किसून त्यावर लावावा असे एकाने सांगितले आहे. उद्या आणणार आहे कांदा.'' ते म्हणाले.

आम्ही बराच वेळ बसलो होतो.

''तुम्ही आता निजा.'' सरदा म्हणाले.

''आपण तेथे अंगणात निजू. आकाशाच्या खाली.'' म्हटले.

''परंतु आम्हाला उठवा हा दोन तासांनी. तरच आम्ही निजू.'' रामने अट घातली.

''होय उठवीन.'' ते म्हणाले.

पहाटे दोन वाजले म्हणजे मी व राम उठत असू व सरदा झोपत. उजाडल्यावर सरदा म्हशीचे दूध काढीत. आम्हाला ते फेसाळ दूध सरदा प्यायला देत व आम्ही पीत असू. नंतर आम्ही घरी येत असू.

आम्ही रोज रात्री तेथे जात असू. गुलबक्षीचा कांदा बांधण्यात आला. गोळा कमी होऊ लागला. तापही जवळजवळ थांबला. सरदांची आई वाचली; परंतु हे मी सांगत आहे ते एका गोष्टीसाठी; एक दृश्य तेथे पाहिले ते सांगण्यासाठी.

एके दिवशी नित्याप्रमाणे आम्ही सरदांकडे गेलो होतो. अंगणात अंथरूण टाकून पडलो होतो. इतक्यात पलीकडच्या खोलीत भांडाभांडी ऐकू आली. नवरा दारू पिऊन आला होता. तो बायकोला शिव्या देत होता. या दारूने हिंदुस्थानातील कोट्यवधी कुटुंबांत हायहाय निर्माण केली आहे. दारूपायी लाखो मायबहिणी अपार यातना भोगीत आहेत. दारूबाजाच्या घरी सुख नाही. दारूबाजाच्या घरच्या मंडळींना किती चिंता. घरी नीट केव्हा येतील असे सारखे वाटत असते. काँग्रेस सरकारने दारूबंदी हाती घेतली होती. राष्ट्राचा आत्मा व्यसनमुक्त करण्याचे ठरविले होते. लाखो आयाबाया काँग्रेसला दुवा देऊ लागल्या होत्या. काही काही खेडेगावांतून स्त्रियांनी घरोघर हिंडून काँग्रेसचे सभासद केले.

''व्हा की सभासद. काँग्रेस करील कल्याण. दारू करणार आहे बंद. आमच्या डोळ्यांचे पाणी पुसणार आहे. आमची अब्रू सांभाळणार आहे. आमच्या पोराबाळांना सुख देणार आहे. आमचा संसार सुखाचा करणार आहे. व्हा की सभासद.'' असे आयाबहिणी घरोघर जाऊन सांगत. काँग्रेसचा झेंडा आला तर त्याला ओवाळीत. दारूपायी सर्वांत अधिक हाल घरातील आयाबहिणींचे होत असतात. असो.

''मारून तरी टाका एकदा. जगून तरी काय करायचे? घरात तेल नाही मीठ नाही. अंगभर धडोते नाही. जरा काही लाज धराल की नाही.'' ती बायको म्हणत होती.

''लाज काढतेस माझी? रांडे, खांडोळी करीन बघ; चुलीतील लाकडांनी भाजून टाकीन बघ.'' दारू प्यालेला नवरा ओरडत होता.

शेवटी ओढाताण सुरू झाली. त्याने तिच्या झिंज्या धरल्या व मारू लागला. ती ओरडू लागली. शेवटी त्याच्या हातातून ती निसटून बाहेर आली. सुटली हरणी वाघाच्या हातून. ती अंगणात उभी राहिली. ती रडत होती.

''छळतोय मेला दिवस-रात. बायको म्हणजे का ढोर?'' असे ती बाहेर येऊन म्हणत आहे. तो तो दारूड्या नवरा हातात वरवंटा घेऊन दारात उभा राहिला! ''कोठे पळतेस बघतो. मला सोडून कुठे जाणार तू मसणात. काही कुठे जात नाहीस. राहा, तेथे उभी राहा. मारतो हा वरवंटा डोक्यात. टाकतो नारळ फोडून, देतो दारूला! दारू पिऊ नको म्हणते रांड. दारू माझी आई, दारू म्हणजे माझा देव! त्या देवाला देतो नारळ, तुझ्या डोक्याचा नारळ. राहा बघ उभी, कुठे चाललीस, हा बघ मारतो वरवंटा; घरात ये मग पाटा घालतो पाठीत, पाटा घालतो टकळीत!'' असे म्हणून त्याने जोराने तो

वरवंटा फेकला! परंतु वरवंटा फेकताना त्याचा तोल गेला व तोच खाली पडला! तेथील पायरीजवळची एक कपर त्याच्या डोक्यात लागली!

त्याची बायको एकदम धावत आली. आजूबाजूचे लोक आसपास उभे होते.

"बायकोला मारायला हवे. आता आपणच पडला की लेकाचा धुळीत. कशाला उचलता, कशाला धरता त्याला? मरू दे की." असे कोणी म्हणू लागले.

"रक्त वाहात आहे हो. कोणी या हो. शुद्ध नाही वाटते यांना. काय रे झाले देवा! कसे उचलू यांना!" ती माउली म्हणत होती.

आम्ही मित्र तेथे गेलो. ते रक्त पुसले. सरदांकडे काही औषध होते ते लावून पट्टी बांधून ठेवली. त्याला उचलून घरात एका घोंगडीवर ठेवले. त्याची बायको रडत होती.

"काही खाल्लीही नाही भाकर त्यांनी. मी चटणी वाटत होते. ते आले व लागले आरडाओरडा करायला. तसे वाईट नाहीत दादा ते. ही दारू! ही करते माणसाला वाईट." असे म्हणून ती त्याचे डोके मांडीवर घेऊन बसली. पदराने वारा घालीत होती.

तो सावध झाला. त्याने डोळे उघडले. तिच्याकडे पाहिले. दारूने धुंद झालेल्या डोळ्यांनी नव्हे तर कृतज्ञ प्रेमाने, हृदयातील पवित्र कोमल भावनांनी.

"तुला लागला का वरवंटा?"

"नाही नाही. पण तुम्हाला लागला दगड. मी बाहेर नसते गेले तर तुम्ही दारात रागाने उभे नसते राहिले. मी बाहेर गेले म्हणून तुम्ही पडलेत. येथेच बसले असते तर! मग असे झाले नसते!"

"पण मग तुझे काय झाले असते? तुझे काम मी केले असते?"

"माझे मेलीचं काही होवो. तुम्ही नीट राहा. तुम्ही थोडी भाकर खाता? उठवते का?" तिने विचारले.

"तूच घाल तुकडा तोंडात." तो म्हणाला.

तिने त्याचे डोके हळूच खाली ठेवले. डोक्याखाली दोन लक्तरे घडी करून दिली ठेवून. उशी झाली. ती भाकर घेऊन आली. चटणी-कांदा घेऊन आली. ती त्याला भरवीत होती. तिचे डोळे भरून आले होते. त्याचेही हृदय भरून आले होते.

"पुरे आता." तो म्हणाला.

"आणखी थोडी घ्या." ती म्हणाली.

''माझे पोट भरून आले आहे. तू भरवलेस. दोन तुकड्यांनी पोट भरले. तो संकप आवाजात म्हणाला.

''घोटरभर पाणी प्या.''

''दे. घोटभर पिऊ दे व पोटभर डोळ्यातून काढू दे.''

''आता पडून राहा.''

''तू खा भाकर. माझ्याजवळ बसून खा.''

ती त्याच्याजवळ बसून भाकर खात बसली. दोन तुकडे खाऊन तिने आटोपले.

''आणखी खा. इतक्यात झाले?'' त्याने विचारले.

''पोट भरून आले आहे.'' ती म्हणाली.

''तू भरवल्यामुळे माझे पटकन् भरले. तुला मी काही भरवले नव्हते?'' त्याने विचारले.

''असे गोड बोललात म्हणजे भरते पोट.'' ती म्हणाली.

''आता नेहमी बोलेन, खरेच बोलेन. मी देऊ एक तुकडा तुझ्या तोंडात?'' त्याने विचारले.

''द्या. हा घ्या हातात देते तुमच्या.'' असे म्हणून तिने पतीच्या हातात तुकडा दिला व आपले तोंड खाली केले. त्याने तिच्या तोंडात दिला. वरवंटा फेकणारा हात घास देऊ लागला. खांडोळी करणारा हात, चुलीतील लाकडांनी जाळणारा हात जीवन देऊ लागला, अमृत देऊ लागला. पतिव्रतेच्या प्रेमाचा तो विजय होता! दारू तर वाईट; परंतु ज्या दारूच्या प्रसंगातून आपल्या उदात्त प्रेमाचे दर्शन होते, वरवंटा डोक्यात घालणाऱ्या पतीला जी प्रेमाने मांडीवर थोपटते, पती घेरी येऊन पडण्यापेक्षा आपणच घरात मेलो असतो तर काय वाईट असे उद्गार जेथे बाहेर पडतात, त्या दारूलाही प्रणाम करावासा वाटतो! दारूलाही दिव्यता देणाऱ्या त्या अमर प्रेमाला कोटी कोटी प्रणाम! तो थोर अमर प्रसंग, ते दिव्य शब्द मी कधीही विसरणार नाही!

+++

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

स्वयंसेवक

महाराष्ट्रातील थोर कादंबरीकार हरी नारायण आपटे यांचे नाव कोणास माहीत नाही? ते केवळ कादंबरीकार नव्हते. समाजाच्या इतर कार्यांतही ते पडत. कोणी मागे एकदा लिहिले की, हरिभाऊ इतर कामांत, इतर व्यापांत न पडते तर त्यांच्या पुष्कळशा कादंबऱ्या अर्धट राहिल्या तशा न राहत्या; परंतु केवळ कादंबरीलेखनाला वाहून घेणे म्हणजे काय? त्याने वाङ्मयाला वाहून घेतले आहे असे म्हणतात; परंतु याचा अर्थ काय? जीवनात नाना प्रकारचे अनुभव यांवे लागतात. ही अनुभवांची पुंजी जवळ नसेल तर साहित्य कसे निर्माण होणार? केवळ खोलीत बसून वाङ्मय निर्माण करता येत नसते. महान् साहित्यिक हा शेवटी महान सेवकही असतो. महान साहित्यिक प्रत्यक्ष आजूबाजूच्या अनंत संसारात पडलेला असतो. हजारोंना तो बघतो. हजारोंशी त्याचे संबंध येतात आणि या सामग्रीतून तो अमर साहित्य निर्माण करतो. साहित्यिकाला संसारापासून अलग राहणे अशक्य आहे. ज्या मानाने तो या संसारात बुडी मारील, जितक्या खोल व व्यापक जीवनसमुद्रात बुडी मारील, त्या मानाने

त्याच्या हाती माणिकमोती लागतील. खोल बुडी मारल्याशिवाय मोती नाही. वरवर खेळणाऱ्याला शेवाळ मिळेल.

हरिभाऊ सहृदय होते. ते आजूबाजूची दुनिया बघत होते. ते पुणे म्युनिसिपालटीचे जवळजवळ वीस वर्षे अध्यक्ष होते. कितीतरी अनुभव त्यांना आले असतील. एकदा त्यांनी पुण्यामध्ये साक्षर व निरक्षर लोकांची खानेसुमारी करण्याचे ठरविले. पुण्यात किती लोक निरक्षर आहेत ते पाहावयाचे होते. मोठे होते काम. यासाठी शेकडो स्वयंसेवक घरोघर जाऊन माहिती गोळा करण्यासाठी पाहिजे होते. स्वयंसेवकांसाठी मागणी आली. शाळांतून वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांपैकी स्वयंसेवक पाहिजे होते. राम व मी आम्ही दोघांनी स्वयंसेवक म्हणून नावे दिली. मला वाटते शंभर शंभर घरे दोघा दोघा स्वयंसेवकांकडे दिली होती.

आम्ही सकाळी व सायंकाळी जात असू. मंडईच्या पाठीमागच्या बाजूला आमच्या वाटणीची घरे होती. ज्या घरात कोणी भेटत नसे तेथे पुन्हा जावे लागत असे. त्या वेळेस फार विचित्र असे अनुभव आम्हाला आले. वीस-बावीस वर्षांपूर्वीची ती गोष्ट; परंतु ते अनुभव अद्याप ताजे आहेत. लोकांना आम्ही नावे विचारू लागलो म्हणजे भीती वाटते. घरात किती माणसे आहेत तेही सांगायला काही लोक तयार नसत. त्यांना वाटे की नवीन कर बसणार बहुधा. महायुद्ध मला वाटते संपले नव्हते. फार जोरात होते. शेवटचा सामना चालला असावा. लढाईच्या खर्चासाठी सरकार डोईपट्टी बसवणार असे काहींना वाटे. इंग्रजी राज्यात लोकांना एक भय बसले आहे. सरकार नवीन कर बसवणार अशी दहशत त्यांना बसून गेली आहे; परंतु आम्ही समजावून देत असू. सर्व लोकांना साक्षर करायचे आहे. निरक्षर लोक किती ते कळले म्हणजे कामाची कल्पना येईल, खर्चाचा अंदाज येईल वगैरे गोष्टी आम्ही सांगत असू. काही काही घरांतून अजिबात कोणीच शिकलेले नाही असेही आढळले. खरोखर आपल्या देशाचे दुर्दैव आहे; पारतंत्र्य म्हणजे शाप आहे; परंतु आज परतंत्र झालो. पूर्वी परतंत्र नव्हतो. आम्ही सर्वत्र ज्ञान का नेले नाही? ज्ञान ब्रह्म, ज्ञान म्हणजेच परमेश्वर अशी आमच्या पूर्वजांनी व्याख्या केली; परंतु ते ज्ञान, तो परमेश्वर सर्वत्र आम्ही नेला नाही. सूर्याचा प्रकाश सर्वत्र हवा, मोकळी हवा सर्वत्र हवी, अन्न सर्वांना हवे, त्याप्रमाणे ज्ञानही सर्वांना हवे. अन्नदानाची महती आपण शिकलो आहोत. भिकाऱ्याला चार दाणे गरीबही घालतो; परंतु ज्ञानदानाचे महत्त्व आपण समजलो नव्हतो. आजच्या काळात हे अज्ञान

चालणार नाही. जगाच्या पाठीवर आपल्यासारखा अज्ञानीही देश नाही. साक्षरता म्हणजेच ज्ञान नसले तरी साक्षरता हे एक महत्त्वाचे साधन आहे. ते साधन अर्वाचीन काळात सर्वांना प्राप्त झाले पाहिजे. हिंदुस्थानात शेकडा ९० लोक निरक्षर हे कोष्टक आपण किती दिवस ऐकणार? सर्व लोकांना साक्षर करावयास पैसा तरी कोठून आणावा? आज शेकडा १० लोकच साक्षर आहेत तर १० कोटी रुपये खर्च होत आहेत. उद्या शंभर टक्के साक्षर करावयाचे म्हणू तर शंभर कोट रुपये लागतील. म्हणजे सर्व हिंदुस्थानच्या सरकारी उत्पन्नातील निम्मे भाग!

केवळ पैशाने हा प्रश्न सुटणार नाही. उद्या स्वराज्य आले तरीही हा कठीण प्रश्न आहे. एक तर शाळा स्वावलंबी झाल्या पाहिजेत किंवा जनतेला साक्षर करणारे हजारो व्रती निघाले पाहिजेत. आमच्या राष्ट्राचा कलंक नाही आम्हाला सहन होत. हा कलंक आम्ही पुसून टाकू असे प्रखरतेने म्हणून तदनुरूप काम करणारे तरुण पाहिजेत.

पाश्चिमात्य देशांतून शिक्षण संपल्यावर सक्तीचे लष्करी शिक्षण घ्यावे लागते. शिक्षण संपल्यावर कोठे कोठे तीन वर्षे, कोठे कोठे अधिकही वर्षे हे लष्करी शिक्षण घेणे आवश्यक असते. एखाद्या तरुणावरच सारे कुटुंब अवलंबून असेल तर त्याला मुभा मिळते; परंतु बाकीच्यांना बराकीतून जावे लागते. हे लष्करी शिक्षण घेतल्यावर मग त्याने वाटेल त्या क्षेत्रात जावे. राष्ट्रावर कधी आपत्ती आली, परचक्र आले तर प्रत्येक तरुण लष्करी शिक्षण घेतलेला असल्यामुळे एकदम शिपाई म्हणून येऊन उभा राहतो.

आपल्याकडे असे सक्तीचे लष्करीचे शिक्षण नाही; परंतु आपणच आपणावर दुसरी एक सक्ती का करून घेऊ नये? अभ्यासक्रम संपल्यावर तीन वर्षे दूर राहिली, एक वर्षे तरी मी जनता साक्षर करण्यासाठी देईन, मग इतर कामांत जाईन असा निश्चय प्रत्येकाने का करू नये? फायनल होणाऱ्या, मॅट्रिक होणाऱ्या कोणालाही असे एक वर्ष त्याने दवडल्याशिवाय उत्तीर्णपत्र देण्यात येऊ नये असा कायदा केला पाहिजे; परंतु देशप्रीती आपण का कायद्याने शिकणार, बंधुप्रेमही का कायद्याने शिकायचे?

महाराष्ट्रात प्रो. विजापूरकर या साक्षरतेसाठी तळमळत. समर्थ विद्यालय स्थापन करणारे प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर म्हणजे महाराष्ट्राची अनंत ध्येयनिष्ठा. कऱ्हाडच्या स्वदेशी आगपेटीच्या पेट्या त्यांनी मरेपर्यंत पुरविल्या. अत्यंत काटकसरीने त्या पेट्या ते वापरीत. दुसऱ्याला त्यातील काडी देत नसत.

''तुम्हाला इतरही चालतात, मला चालणार नाहीत. मला मरेपर्यंत याच पुरवायला हव्यात.'' असे ते म्हणायचे. त्यांनी छत्री कधी वापरली नाही. घोंगडी घ्यावयाचे. तळेगाव येथे समर्थ विद्यालयात असता ते कधी बाहेर गेले; फिरायला गेले, झऱ्याकाठी गेले व तेथे गुराखी दिसले तर त्यांना ते म्हणत, ''या, तुम्हाला अक्षरे शिकवतो. तुमचे नाव लिहायला शिकवितो.'' वाळूमध्ये काठीने ते अक्षरे काढीत व त्या गुराख्यांना शिकवीत!

राष्ट्रसेवा म्हणजे शेवटी परार्थसेवा. राष्ट्रीय भावना म्हणजे समाजसेवेचे व्रत. सर्व समाजाचा उद्धार करण्याचा निश्चय म्हणजेच आजचा धर्म. धर्म म्हणजे कर्मण्याचे अग्निहोत्र. सर्वत्र ज्ञानाग्नी पेटवण्याचे महान् काम वाट पाहात आहे.

आम्ही आमच्या वाट्याच्या घरी जात होतो. नावे मिळवायला पंचाईत. पुष्कळसे पती आपल्या बायकांची नावे स्वत: सांगायला लाजत. ''तू सांग तुझे नाव'' ते म्हणत. आपणात नवराबायकांनी एकमेकांची नावे होता होईतो घेऊ नयेत अशी रूढी आहे. त्या रुढीत एक प्रकारची गोडी आहे. पतीचे नाव म्हणजे पत्नीची मोठी ठेव. पत्नीचे नाव म्हणजे पतीची धनदौलत. जे आपणास अत्यंत प्रिय असते, त्याची वाच्यता आपण फारशी करीत नाही. जे अति मोलाचे असते ते आपण फार खोल ठेवून देतो. घरातील पैठणी, पितांबर एखादे वेळेस उन्हात घालून लगेच ती बासनात बांधून ठेवायची. एखादे वेळी ती नेसायची. त्याप्रमाणे पत्नीने पतीचे नाव किंवा पतीने पत्नीचे नाव क्वचित् अत्यंत आनंदाचे वेळी घ्यावयाचे.

एखादे कोणाचे लग्न असले; कोणाकडे मंगळागौर असली, हळदीकुंकवाचा वसंतोत्सव आला तर त्या दिवशी मोठमोठ्या बायकाही उखाणे घेऊन नावे घेतात. मोठी मौज असते ती.

परंतु अशी या रूढीत गोडी असली तरी वेळ आली म्हणजे नाव सांगितले पाहिजे. कोठे नवरा घरात नसला म्हणजे तर आमची फारच त्रेधा. पत्नी नाव सांगायची नाही. घरात मुले असली म्हणजे त्यांना ती नाव सांगायला सांगे. पुष्कळ वेळा मुले लहान असत.

''सांग रे त्यांना नाव.'' आई मुलाला म्हणे.

''सांग बाळ तुझ्या वडिलांचे नाव.'' आम्ही त्याला म्हणू.

''बाळ.'' असे तो बाळ सांगे.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) ... ग्रंथालय

कधी मुलगा स्वत:चे नाव सांगे. त्यावरून पित्याचे नाव कळे; परंतु पित्याच्या पित्याचे नाव काय? मग कधी शेजाऱ्यांना विचारावे. त्यांची लहर लागली तर ते सांगत. सार्वजनिक कामात मदत करणे हे आपणास अद्याप शिकावयाचे आहे. पूर्वी आपणास ही सवय असेल; परंतु पारतंत्र्यात सारेच पुन्हा नव्याने शिकावे लागते. पारतंत्र्य सर्व-गुण-भक्षक आहे. मौज ही की ते गुण पुन्हा बऱ्याचशा जनतेने अंगी आणल्याशिवाय पारतंत्र्य नष्टही होत नाही. पारतंत्र्य गुणांना मारते. त्याच पारतंत्र्यात ते जावे म्हणून सद्गुणांची जोपासनाही फार करावी लागते. साधे शेजाऱ्याचे नाव सांगा आम्ही म्हटले तर, "आम्हाला नाही माहीत. आम्हाला नकोत दुसऱ्याच्या उठाठेवी. दुसऱ्याला कोणाला विचारा की." अशी उत्तरे मिळत.

आम्हाला शंभरच घरे तपासावयाची; परंतु घरांतून बिऱ्हाडे कितीतरी असत. त्यामुळे हे काम पटकन् आटोपण्यासारखे नव्हते. एके ठिकाणी एका बाईने विचारले,

"बायकांना शिकविणार का? मोठाल्याही बायकांना?"

"पुढे शिकवायची काय योजना होणार आहे ते आम्हाला माहीत नाही." आम्ही सांगितले.

"आम्हालाही शिकवा. दिवसा आम्हाला नाही वेळ. रात्रीचे शिकवा. आम्ही येऊ रात्री. शिकल्याशिवाय फुकट सारे. त्या दिवशी एक घर मला पाहिजे होते. चिठ्ठीवर घर नंबर टिपून घेतला होता. परंतु वाचणारा कोणी भेटला तर ना? कोणी वाचीना व घर नंबर दाखवीना. उन्हातून दोन तास तळमळत हिंडले. शंभरदा मनात आले, मी शिकले असते तर!" ती बाई म्हणाली.

मित्रांनो, पुष्कळ बायकांना लिहावाचायला यावे अशी इच्छा असते. एकदा मी कोकणात गेलो होतो. माझी एक चुलत चुलती आपल्या लहान मुलीला म्हणत होती, "कमळे, तू तरी शीक हो पुष्कळ. अडाणी नको राहू. काल श्याम किती छान छान सांगत होता देवळात. परंतु आम्हाला सगळे समजेना. वाईट वाटे." मी तिचे शब्द दुरून ऐकत होतो. स्त्रियांच्या मनाच्या भुका कोणाला कळणार, कोणाला समजणार?

माझी बहीण लहानपणी शिकली होती लिहावाचावयास; परंतु पुढे सासरी सवय नाही. त्यामुळे ते विसरून गेली. ती एकदा मला म्हणाली, "श्याम, मला तसे पटकन येईल लिहावाचावयास. थोडी सवय केली पाहिजे. म्हणजे मग तुझी पुस्तके मी वाचीन. या मुली केव्हा वाचून दाखवतील अशी वाट पाहायला नको. कितीदा वाटते की, तुझी

पुस्तके स्वत: वाचावीत म्हणून. लोक वाचतात परंतु तुझ्या अक्काला नाही येत वाचता.''

केव्हा बरे हा ज्ञानाचा आनंद आपल्या देशातील सर्वांस प्राप्त होईल? विवेकानंद या कल्पनेने रडत; माझ्या देशातील माणसे पशू झाली, ती माणसे केव्हा होतील असा विचार मनात येऊन तो थोर संन्यासी तडफडे.

एकदा रवींद्रनाथ ठाकूर रशियात गेले होते. शेतकऱ्यांच्या म्हाताऱ्या म्हाताऱ्या बायकाही उत्सुकतेने शिकत होत्या. रवींद्रनाथांचे हृदय उचंबळून आले. आपल्या देशात असा देखावा केव्हा बरे दिसेल? चंद्रमौळी झोपड्यांतून इतर काही नसले तरी चंद्राचा, सूर्याचा प्रकाश जातो, त्याप्रमाणे ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र केव्हा जाईल, असे त्यांच्या मनात आले.

''तुमच्या देशातील सर्व बायका सुशिक्षित आहेत का? लिहावाचायला येते का त्यांना?'' एका रशियन शेतकरणीने या कविसम्राटाला विचारले.

''माझ्या देशात घोर अज्ञान आहे. शेकडा नव्वदाहून अधिक बायका अज्ञानात आहेत. ज्या देशात शेकडा ९० पुरुषही निरक्षर आहेत, तेथील बायकांविषयी तर बोलायलाच नको.'' कविवर म्हणाले.

''आम्ही येऊ तुमच्या देशातील भगिनींना साक्षर करायला?'' ती वृद्ध नारी म्हणाली.

भारतातील गुरुदेव खाली मान घालून उभे राहिले. आज भारत खाली मान घालून उभा आहे. स्वातंत्र्य असले म्हणजे राष्ट्रात इच्छा असली तर चमत्कार करता येतात. इंग्रजांचा जर सर्वांत मोठा घोर अपराध या देशासंबंधी कोणता असेल तर त्यांनी हे महान् राष्ट्र दीडशे वर्षे अज्ञानात ठेवले हा होय. त्यांनी आमची शस्त्रे घेऊन आम्हास पंगू केले. शरीर मारले. आम्हास अज्ञानात ठेवून आमचे मन मारले.

अज्ञानी शेतकरी सज्ञान झाला तर तो जमीनदारांचा जुलूम मुकाट्याने कसा सहन करील? सावकारांचा अमानुष अन्याय कसा पाहील? कामगार जर सज्ञान झाला, जगातील हालचाल पाहू लागला तर तो मालकांचा मगरूरपणा कसा गप्प राहून सहन करील? ज्ञान माणसाला माणुसकी देऊ पाहात असते. ज्ञानामुळे निर्भयता येते. आम्हीही या देशात तेच केले होते. स्त्रिया, क्षुद्र वगैरेस ज्ञानाचा अधिकार ठेवला नाही. ज्याला ज्ञानाचा अधिकारही पोहोचत नाही त्याला माणुसकीचाही अधिकार मिळत नाही.

परंतु केवळ ज्ञानवता माणुसकी देते असेही नाही. ज्ञान म्हणजे अग्नी. अग्नी जाळीलही किंवा रसोयई करून साहाय्यही करील. तरवार तारतेही व मारतेही. युरोपातील राष्ट्रांतून साक्षरता आहे, यावरून तेथे संपूर्ण माणुसकीचा विकास झालेलाच असेल असे नाही. जगातील अन्य राष्ट्रांस गुलाम करू पाहणारी युरोपातील जनता, ती साक्षर असली तरी राक्षसीच ठरेल.

माणुसकीचा विकास अनेक रीतींनी होत असतो. निरनिराळी माणसे निरनिराळ्या समाज-विकासाच्या भिन्नभिन्न पायऱ्यांवर असतात. भारतीय समाजात साक्षरता नसली तरी दुसऱ्या काही गोष्टींचा अधिक विकास झालेला असेल.

एकदा युरोपातील सुधारणेच्या शिखरावरचा एक साहेब तिबेटात गेला होता. एके दिवशी तो हातात बंदूक घेऊन बाहेर पडला. प्रात:काळची वेळ होती. सुंदर मंगल वातावरण होते. मंद वारा वाहत होता. पाखरे निर्भयपणे व जगावर विश्वास टाकून किलबिल करीत होती. त्या साहेबाला एक सुंदर पक्षी दिसला. त्या पक्ष्याला पाहून त्याचे मन उचंबळले नाही. त्याला त्या पक्ष्याची शिकार करावी असे वाटले.

''साहेब, त्या पक्ष्याला मारू नका. हा जर मेला असे मादीला कळले तर ती टाहो फोडील. पक्ष्यांची ही जात मोठी थोर आहे. त्यांच्यात एकपत्नीव्रत आहे, एकपतिव्रत आहे. नर मेला तर मादी ओरडत राहते व मादी मेली तर नर विलाप करीत राहतो. नका मारू साहेब.'' बरोबरचा मनुष्य म्हणाला.

साहेब हसला. त्याने त्या पक्ष्याला लीलेने मारले. तो पक्ष्याचा मृतदेह त्याने आपल्या पिशवीत भरला. तो पक्षी त्याच्या पोटात जाणार होता, का त्याच्या अंगात पेंढा भरून तो दिवाणखान्यात ठेवला जाणार होता? विज्ञानाच्या शिखरावर बसलेल्या साहेबाला त्या पक्ष्यांच्या जीवनातील सुंदरता पाहण्याचे डोळे नव्हते. त्या पक्ष्यांची प्रेमनिष्ठा पाहून मानवाने प्रणाम करायला हवा, परंतु मानवाने त्याला गोळी घातली. चिनी मनुष्य, तो तिबेटी मनुष्य विज्ञानवान् नसेल; परंतु त्याला त्या पक्ष्याला मारवले नसते, त्या पक्ष्याविषयी त्याच्या मनात आदर होता.

साहेब सुधारलेला का तो तिबेटी सुधारलेला? विकासाच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर ते उभे होते. एकाच्या विशिष्ट गुणधर्माचा, विशेष मन:प्रवृत्तीचा विकास झालेला होता, दुसऱ्याच्या दुसऱ्या. जगात शेवटी कोणी कोणाला हसावे? प्रत्येकाने प्रत्येकापासून काही घ्यावे व जीवन परिपूर्ण करावे. तू माझा गुरू व मी तुझा गुरू.

भारतवर्ष युरोपचा गुरू. युरोप भारताचा गुरू. राम राम. तू राम व मीही राम. तूही मंगल व मीही मंगल. मीही ब्रह्म व तूही ब्रह्म. अहं ब्रह्मास्मि मी नुसते म्हणेन तर अहंकारात पडेन त्याबरोबर 'तत्त्वमसि' या मंत्राचेही स्मरण हवे.

मी कोठेतरी वाहावत गेलो. काही असो. साक्षर व विज्ञानसंपन्न राष्ट्रांजवळ माणुसकी कमी असली तरी तो ज्ञानाचा दोष नव्हे. श्रीमंत असून नम्र असण्यात मोठेपणा आहे. आपण ज्ञानाने श्रीमंत होऊया, ज्ञानविज्ञानसंपन्न होऊया त्याचबरोबर माणुसकीही हृदयात व जीवनात पुजू या.

''आम्ही ती साक्षर-निरक्षरांची शिरगणती केली. सर्व पेठांतून काम झाले. स्वयंसेवकांना म्युनिसिपालटीतर्फे अल्पोपहार देण्यात आला. न्यू इंग्लिश स्कूलच्या भव्य इमारतीत तो गोड समारंभ झाला. हरिभाऊ आपटे आले होते. त्या दिवशी मी त्यांना प्रथम पाहिले. 'उष:काल' व 'पण लक्षात कोण घेतो' यांच्या जनकास पाहिले. ती सौम्य मूर्ती मी पाहिली. तोंडावर एक प्रकारची मंदस्मितता होती. त्यांनी लहानसे भाषण केले व शेवटी म्हणाले, ''नुसते शाब्दिक आभार मानून काय उपयोग?''

बोलाचीच कढी बोलाचाच भात
जेवूनिया तृप्त कोण झाला

असे श्री तुकाराम महाराजांनी म्हटले आहे. हे लक्षात घेऊन आणि तुम्हा मुलांचा स्वभाव लक्षात घेऊन थोडे च्याऊ म्याऊ ठेवले आहे. त्या खोल्यांतून थोडा चिवडा, केळी वगैरे वस्तू आहेत त्यावर तुटून पडा.'' आणि मोठे झालात म्हणजे आपल्या देशातील अपरंपार अज्ञानावर तुटून पडा.''

असे ते लहानसे भाषण झाले. निदान शेवटचा हा गोड भाग मला आठवत आहे. तो त्यांनी म्हटलेला अभंगाचा चरण व त्यांचे त्या वेळचे हास्य डोळ्यांसमोर आहे. आम्ही त्या खाद्यवस्तूंचा फन्ना पाडला. परंतु आपण अज्ञानाचा फन्ना केव्हा उडवणार? केव्हा ही अनंत स्फूर्ती भारतीय तरुणतरुणांत उत्पन्न होणार? ध्येयार्थी लोक ज्या देशात अधिक निपजतात ते देश वैभवावर चढतात, त्यांना मोठेपणा मिळतो, त्यांना गौरव प्राप्त होतो. त्यागानेच अमृतत्त्व मिळते हा सनातन नियम आहे!

+++

स्वराज्याच्या मंत्राचे ऋषी

महायुद्ध सुरू होते. लोकमान्य टिळक मंडालेहून सुटून आले होते. पुनःश्च त्यांनी मिळते घेऊन राष्ट्रीय सभेत प्रवेश केला होता. राष्ट्रीय सभेला त्यांनी कधी सोडले नाही. दुबळ्याप्रमाणे दूर राहून राष्ट्रीय सभेला मारण्याचे पाप त्यांनी कधी केले नाही. मी त्या सभेत शिरेन. मी माझ्या पक्षाची संघटना करीन. माझ्या विचारांचा पगडा एक दिवस तेथे बसवीन, अशा आत्मविश्वासाने ते वागत.

ज्याच्या पाठीमागे प्रचार, संघटना त्याचे बळ. महायुद्धात हिंदुस्थानने मदत केली. त्याचे हिंदुस्थानला कोणते फळ? हिंदुस्थानला स्वराज्य द्या, स्वायत्तता द्या असे हिंदी पुढारी म्हणू लागले. स्वयंनिर्णय हा एक नवीन शब्द त्या वेळेस जन्माला आला. आपल्या राष्ट्रात कशा प्रकारचे सरकार असावे ते ठरविण्याचा अधिकार त्या त्या राष्ट्रातील जनतेचा आहे. या तत्त्वाचा अध्वर्यू अमेरिकेचा अध्यक्ष वुइल्सनसाहेब हा होता.

डॉ. ॲनी बेझंट यांनी हिंदुस्थानात स्वराज्याची चळवळ सुरू केली. बेझंटबाईंनी हिंदुस्थानची खूप सेवा केलेली आहे. हा देश त्यांनी आपला मानला. हिंदूधर्म, संस्कृती

व तत्त्वज्ञान यांचा त्यांनी खूप अभ्यास केला. त्यावर नाना ग्रंथ लिहिले. त्यांनी थिऑसफी पंथ काढला. एक काळ असा होता की, हिंदुस्थानातील श्रीमंत व धीमंत या पंथात सामील झालेले होते. बेझंटबाईंनी केलेले गीतेचे इंग्रजी भाषांतर त्या वेळी प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ असे. मोठे गोड होते भाषांतर. लाखो प्रती त्याच्या खपल्या. बेझंटबाई आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या. त्यांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न हाती घेतला. त्यांच्या कल्पनेला लोकमान्य टिळकही मिळाले. हिंदुस्थानभर स्वराज्य संघाच्या शाखा काढण्याचे ठरले. लोकमान्यांनी बृहन्महाराष्ट्रभर दौरा काढला. वातावरणात तेज येऊ लागले.

पुण्याच्या किर्लोस्कर नाटकगृहात सभा भरावयाच्या. सांगलीचे दे. भ. छापखाने, मुंबईचे हॉर्निमन्, श्री. सरोजिनी नायडू, डॉ. ॲनी बेझंट वगैरेंची व्याख्याने ऐकण्याचे भाग्य मला मिळाले. सरोजिनीदेवी आल्या होत्या त्या दिवशी किर्लोस्कर नाटकघरात कोण गर्दी! दारात उभे राहून, माना उंच करून आम्ही पाहात होतो. ऐकू न आले तरी मूर्ती पाहण्याची इच्छा असते. लहान मुलाला आईचे बोलणे समजत नसेल, परंतु आईला पाहून त्याला आनंद होतो. प्रथम दर्शन व मग श्रवण.

सरोजिनी देवींना नामदार गोखले भारताचा बुलबुल म्हणत, भारताचा चंडोल म्हणत! त्यांचा आवाज गोड. त्यात एक प्रकारची नादमधुरता आहे. आवाजाची देणगी व काव्यमय आत्म्याची देणगी! राष्ट्रीय सभेचे अधिवेशन असले म्हणजे शेवटी आभार मानण्याचे काम बहुधा या धीर कवयित्रीकडे असते. सरोजिनीदेवी म्हणजे भारताचे ऐक्य. त्या आहेत बंगाली. त्यांचा विवाह झाला मद्रासी पुरुषाशी. त्यांचे वास्तव्य दक्षिण हैदराबादला. त्या उत्कृष्ट उर्दू बोलतात. हिंदूमुस्लीम ऐक्याच्या या मोठ्या पुरस्कर्त्या. ना. गोखले यांनी मरता मरता ते काम सरोजिनीस सांगितले होते.

त्यांचे भाषण फारसे ऐकू आले नाही; परंतु थोडे ऐकू आले व ते जन्मभर पुरण्यासारखे आहे. सुताने स्वर्गास जाता येते. त्या अल्पश्रवणाच्या आधाराने सर्व व्याख्यानाचा आत्मा मिळवता येत होता.

"गुलाम राहण्यासाठी भारतवर्ष जगला नाही. अनेक राष्ट्रे काळसमुद्राच्या लाटांवर आली, क्षणभर फेसाप्रमाणे चमकली व पुन्हा गडप झाली; परंतु हा प्यारा भारत उभा आहे. अधिकच उज्ज्वल भविष्यासाठी उभा आहे. वनस्फूर्तीने तो थरथरत आहे. नवसामर्थ्य त्यांच्यात संचारत आहे. स्वराज्य! स्वराज्य आपल्याजवळ आहे,

जर त्याची खरोखरच आपणास तहान असेल. तहान लागल्यावर कावळासुद्धा प्रयत्न करून पाणी पितो. एकेक खडा टाकून खोल असलेले पाणी वर आणतो. आपण का कावळ्यापेक्षा कमी किमतीचे? आपणास का ते जवळ आणता येणार नाही? आपण आपल्या प्रयत्नांचे खडे नाही का आणणार? प्रयत्नांचे घडे भरभरून नाही का भारतमातेच्या चरणी अर्पिणार? स्वातंत्र्योन्मुख राष्ट्राची स्फूर्ती कोणी मारू शकणार नाही. कोट्यवधी जनतेच्या हृदयातील ज्योत कोणालाही विझवता येणार नाही!''

अशा आशयाचे ते भाषण होते. गर्दीमध्ये पुढेमागे आम्ही ढकलले जात होतो. भावनांच्या समुद्रावर आमचा आत्माही नाचत होता. मी भाषणे ऐकायला बहुधा जात असे. होता होईतो टाळीत नसे. एकदा डॉ. ॲनी बेझंट यांचे भाषण ऐकले. लोकमान्य टिळक अध्यक्ष होते. बेझंटबाईंचे ते संन्यासी रंगाचे रेशमी पातळ होते. डोळ्यांना चष्मा होता. किती सुंदर होते ते भाषण! त्यांच्या भाषणातील शेवटचे वाक्य माझ्या कानात घुमत आहे!

''केव्हा पाहीन, स्वातंत्र्याच्या स्वर्गात गेलेला भारत मी केव्हा पाहीन!''

या शेवटच्या वाक्याच्या वेळचा त्यांचा आविर्भाव, त्यांचे कापरे शब्द, या सर्वांचा एक प्रकारचा विलक्षण परिणाम झाला.

लोकमान्यांचा तो चिरस्मरणीय खानदेश, वऱ्हाडाकडील दौरा झाला. त्या वेळचे वृत्तपत्राचार्य श्री. अच्युत बळवंत कोल्हटकर यांचे संदेश पत्र आम्ही नुसते पीत असू. मी लवकर वाचनालयात जात असे व संदेश प्राशीत असे. लोकमान्यांची ती श्यामल मूर्ती व तिचे अच्युतरावांनी केलेले ते हृदयस्पर्शी वर्णन. ते वर्णन स्मरूनही अंगावर रोमांच उभे राहतात. ठिकठिकाणी लोकमान्यांच्या गाडीचे घोडे सोडून त्यांची गाडी लोक आपण होऊन ओढीत. देवांचे रथ आपण ओढतो. राष्ट्रपुरुष म्हणजेच देव! स्वत्त्व विसरून जनताजनार्दनात जे मिळाले तेच आमचे भगवंत. लोक लोकमान्यांचा रथ ओढीत याचा अर्थ काय? याचा अर्थ असा की, राष्ट्राचा गाडा ओढावयास लोक तयार होत होते. लोकमान्य म्हणजे काही साडेतीन हात मूर्ती नव्हे. लोकमान्य म्हणजे कोट्यवधी भारतीयांच्या आशाआकांक्षा, भारताचे स्वातंत्र्य, भारताचा गौरव, भारताचे वैभव! लोकमान्यांचा रथ ओढणे म्हणजे भारतमातेचा रथ ओढणे.

नाशिकला लोकमान्यांच्या पायावर एका मातेने आपले मूल कसे वाहिले? दूरदूरच्या खेड्यांतून हजारो शेतकरी त्यांच्या दर्शनार्थ कसे येत, एकाने चार आणे

स्वराज्य फंडाला कसे दिले ते सारे वाचताना माझे मन सद्गदित होत असे. स्वराज्य फंडाला लोकमान्यांनी एक लाख रुपये दौऱ्यात जमा केले. उघड उघड स्वराज्याच्या कामाला थैल्या अर्पण केल्या जात होत्या. त्यात निर्भयता होती. आता उघड मदत राष्ट्रसेवेसाठी होऊ लागली. त्या वेळी एक लाख रुपये जमवणे अपूर्व वाटले. पुढे महात्माजींनी कोटीचे संकल्प पार पाडले. पहिले पाऊल कठीण असते. लहान मूल एक पाऊल चालले तर धन्यता वाटते. परंतु तेच मूल पुढे पाच–दहा वर्षांत अनेक मैलांची सफर करून येते.

लोकमान्यांचा तो दौरा अपूर्व झाला. प्रचंड जागृती झाली. तिकडे ॲनी बेझंटबाईंना स्थानबद्ध करण्यात आले; परंतु राष्ट्रीय सभेचे अध्यक्षपद त्यांनाच देण्यात आले. ॲनी बेझंट मुक्त झाल्या. १९१७ च्या डिसेंबरात कलकत्त्याची अपूर्व राष्ट्रीय सभा भरली. कविश्रेष्ठ गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर हे त्या वेळेस स्वागताध्यक्ष होते. रवींद्रनाथांची त्या वेळेस आंतरराष्ट्रीय कीर्ती होती. गीतांजलीला नोबेल पारितोषिक मिळून त्यांचे नाव दिगंत गेले होते. रवींद्रनाथ राष्ट्रसेवेत पडले. त्यांनी सुंदर भाषणे केली, लेख लिहिले. इंग्रजी राज्यतंत्रावर टीका केली. त्यामुळे त्यांचे परदेशी मित्र जरा रागावले. रवींद्रनाथांनी त्यांना उत्तर दिले, ''तुमची मैत्री, तुमचा स्नेह याचा अर्थ हा का, की भारत गोऱ्यांचा गुलाम असणे? त्या स्नेहाला काय अर्थ? जो स्नेह मानव्याला पोषक नाही, न्यायाला पोषक नाही, उदात्त ध्येयाला उचलू शकत नाही, पाठिंबा देऊ शकत नाही, तो स्नेह नसून द्रोह आहे.'' रवींद्रनाथ अध्यक्ष होऊ नयेत म्हणून नेमस्त पक्षाने कारवाई केली; परंतु शेवटी तेच झाले.

ॲनी बेझंट बाईंचे स्फूर्तिदायक भाषण होते. स्वातंत्र्य म्हणजेच धर्म असे त्या म्हणाल्या. स्वातंत्र्याशिवाय विकास नाही. राष्ट्रातील जनतेच्या गुणधर्मांचा विकास पारतंत्र्यात होत नाही. पारतंत्र्य म्हणजे ईश्वराचा द्रोह. देवाने दिलेल्या बुद्धीच्या देणग्या पारतंत्र्यामुळे मातीमोल होतात. स्वराज्य दुसऱ्या कोणावर कुरघोडी करण्यासाठी नको आहे. स्वतःच्या विकासासाठी ते हवे आहे. तेहतीस कोटी जनतेचा विकास अडवून ठेवणे याहून घोरतम अपराध कोणता?''

१९१८ साल उजाडले. हिंदुस्थानला सरकार काही देणार असे सांगण्यात येऊ लागले. मुंबईत जादा काँग्रेसचे अधिवेशन झाले व इंग्लंडमध्ये शिष्टमंडळ पाठविण्याचे ठरले. मुंबईची काँग्रेस संपल्यावर देशबंधू चित्तरंजन दास, अमृत बझार पत्रिकेचे

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

संपादक श्री. मतिलाल घोष, बिपिनचंद्र पाल, मद्रासचे कस्तुरीरंग अय्यंगार वगैरे थोर थोर पुढारी पुण्यास आले. लोकमान्यांकडे ते सारे उतरले होते. गायकवाड वाड्यात प्रचंड सभा झाली. लोकमान्य अध्यक्ष होते. अरविंद घोष यांचा खटला चालवून विख्यात झालेले, बापाने दिवाळे काढल्यावरही सावकारांचे सर्व ऋण सव्याज फेडून टाकणारे चित्तरंजनदास यांची धीरगंभीर मूर्ती पाहून पावन वाटले. बिपिनचंद्र पाल हे तर १९०७-०८ सालातील ''लाल बाल पाल'' या त्रयीतील एक महान् देशभक्त. मद्रासच्या समुद्रतीरावरची त्यांची त्या वेळची स्वदेशीवरील व्याख्याने ऐतिहासिक होऊन राहिली आहेत. समुद्रावर लाटा उसळत असत व बिपिनबाबू मद्रासी बंधुभगिनींच्या हृदयात देशभक्तीचा सागर उसळवीत असत. जणू बिपिनबाबूंची गर्जना ऐकून सागरही मोहवे व नाचत नाचत पुढे येई.

बाबू मतिलाल घोष अशक्त व आजारी होते. ते सभास्थानी आरंभापासून नव्हते. ते मागून आले. त्यांची मूर्ती कृश होती. ते आले व लोकमान्य त्यांना कडकडून भेटले. श्रोत्यांच्या डोळ्यांतून तेव्हा प्रेमाश्रू आले. दोन थोर पुरुषांची भेट म्हणजे एक अपूर्व वस्तू असते.

''सता सद्भिः संगः कथमपिहि पुण्येन भवति।'' चैतन्य चैतन्याला, ध्येय ध्येयाला जणू भेटत असते.

मतिलाल घोष हे अमृतबझार पत्रिकेचे संपादक म्हणून माहीत आहेत. मतिलाल यांना आपण मोतिलाल म्हणून ओळखतो. परंतु त्यांचे नाव मतिलाल असे आहे. बंगाली लोक 'अ' चा उच्चार थोडा 'ओ' सारखा करतात. इंग्रजीत अरविंद याचे Aurobind असे लिहितात. या इंग्रजीमुळे आपण भारतीय नावेही इंग्रजी केली आहेत. बंदोपाध्याय याचे बॅनर्जी झाले, चट्टोपाध्याय याचे चतर्जी झाले. वसईचा तह याला बंगाली विद्यार्थी किंवा महाराष्ट्रेतर विद्यार्थी बसैनचा तह असे म्हणतात. कारण वसईचे इंग्रज लोकांनी Bassein असे रूप लिहिले. आपण प्लासीची लढाई म्हणतो परंतु त्या गावाचे नाव पलाशी असे आहे. बंगाली कवी नवीनचंद्र सेन यांनी ''पलाशीर युद्ध'' म्हणून महाकाव्य लिहिले आहे. आपण गंगा असे इंग्रजीत लिहिणार नाही. गँजिस असे लिहू. मथुरा असा इंग्रजी पत्ता लिहिताना 'मुत्रा' असे लिहू. इंग्रजांना हिंदी नावाचा नसेल उच्चार करता येत तर नसेल. आपण गंगा लिहिताना इंग्रजीत गंगा असेच लिहावे. मथुरा शब्द मथुरा असाच लिहावा. वसई वसई असेच लिहावे. चंबळा नदीचे मूळ सुंदर

नाव चमेली असे आहे. महाराष्ट्रीय इतिहासाच्या कागदपत्रांतून "चमेली पार झालो" असे उल्लेख आहेत. किती गोड नाव! परंतु परक्यांनी चमेलीचे चंबला केले. आम्ही तेच म्हणू लागलो. रवींद्रनाथ ठाकूर यांचे रवींद्रनाथ टागोर असे झाले! असो. मतिलाल घोष व लोकमान्य टिळक यांची ती भेट म्हणजे रामभरतांची भेट वाटली. लोकमान्यांचा केसरी व बंगालमधील अमृतबझार पत्रिका या दोन पत्रांनी अर्वाचीन भारताचा बराचसा इतिहास घडविला आहे. केसरी पत्रापूर्वी अमृतबझार पत्रिका निघाली.

आपणास मतिलाल घोष माहीत आहेत; परंतु त्यांचे थोर वडील बंधू शिशिरकुमार घोष हे फारसे कोणाला माहीत नाहीत. अमृतबझार पत्रिका त्यांनी १८६८ मध्ये प्रथम सुरू केली. १८५८ मध्येच वयाच्या १८ व्या वर्षी त्यांनी ५० लाख निळंकर मजुरांचा अनत्याचारी लढा लढवून गोऱ्या नीळवाल्या जमीनदारास चंबूगबाळे आटोपून जाण्यास भाग पाडले. लाख लाख किसानांच्या सभा त्यांनी १८८६ मध्ये घेतल्या. बहुजन समाजाला दूर ठेवाल तर काही होणार नाही असे काँग्रेस स्थापणाऱ्या ह्यूम साहेबांस व इतर बड्या देशभक्तांस त्यांनी सांगितले. लोकमान्य टिळकांचे ते जणू राजकीय व वर्तमानपत्रांच्या धंद्यातील गुरू. लोकमान्य एकदा म्हणाले, "शिशिरकुमारांना मी वडिलांप्रमाणे पूज्य मानी व तेही मजवर पुत्रवत् प्रेम करीत. त्यांच्या चरणांशी बसून मी मौल्यवान धडे घेतले आहेत." अर्वाचीन हिंदी राष्ट्रीयत्वाचे शिशिरकुमार हे पहिले आचार्य.

लोकमान्यांबद्दल मतिलाल यांना व मतिलालांबद्दल लोकमान्यांना या संबंधामुळे अपार प्रेम वाटे. ते प्रेम शब्दांत वर्णन करता येण्यासारखे नाही. त्यांनी एकमेकांस तेथे व्यासपीठावर क्षेमालिंगन जेव्हा दिले तेव्हाचा तो प्रसंग अपूर्व होता; हृदय उचंबळविणारा होता. ज्यांनी तो पाहिला ते धन्य होत!

✦✦✦

मानमोडी

मित्रांनो, ब्रिटिशांची सत्ता आपल्या देशात दृढ झाल्यापासून आपले फायदे काय झाले ते मला तरी सांगता येत नाहीत; परंतु सहस्त्रावधी तोटे झाले ते पर्वताप्रमाणे डोळ्यांसमोर उभे राहतात. आपण नि:शस्त्र केले गेलो. आपले पौरुष मारले गेले. आपला आत्मा खच्ची करण्यात आला. आपण लुळे व बुळे झालो. सदासर्वदा सरकारच्या तोंडाकडे पाहणारे आपण झालो. आपली कर्तृत्वशक्ती गेली. आपले धैर्य गेले. पोलीस हा आपला राजा झाला. वाघाशीही झुंज घेणारे पोलीस पाहून भिऊ लागले. पोलीस हा परमेश्वर. तो मागेल ते द्यावे. तो म्हणेल तेथे यावे. आपण गाईहून गाई झालो. गायही पिळून पिळून शेवटच्या थेंबापर्यंत दूध काढणाऱ्याला लाथ मारते. परंतु आपणात रामच उरला नाही. बस म्हटले की बसावे, ऊठ म्हटले की उठावे, अशी जनतेची स्थिती झाली. ब्रिटिशांच्या सत्तेने माणसांची मेंढरे केली. काँग्रेस मायमाउलीने अवतार घेतला. तिने पुन्हा माणुसकी दिली. ब्रिटिश सत्तेमुळे माणसांची माणुसकी गेली. उद्योगधंदे सारे बुडाले. बुडविण्यात आले. जेथे सोन्याचा धूर निघे तेथे रडण्याचा सूर घरोघर निघू लागला. कोट्यवधी लोक बेकार झाले. अर्धपोटी लाखो राहू लागले.

बेकारी वाढली, त्याबरोबरच दुष्काळही वाढले. पूर्वी शंभर वर्षांत एखादा दुष्काळ पडे तर आता दरसालच जणू दुष्काळ. दुष्काळात टिकाव धरणे कठीण होऊ लागले. लोकांत त्राणच उरले नाही. जरा पावसाने डोळे वटारले की जनतेचे डोळे पांढरे होतात. महिनाभर पाऊस न पडला तर लगेच आईबाप चार आण्यांस पोटचे गोळे मिशनरी लोकांना विकू लागतात. बेकारी, दुष्काळ, त्यांचेबरोबरच नवीन नवीन व्यसने व नवीन नवीन रोगही आले. जुगार रूढ झाले. दारू गावोगाव झाली. प्लेग, कॉलरा, इन्फ्लुएन्झा आले. भांडणे वाढली. आमच्यामध्ये भेद पाडण्यात आले. नोकरीशिवाय दुसरा उद्योगधंदा नसल्यामुळे हे भेद आणखीच वाढले. हिंदूमुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्यास्पृश्य या सर्वांच्या मुळाशी पोटापाण्याचा प्रश्न आहे. तुला नोकरी की मला? तुझ्या लोकांना किती प्रमाणात, माझ्या लोकांना किती प्रमाणात? याच गोष्टीला महत्त्व आले. कर्तृत्वाला वावच कोठे उरला नाही. असा हा राष्ट्राचा अंतर्बाह्य नाश या दीडशे वर्षांत झाला.

मला हे सारे आज का आठवते आहे? कारण आज मी तुम्हाला १९१८ सालातील मानमोडीच्या रोगाची अंगावर शहारे आणणारी हकिकत सांगणार आहे. १९१४ ते १९१८ युरोपात महायुद्ध चालले होते. हिंदुस्थानचे दहा लाखांवर लोक त्या लढाईत लढत होते. दरिद्री हिंदी राष्ट्राकडून कोट्यवधी रुपये घेण्यात आले; परंतु या दुर्दैवी राष्ट्राला त्याचा मोबदला काय मिळाला? युरोपखंडातील चिमुकल्या बेल्जम देशाच्या संरक्षणासाठी, त्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी हिंदी राष्ट्र लढले. हिंदी राष्ट्राला स्वातंत्र्य मिळाले का? आम्हाला जालियनवाला बागेतील गोळीबार मिळाला. दुसऱ्यांच्या स्वातंत्र्यासाठी आम्ही मरावे, आमची बेडी मात्र कायम राहावी! अरेरे! त्या मागील महायुद्धात आमचे शूर शिपाई मेले म्हणून लहान लहान दगड सरकारने मेलेल्या हिंदी शिपायांच्या स्मारकासाठी उभारले; परंतु आम्हाला भाकरी मात्र दिली नाही. राष्ट्र भाकरी मागू लागताच पोटात गोळ्या गेल्या. जालियनवाला बागेतील गोळीबार ही एक देणगी आपणास मिळाली आणि दुसरी देणगी मानमोडीच्या साथीची. जे लोक परदेशातून परत आले, जे शिपाई परत आले, त्यांनी हा नवीन रोग आपल्याबरोबर आणला. पूर्वी १८९७ मध्ये प्लेग परदेशातून आला. पुन्हा २० वर्षांनी नवीन एक रोग आला. त्याला इन्फ्लुएंझा म्हणत; परंतु प्रतिभाशाली हिंदी जनतेने त्या रोगाला

मानमोडी हे यथार्थ नाव दिले. अगडबंब संस्कृत प्रतिशब्द बनविणाऱ्या पंडितांना असे सुटसुटीत अर्थपूर्ण नाव देता आले नसते.

१९१८ सालातील नोव्हेंबर महिना असेल. नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात तर या नवीन रोगाने हिंदुस्थानभर कहर माजविला. या रोगाने जेव्हा पहिला हल्ला चढविला तेव्हा लोक गळून जात, परंतु मरत नसत. त्या पहिल्या हल्ल्यात मी व राम सापडलो होतो. चारपाच दिवस ताप यावयाचा; परंतु ताप निघाल्यावर चालवत नसे. जणू चार महिने ताप येत होता, इतकी अशक्तता त्या तापाने येत असे.

परंतु या पहिल्या हल्ल्यानंतर जो दुसरा हल्ला आला तो अति भयंकर होता. त्यातून मनुष्य वाचतच नसे. हिंदुस्थानभर हलकल्लोळ माजला. पुण्यास आमच्या घरी रामचा मोठा भाऊ अनंता या दुसऱ्या हल्ल्यात सापडला. त्याची सेवाशुश्रुषा आम्ही केली. मोठ्या शर्थीने तो वाचला. पुण्याला रस्त्यारस्त्यात प्रेतयात्राच दिसत. दोनशे, अडीचशे रोजचा मरणाचा आकडा प्रसिद्ध होऊ लागला. आमच्या कॉलेजच्या इमारतीत मोफत रुणालय उघडण्यात आले. कॉलेज बंद झाले. स्वयंसेवक सेवेसाठी नोंदवण्यात येऊ लागले. रामने स्वयंसेवक म्हणून नाव नोंदविले. मला मुंबईस भावाने एकदम बोलावले म्हणून मी मुंबईस निघून गेलो.

मुंबईस रोज सातशेच्या वर लोक मरत होते. ''म्युनिसिपालटी खरा आकडा लावीतच नसेल, हजारांवर मरत असतील,'' असे जनता म्हणे. मृत माणसे न्यावयास चार माणसे मिळत नसत. कोणी कोणाच्या आपल्या मृत माणसास पाठंगुळीस घेऊन स्मशानात जात. कोठे कोठे प्रेत काठीला बांधून दोघेजण लोंबकळवीत नेत. खेड्यापाड्यांतून तर पुष्कळांनी प्रेतांना आपल्या घराशेजारीच अग्नी दिली. कोण येणार, कोण उचलणार?

शहरांतून दुकाने उघडी असत; परंतु खेडेगावांतून दुकाने बंद झाली. सुंठसाखर मिळायची नाही. औषध मिळावयाचे नाही. खेड्यातून पत्र वगैरे मिळेना. टपालवाले आजारी पडले. सारा व्यवहारच जणू थांबला. जीवनच जणू थांबले. मृत्यूचे राज्य सर्वत्र होते. सर्वांची मान मुरगळली जात होती.

त्या तीनचार महिन्यांतील सर्व कथा गोळा केल्या तर कारुण्यसागर उचंबळेल. काही काही कुटुंबांतून सर्वच्या सर्व माणसे मरण पावली. सारी अंथरुणावर पडलेली. अन्नपाणी देण्यास कोणी नाही. आईबाप, मुलेबाळे, बहीणभाऊ, पतिपत्नी सारी

मरणशय्येवर. तो तिच्याकडे बघतो, ती त्याच्याकडे बघते. आई बाळाकडे बघते, बाळ आईकडे बघतो. आपल्या मुलाचे मरणकाळी मिटणारे डोळे माता बघते, परंतु तिला उठवत नाही. मुलाचे मरण पाहून तिला वात होतो. भयाण देखावे! दगडास पाझर फोडणारे प्रसंग!

एका गावी एक कुटुंब होते. त्या कुटुंबातील कर्ता मनुष्य आजारी पडला. त्याची आवडती मुलगी त्याच वेळेस आजारी पडली. ती दुसऱ्या खोलीत होती. बाप सारखे विचारी, बेबीचे कसे आहे? त्याला सांगण्यात येई की बरे आहे. घरात आणखीही मुलेबाळे होती. पित्याच्या हृदयाला धक्का बसू नये, तो कर्ता मनुष्य दगावू नये म्हणून सारी जपत होती. समोर मरण होते. त्या मरणाचे वेळेसही आर्थिक प्रश्न डोकावत होते. ती आवडती मुलगी वातात होती; परंतु ते पित्याला सांगण्यात आले नाही. एक मरो परंतु दहांचा पोशिंदा जगो असे सर्वांस वाटत होते.

परंतु ती लाडकी मुलगी शेवटी मेली. बाबा बाबा करीत ती मेली. पलीकडच्या जरा लांबच्या खोलीत पिता तिची आठवण करीत होता. आपली मुलगी मरणाकडे गेली हे त्याला माहीत नव्हते. मुलीचे मरण त्याला कळवण्यात आले नाही. इतर चिमण्या मुलाबाळांसाठी बाबा जगावे म्हणून ती दुःखदायी वार्ता त्याच्या कानावर घालण्यात आली नाही. आवडत्या मुलीचे मरण कळू नये म्हणून मुकाट्याने तिचा मृतदेह नेण्यात आला. मातेने शोकसागर गिळून ठेवला. तिने हुंदके आवरले. आपल्या लहानग्यास जवळ घेऊन, ''रडू नका. त्यांना बरे वाटू दे.'' असे ती सांगती झाली.

परंतु पिताही वाचला नाही. मुलीचे नाव घेत तोही देवाघरी गेला. मग सारी म्हणू लागली की, मुलीची खरी हकिकत सांगितली असती तर! असे त्या मानमोडीत प्रसंग होते. एके गावी याहूनही भीषण प्रसंग. एक भाऊ बहिणीच्या घरी सर्व आजारी म्हणून तिला मदत करण्यासाठी गेला. बहिणीच्या घरी सारी आजारी. दार उघडायलाही कोणी नाही. दाराला आतून कडी होती. फळ्या उखडून काढण्यात आल्या. भाऊ आत शिरतो तो सारी अंथरुणात. समोरच बहिणीचा चार वर्षांचा मुलगा अंथरुणात गतप्राण होऊन पडलेला होता. कोण होते पाणी द्यायला? कोण होते मांडीवर घ्यायला? सारीच तापात व वातात. ते दृश्य पाहून भाऊ दुःखाने गोठूनच गेला. तो तेथे नुसता उभा राहिला. ना डोळ्यांत पाणी येई, ना काही. पलीकडे बहीण, पलीकडे तिचा पती, ती दोघे वातात बडबडत होती. काय करणार तो भाऊ? प्रिय भाच्याचे ते अंथरुणावर समोर प्रेत!

त्याची आधी व्यवस्था त्याला करावी लागली. मग जिवंतांच्या जवळ त्याला जाता आले.

मानमोडीच्या दुसऱ्या हल्ल्यात लाखो स्त्रिया मेल्या. विशेषत: गरोदर स्त्रिया मरावयाच्या. माझ्या प्रिय वहिनीची आई त्यातच मरण पावली. वैहिनीची आई व माझी आई मैत्रिणी होत्या. वैहिनीचे मन हळवे होते. नुकतेच लग्न झालेले. आई गेली म्हणजे एक प्रकारे माहेर गेलेच म्हणायचे. ''माय तो माहेर'' अशी म्हणच आहे.

मी मुंबईत दादाकडे होतो. आमच्या प्रकृती बऱ्या होत्या; परंतु कोकणात आमच्या घरी व आमच्या आजोळी सारी आजारी होती. माझी आक्का माहेरी बाळंतपणासाठी म्हणून गेली होती. माझ्या वडिलांना चिंता वाटत होती. शेवटी तेच तापाने अंथरुणावर पडले. नंतर ती आमची दुर्वांची आजी तीही आजारी पडली. तिकडे आजोळी आजोबा आजारी पडले. बाळंतपणासाठी म्हणून आक्का आली होती; परंतु तीच सर्वांची शुश्रुषा करू लागली. धाकटा भाऊ पुरुषोत्तम थोडी मदत करी.

आजोबा व दुर्वांची आजी यांना घमेले घमेलेभर कफ पडे. कशी वाचतील असे मनात येई. गावात सर्वत्र आजारीच आजारी. आमच्या घरासमोर पोस्टमास्तर होते. त्यांच्याकडे त्यांची आई आजारी. शेजारी आप्तेष्ट होते, ते आजारी. समाचाराला कोण येणार? विसावा कोण देणार? घरोघर मरण नाचत होते.

त्या वेळची एक आठवण सांगतात. आमच्या शेजारी एक गृहस्थ होते. त्यांच्या घरीही अंथरुणे होतीच. त्यांचा मुलगा वातात होता. तो वातात म्हणे, ''ते पाहा चारजण आपल्या अंगणातून येत आहेत. मला न्यायला येत आहेत. अरे, परंतु ते माघारी गेले. आपल्या कवाडीतून परत गेले. समोर पोस्टमास्तरांच्या घरी गेले ते!'' आणि काय आश्चर्य! पोस्टमास्तरांची आई त्याच वेळी तिकडे मरण पावली व या गृहस्थांचा मुलगा पुढे बरा झाला!

खरोखरच कोणी परलोकीचे आत्मे बोलवायला येतात की काय? आपणास नेण्यासाठी येतात की काय? माझा धाकटा भाऊ सदानंद मेला तेव्हा तो असेच म्हणाला आणि या मानमोडीच्या साथीतील हा एक अनुभव. कोणी कोणी शास्त्रज्ञ म्हणतात की परलोक आहे म्हणून. केवळ हसण्यावारी नेण्यासारख्या या गोष्टी नाहीत. संशोधन करण्यासारख्या या गोष्टी आहेत. या दंतकथाही नाहीत. अनुभवाच्या या गोष्टी आहेत.

आमच्या घरी दुर्वांच्या आजीची प्रकृती अधिकच बिघडली. तिची सर्व निरवानिरव केली. तिने आपले चांदीचे फुलपात्र, हातातील सल्लेजोडी व अंगठी, तिचे कोणाकडे पैसे थोडे देणे होते ते निरनिराळ्यांस दिले. ती आक्कास म्हणाली, ''चंद्रे, तू आलीस सेवाशुश्रुषा करायला. तुला हे फुलपात्र घे. तुझीही आई नाही. जपून राहा.'' आजी शेवटची बोलणी करीत होती; परंतु तिकडे वडील आजारी होते. त्यांना ती वार्ता नव्हती. त्यांच्या अंगात ताप फणफणत होता. आजीचा शेवटचा क्षण आला. तिने राम म्हटला. आजी म्हातारी झाली होती. ती आमची सख्खी आजी नव्हती. तरी तिचा आम्हा भावंडांवर लोभ होता. धाकटा भाऊ पुरुषोत्तम व आक्का रडू लागली. मरणाच्या आधी आजीच्या अंगाला घामाची जणू उपळ फुटली. अंगाला जणू शेकडो पाझर फुटले. प्राण जणू त्या घामातून निघून जात होते. शेवटी आक्काने तापाने फणफणलेल्या वडिलांस सांगितले की दुर्वांची आजी गेली!

तो काय आश्चर्य! वडील एकदम उठले. त्यांचा एकदम ताप गेला. जणू नवीन शक्ती आली. आजीची क्रिया केली पाहिजे, घरात दुसरे कोण, असे जणू त्यांच्या मनात आले. मन म्हणजे अजब चीज आहे. मनाचे खेळ आश्चर्यकारक आहेत. संकल्पशक्ती हीच खरी शक्ती आहे. एका क्षणात ताप कुठे गेला? ज्यांना उठवत नव्हते त्यांना स्मशानात जाण्याची ताकद कशी आली, कोठून आली?

दुर्वांच्या आजीला नेण्याची तयारी झाली. घरातून आता प्रेत बाहेर काढायचे. परंतु एक निराळाच प्रसंग उभा राहिला. आमचे एक बरेचसे दूरचे चुलते होते. त्यांचा इतर स्वभाव चांगला होता. ते निर्भय होते. त्यांची शरीरप्रकृती दणकट होती. धिप्पाड होते दिसायला. करारी होता त्यांचा स्वभाव. गावात एकदा एक वात्रट तमाशा आला होता. खूप गर्दी होती. परंतु हे आमचे चुलते हातात सोटा घेऊन एकटे उभे राहिले. ते म्हणाले, ''तमाशा बंद करता की नाही?'' शेवटी तमाशा बंद झाला. परंतु असे गुण होते, त्यात एक दुर्गुण होता. तो म्हणजे भाऊबंदकी. आपल्या देशाला कौरवपांडवांच्या वेळेपासून हा शाप आहे. आजही आपण परकीयांचे पाय धरू, परंतु भावास मातीत मिळवू. हिंदूमुसलमान एकमेकांस पाण्यात पाहू परंतु उभयजण ब्रिटिशांशी गोंडा घोळू.

आमचे ते लांबचे चुलते एकदम दारात येऊन बसले. ते म्हणाले, ''प्रेत बाहेर काढू देणार नाही. या घरावर, या परसावर आता माझा हक्क आहे. तुम्ही हे घर सोडून आधी बाहेर पडा. मग प्रेत बाहेर पडेल. तोपर्यंत नाही.''

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

आता काय करायचे? माझे वडील अशक्त. ते चुलते धिप्पाड तर माझे वडील काटकुळे. त्यातून तापातून उठलेले. त्यांनी व इतरांनी परोपरीने विनविले; परंतु ते ऐकेनात, प्रेताला हात लावू देत ना. वडील रडकुंडीला आले. आता का मारामारी करायची? मृत्यूशी मारामारी चालली होती. ती करता येत होती; परंतु भावाशी मारामारी करणे मृत्यूशी झगडण्यापेक्षाही कठीण.

शेवटी गावचे फौजदार का कोण पोलीस अधिकारी आले. त्यांनी धमकी दिली तेव्हा ते चुलते दूर झाले. भावाच्या प्रार्थना आपण ऐकणार नाही. भावांचे प्रणाम, भावांच्या डोळ्यांतील अश्रू यांनी आमची मने द्रवणार नाहीत; परंतु सरकारचा सोटा दिसला की आम्ही दबतो. आम्ही सोट्याला भितो. आम्ही सत्याला, सदसद्‌विवेक बुद्धीला, ईश्वराला, अश्रूला, प्रार्थनेला, प्रेमाला हृदयात स्थान ठेवले नाही. आमचा देव एक. तो देव म्हणजे सत्ता. सोट्याची सत्ता. या सत्तेपुढे आम्ही नसतो. या सत्तेला मान देतो, या सत्तेपुढे प्रेम पाघळते, या सत्तेची स्तोत्रे गातो. मानवाचा केवढा हा अध:पात!

दुर्वांची आजी गेली. तिच्या कितीतरी आठवणी मला येतात. ती माझ्या पायांना लहानपणी गाईचे दूध चोळी. माझे डोळे दुखरे होते म्हणून ती काळजी घेई. कधी कोठे वडी वगैरे मिळाली तर मला आणून देई. मी परगावी शिकण्यासाठी निघालो की, आवळ्याच्या वड्या, कोकमतेलाचा तुकडा ती नेहमी द्यायची. तिला किती गाणी येत, किती गोष्टी येत! मानमोडीला ती बळी पडली. माझ्या वडिलांना घरात तिचा आधार होता. आई तर मागेच देवाघरी गेली होती. वैहिनी मुंबईस भावाकडे असणार. दुर्वांची आजी घरी स्वयंपाक करी; परंतु आता कोण? आता वडिलांच्या हाती कायमची चूल आली.

आजोळी आजोबाही अत्यवस्थ होते. आजी व आक्का यांनी खूप शुश्रुषा केली. यश आले. ते बरे झाले. वडीलही बरे झाले. आमचा घरचा एकच बळी गेला; परंतु या मानमोडीच्या साथीला हिंदुस्थानात पाऊण कोटी लोक बळी पडले. पाऊण कोटी लोक मेले, मग आजारी किती पडले असतील? ३/४ कोटी लोक तरी आजारी पडले असतील. म्हणजे देशातील आठवा हिस्सा प्रजा या रोगाने पछाडली गेली! याचा अर्थ काय?

याचा अर्थ एकच की हिंदी जनतेची प्रतिकारशक्ती कमी झाली आहे. ज्याप्रमाणे जरा दुष्काळ येताच उपासमार समोर उभी राहते, मुले विकण्याची पाळी येते,

त्याप्रमाणे जरा एखादी साथ येताच भराभरा लाखो माणसे बळी पडतात. त्या रोगापुढे शरीर टिकू शकत नाही. लोकांची शरीरे दुबळी व नि:सत्त्व झालेली. एकदा एक गृहस्थ मजजवळ म्हणाले, ''पूर्वीप्रमाणे धष्टपुष्ट माणसे आता दिसत नाहीत.'' कोठून दिसतील? शेतसारे पूर्वीपेक्षा तिपटीने वाढले; परंतु शेतात खंडीचे तीन खंडी पिकण्याऐवजी दहा मणच पिकू लागले. कराचे बोजे वाढले. उद्योगधंदे नाहीत. लोकसंख्या वाढली. जमीन तितकीच. तीही नापीक होऊ लागली. खते भरपूर नाहीत. गुरेढोरे कमी. कारण गवतावरही कर बसले. अशा सर्व आपत्तीमुळे सर्वत्र उपासमार. खरोखर हजारोंना पोटभर खायला मिळत नाही.

मानमोडीची साथ आली. पाऊण कोटी लोक मेले; परंतु सरकारने काय केले? चौकशी केली का? इतके लोक का मेले? ठायी ठायी दवाखाने होते का? लोक का इतके दुबळे झाले? केली का चौकशी? लाखो लोकांना दवा ना पाणी. घरांना आतून कड्या लावून आत लोक मरत होते. दार ठोठावून कोणी डॉक्टर, कोणी सेवा करणारा स्वयंसेवक येत नव्हता; परंतु मरण मात्र दारे बंद असली तरी आत येत होते व या दरिद्री जनतेला देवाघरी घेऊन जात होते.

हिंदी माणसे मेली काय, जगली काय, त्याची परकीय सरकारला काय पर्वा? आम्ही काळे आदमी. आम्ही का जगायला लायक आहोत? मुंबईला मागील महायुद्धाचे वेळेस कुलाब्याला एक वॉर हॉस्पिटल होते. गोऱ्या शिपायांसाठी होते. त्या हॉस्पिटलमध्ये एकदा एका खाटेवर एक ढेकूण सापडला. एक ढेकूण गोऱ्या शिपायाचे रक्त खाईल म्हणून लगेच म्हणे एक कमिशन नेमले गेले. ढेकूण कसा आला याची म्हणतात चौकशी झाली; परंतु पाऊण कोटी लोक मानमोडीस बळी पडतात. आमची कोण करील चौकशी?

माझे एक मित्र इंग्लंडमध्ये जाऊन आले होते. ते सांगत इंग्लंडमध्ये एखाद्याच्या पायात बूट नसेल तर सरकारी खर्चाने त्याला बूट देण्यात येतो. तिकडील प्रजेची किती काळजी घेण्यात येते; परंतु हिंदुस्थानात कोट्यवधी मेले तरी कोणाला काळजी? आमच्याकडील प्रखर उन्हाळ्यात कितीजणांच्या पायात नाही; हे पाहावयास कधी गेले का सरकारी शिपाई? आमच्या पायात आहे की नाही, पोटात अन्न आहे की नाही, अंगावर कपडा आहे की नाही, डोक्यात ज्ञान आहे की नाही, कोण करणार याची चौकशी? इंग्लंडमध्ये दर महिन्यास बेकारांची गणती होते. बेकारांना काम तरी दिले

जाते, नाही तर सरकारी तिजोरीतून त्यांच्या कुटुंबास पुरेसा भत्ता दिला जातो. आमच्याकडील बेकारांची होते का कधी शिरोगणती? आमच्याकडे अगणित बेकार आहेत.

व्हाइसरॉयसाहेबांनी क्षयरोगनिवारणार्थ फंड काढला. चांगली आहे ही गोष्ट. परंतु एखादा क्षयरोगाचा दवाखाना किती लोकांस पुरणार? गावोगावी क्षयरोगी आहेत. मी कोकणात एका खेड्यात गेलो होतो. तेथील माझा मित्र म्हणाला, ''या लहानशा गावात पन्नास पाऊणशे क्षयी लोक आहेत.'' मी म्हटले, ''याचे काय कारण?'' तो म्हणाला, ''कोकणातील शेतकरी श्रम करतात त्या मानाने पोटभर खावयास मिळत नाही. म्हणून हा क्षयरोग आहे.'' ते माझ्या मित्राचे शब्द ऐकून मला लहानपणाची आमच्या घरची गोष्ट आठवली.

आमच्या घरी गोपाळ म्हणून एक गडी कधी कधी कामाला यायचा. त्याच्या बायकोचे नाव बया. गोपाळ खूप सशक्त होता. त्याचा आहार चांगला होता. तीन निठव्यांचा म्हणजे दीड शेराचा भात तो एका वेळेस जेवे. मी एकदा त्याला म्हटले, ''गोपाळ, तू किती जेवतोस!'' त्या वेळेस गोपाळ म्हणाला, ''श्याम, अरे तुमच्याकडे कामाला येतो, त्या वेळेस हो मी पोटभर जेवतो. आम्ही घरी इतके रोज कोठून जेवणार, आम्हाला कसे परवडणार? आम्ही घरी अर्धपोटी असतो हो.''

गोपाळचे ते शब्द मी विसरणार नाही. अर्धपोटी राहणाऱ्यांची पुढील पिढी आणखीच नि:सत्त्व होणार. गावोगाव मग क्षयरोग नाही पसरणार तरच आश्चर्य! हिंदुस्थानचा क्षयरोग खरोखर जावयास हवा असेल तर व्हॉइसरॉयसाहेब ब्रिटिशांना सांगतील की, ''हिंदुस्थानचे रक्तशोषण बंद करा. या महान देशाला स्वातंत्र्य द्या.''

आणि स्वातंत्र्य पाहिजे ते मूठभर भांडवलवाल्यांचे नव्हे. खरे गोरगरिबांचे स्वातंत्र्य हवे. असे स्वातंत्र्य येईल तेव्हाच रोग हटतील, पोटभर खायला मिळेल, ज्ञान येईल, आनंद येईल. असे गरिबांचे स्वातंत्र्य आणण्यासाठी एक कॉंग्रेस धडपडत आहे. बाकी इतर संस्थांचे गरिबांकडे लक्षही नाही. इतर संस्था वरिष्ठ वर्गाच्या, वरिष्ठ जातीच्या. कोट्यवधी शेतकरी, लाखो कामकरी यांचेकडे कॉंग्रेसचे लक्ष आहे. अधिकाधिक जात आहे. इतर संस्था धर्माच्या नावाने ओरडत आहेत; परंतु खरा धर्म सर्वांना सुखी करणे हा आहे.

ब्रह्माच्या अनेक व्याख्या आहेत; परंतु पहिली व्याख्या जी शिकविली पाहिजे ती म्हणजे 'अन्न ब्रह्म.' परंतु हा ओदनरूपी परमेष्ठी, हे अन्नब्रह्म सर्वांना नेऊन भेटवू असे कोणाला वाटते आहे? कोट्यवधी लोकांच्या पोटात घास नाही म्हणून कोणाला पोटदुखी लागली आहे? धर्माच्या वरवरच्या गप्पा काय कामाच्या?

भगवान् बुद्धांनी एकदा शिष्यांना सांगितले, "जा आता दशदिशांत व प्रेमाचा उपदेश करा." शिष्य निघाले. काही शिष्यांना जवळच एका झाडाखाली एक मनुष्य आढळला. ते शिष्य त्याच्याजवळ गेले व म्हणाले, "म्हण, अक्रोधाने क्रोध जिंकावा, जगाला प्रेम द्यावे, म्हण." तो म्हणेना. शिष्य म्हणाले, "याला उचलून भगवान् बुद्धाकडे नेऊ या." त्यांनी त्याला उचलून बुद्धाकडे आणले. ते म्हणाले, "भगवान्; हा नास्तिक दिसतो. याला सूत्रे शिकवतो तर म्हणत नाही." कारुण्यसिंधू बुद्धदेवांनी त्या माणसाकडे पाहिले. ते शिष्यांना म्हणाले, "घरात काही फळे असली तर याला आणून द्या. काही तरी याला आधी खायला द्या." शिष्यांना आश्चर्य वाटले. धर्मसूत्रे शिकविण्याऐवजी आधी हे खायला कसे देतात! परंतु त्यांनी सांगितल्याप्रमाणे केले. नंतर बुद्धदेव त्या माणसाला म्हणाले, "मित्रा, आता जरा झोप. विश्रांती घे." तो मनुष्य झोपला.

"भगवान्, तुम्ही त्याला धर्म शिकविण्याऐजी खायला दिलेत, झोपायला सांगितलेत हे कसे?" शिष्यांनी विचारले.

बुद्धदेव म्हणाले, "या माणसाजवळ अन्नाच्या भाषेत बोलले पाहिजे. तरच त्याला समजेल. उपाशीपोटी तो काय म्हणेल, काय ऐकेल? ज्याला त्याला समजेल अशा भाषेत बोलले पाहिजे. उपाशी माणसाजवळ अन्नाच्या भाषेत बोला. त्याला अन्नदेव नेऊन प्रथम भेटवा. पोटभर लोक जेवू देत, नीट झोप घेऊ देत. मग त्यांच्याजवळ इतर गोष्टी बोलू."

हिंदुस्थानातील कोट्यवधी लोकांस भाकर आधी देऊया. त्यांना पोटभर खाऊ दे. पोटभर लेऊ दे. अन्नब्रह्म आधी द्या. मग विज्ञान ब्रह्म, मग आनंद ब्रह्म, परंतु आधी कोठला धर्म, कोठली संस्कृती? ते सारे 'आधी कळस मग पाया रे' असे होईल. कोट्यवधी उपाशी लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवावयास जो उभा राहील तो खरा धार्मिक. तो खरा हिंदूधर्माचा, तो खरा मुस्लीम धर्माचा. तो खरा देवाचा उपासक, जगन्मातेचा लाडका!

त्या मानमोडीच्या साथीत डॉक्टरांनी अपार पैसा मिळविला. जे भिकारी होते, त्यांनी मोटारी घेतल्या. तो मला पंचवीस रुपये देत आहे, तुम्ही तीस देत असाल तर तुमच्याकडे येतो, असे काही डॉक्टर खुशाल सांगत. ज्या समाजात अशी समाजरचना आहे, ती मोडून नवीन समाजरचना निर्मिली पाहिजे. जो खरा डॉक्टर असेल तो आज क्रांती करायला उभा राहील. तो म्हणेल, ''खरे औषध म्हणजे पोटभर अन्न, बेताचे श्रम, राहायला हवेशीर घर, जरुरीइतका कपडा.'' परंतु या गोष्टी किती जणांस आज या देशात मिळतात?

आजारात सर्वत्र मोफत औषध मिळेल, गरिबातील गरिबासही इंजेक्शन घेता येईल, शास्त्रीय उपचार त्याला मिळतील, अशी समाजव्यवस्था कधी होईल? ज्या वेळेस हा श्रीमंत व हा गरीब हा भेदच जगातून जाईल तेव्हा. मानवतेचा खरा धर्म येईल तेव्हा. तोपर्यंत मानमोडी येणार व कोट्यवधी लोकांची मान मोडणार, देवाच्या लेकरांचा भयानक संहार होणार! माझी माय माऊली कॉंग्रेस तरी दिवसेंदिवस अधिकाधिक मानव्याची खरी उपासक होवो, दरिद्री नारायणाकडे जावो, हीच माझी आशा, हीच माझी प्रार्थना! हिंदुस्थानात खरे स्वातंत्र्य येवो!

+++

मनाची ओढाताण

मी रामाकडे होतो. माझे कार्यक्षेत्र संकुचित व ठरलेले; परंतु रामचा व्याप मोठा होता कारण तो बहुगुणी होता. त्याच्या अंगी अनेक गुण होते व त्यामुळे त्याचे मित्रमंडळही मोठे. राम सिंगलबार, डबलबार वगैरे करायला जात असे, असे मी तुम्हाला मागेच सांगितले. तेथे त्याचे अनेक नवीन मित्र झाले. त्यात केशव म्हणून एक होता. केशवचे अंग पीळदार होते. तो होता लहानसा ठेंगणा; परंतु दंड, छाती, सारे भरदार होते. त्याची मान भरलेली दिसे. काळीसावळी अशी ती मूर्ती होती. ओठांवर सरळ सुंदर असे हास्य सदैव खेळत असायचे. डोळे काळे होते व स्थिर होते.

या केशवाची स्मृती आमच्या जीवनात एका अत्यंत दु:खद घटनेमुळे अमर झाली आहे. केशव व त्याचे मित्र यांची एक संस्था होती. ते सारे हायस्कूलमधील विद्यार्थी होते. आम्ही कॉलेजमध्ये शिरलो होतो. राम त्या संस्थेत जाऊ-येऊ लागला. त्या संस्थेचे नाव मित्रमंडळ. या मित्रमंडळातील मुले रामला म्हणाली, ''तुम्ही कॉलेजमध्ये जाता. आम्हाला शिकवीत जा. ठराविक वेळी आम्ही जमत जाऊ.''

''काय शिकवू तुम्हाला?'' रामने विचारले.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''तुम्हाला जे येत असेल ते.'' ती मुले हसून म्हणाली.

''इंग्रजी व गणित मी शिकवीन.'' रामने सांगितले.

''आणि संस्कृत?'' त्यांनी प्रश्न केला.

''माझ्या एका मित्राला विचारीन तो शिकवील का.'' रामने उत्तर दिले.

ते मित्रमंडळ केशवच्या घरी जमत असे. केशवचे वडील डॉक्टर होते. डोक्यावर पगडी, अंगावर उपरणे अशा पोषाखात ते असत. त्यांचा लहानसा दिवाणखाना होता. तेथे मित्रमंडळाच्या सभा व्हावयाच्या. तेथे वर्ग चालावयाचे. राम तेथे जाऊ लागला. इंग्रजी, गणित शिकवू लागला. तेथे फळा वगैरे सारे साहित्य असे. इंग्रजी पाचवीतील ती सारी मुले होती.

''श्याम, तुझे संस्कृत बरे आहे. खरे ना?'' रामने विचारले.

''परंतु गणितांत तर ढ आहे श्याम!'' मी म्हटले.

''ढ शेवटी ज्ञ होईल!'' राम हसून म्हणाला.

''किती जन्म लागतील ते रामाला माहीत.'' मी खिन्नपणे उद्‌गारलो.

''जे आपल्यास येते, त्याचा आनंद माणसाने का मानू नये? देवाने जे दिले त्याबद्दलही उपेक्षा धरणे म्हणजे कृतघ्नपणा नव्हे का? श्याम, सारेच काही सर्वांजवळ नसते. तुझ्याजवळ काही आहे. माझ्याजवळ काही आहे.'' राम म्हणाला.

''माझ्याजवळ आहे त्याचा काय उपयोग?'' मी म्हटले.

''उपयोग आहे. तू तयार आहेस?'' त्याने प्रश्न केला.

''कोठे देवळात पुराण सांगायचे आहे की काय?'' मी हसून प्रश्न केला.

''एक प्रकारचे देऊळच. मित्रमंडळ म्हणून ती संस्था आहे ना? तेथे मी शिकवायला जातो. तूही जाशील तेथे? तू संस्कृत शिकवीत जा. तुझा थोडा उपयोग होईल. तुला आनंद मिळेल.'' राम म्हणाला.

मीही शिकवायला जाऊ लागलो. संस्कृत शिकवू लागलो. संस्कृतमधील सुंदर सुंदर श्लोक मी सांगत असे. नवीन नवीन चांगले श्लोक सांगता यावेत म्हणून मी शोधून ठेवीत असे. श्लोक साधे, समजायला कठीण नसले तरी काव्यमय असे असावेत म्हणून मी खटपट करीत असे.

मित्रमंडळात दर रविवारी व्याख्याने असत. कधी ते विद्यार्थीच व्याख्याने देत. कधी इतरांची करवीत. निरनिराळ्या शाळा-कॉलेजातील अध्यापक अध्यक्ष म्हणून आमंत्रिले जात.

''श्याम, या रविवारी तू दे व्याख्यान.'' राम म्हणाला.

''मी कशावर बोलू? नको ही भानगड.'' मी म्हटले.

''इतके वाचतोस तरी म्हणतोस की कशावर बोलू! तुझे ते रामतीर्थ, विवेकानंद, रामकृष्ण परमहंस यांच्यावर बोल.'' राम रागावून म्हणाला.

''रामतीर्थांच्या चरित्रावर बोलू?'' मी विचारले.

''बोल.'' राय म्हणाला.

रामतीर्थांच्या चरित्राचे ते बारा खंड मला जणू पाठ होते. त्यांची व्याख्याने जणू माझ्या ओठावर खेळत होती. मी रामतीर्थांचे चरित्र, त्यांची व्याख्याने मनात सारखी घोळवू लागलो. मी आता पुष्कळ ठिकाणी बोलतो. शेकडो सभांतून मी बोललो आहे; परंतु मी हातात कागदावर केलेले टाचण घेऊन कधीच बोललो नाही. घरीही कागदावर कधी मुद्दे वगैरे मांडले नाहीत. काही लिहायचे असो वा बोलायचे असो, मी टाचणेटिपणे फारशी करीत नाही. ज्यासंबंधी लिहायचे वा बोलावयाचे, तो विषय मात्र सारखा माझ्या ध्यानीमनी असतो. मला मग काही सुचत नाही. रात्रंदिवस त्या विषयाचे ध्यान, त्या वस्तूचे चिंतन. मग लिहायची वा बोलायची वेळ आली म्हणजे भराभरा माझा हृदयसिंधू मी रिकामा करतो. जे लिहिले जाते वा बोलले जाते ते भावनासमुद्रातून जणू चुचकळून बाहेर येते.

तो रविवार होता. आमच्या कॉलेजमधलेच एक प्राध्यापक अध्यक्ष म्हणून आले होते. मी बोललो. स्वामी रामतीर्थांच्या चरित्रावर दीडतास बोललो. सर्वांनाच माझे भाषण आवडले. अध्यक्षांनी स्तुती केली. ते म्हणाले, ''रामतीर्थांचे सारे वाङ्मय जणू आजच्या व्याख्यात्यांच्या ओठावर आहे.असेच वाचन, मनन त्यांनी चालू ठेवावे.''

माझ्या व्याख्यानाचा सर्वांत जर कोणाला आनंद झाला असेल तर तो रामला. नेहमी दु:खी व निराश होणाऱ्या श्यामला राम आनंद व आशा देऊ पाहात होता. तुझ्याजवळही काही देवाची देणगी आहे असे तो श्यामला दाखवू इच्छित होता.

''श्याम, नाही नाही म्हणत होतास; परंतु कसे छान बोललास? सर्वांच्या भावना तुझे भाषण ऐकताना उचंबळून येत होत्या. तुला माझ्यासारखी बासरी नसेल वाजविता येत, परंतु तुझ्या भाषणात बासरी आहे. गोड, सहृदय, भावनामय बोलणे!'' राम माझ्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाला.

मित्रमंडळातील मुलांचा रामाने मेळा तयार केला. राम व त्याचे भाऊ टिपऱ्या खेळण्यात पटाईत होते. आमच्या वाड्याच्या अंगणातच ही सारी मुले जमत.

"श्याम, तू येशील खेळायला?"

"नको. मला येणार नाही."

"बाकीच्यांना का येत आहे?"

"परंतु त्यांना येईल. मला नाही येणार."

"नाही नाही म्हणणाऱ्यास कधीच येणार नाही."

"जे आपणास येणे अशक्य त्याच्या पाठीमागे लागणे वेडेपणा आहे."

"श्याम, तुला माझ्याबरोबर खेळण्यात आनंद नाही वाटत? तू मित्र ना माझा? मग आमच्या खेळात, आमच्या आनंदात तू का नाही मिसळत, का नाही भागीदार होत?"

"राम, तुझ्या आनंदात मी भागीदार आहे. तुम्ही खेळू लागलात म्हणजे दुरून बघेन. रागावू नकोस."

राम व त्याचे मित्र अंगणात सुंदर सुंदर गाणी म्हणत व टिपऱ्या खेळत. खूप रंग चढे. मी हे सारे दुरून बघत असे. टिपऱ्या खेळायला जावें, खेळताना नाचावे, असे मनात येई. परंतु आपणास येणार नाही असे वाटून मी स्वस्थ बसे.

रामला नाटकाचाही नाद होता. नाटकात काम करण्याची त्याला हौस होती. तो जन्मजात नट होता. दिवसा तो टिपऱ्या खेळे तर रात्री एका नाटकमंडळात जाई. काही मित्रांचा हा संघ होता. त्यांना नाटके करायची होती. रामही तेथे जाई. नाटकांची तालीम सुरू झाली; परंतु रामच्या या मित्रांचे कोणतेही नाटक प्रत्यक्ष रंगभूमीवर आले नाही. नेहमी तालीमच झाली. त्या नाटकमंडळात रामचाच उत्साह सर्वांहून अधिक. तो नियमितपणे जाई, परंतु कोणी आलेले नाहीत असे पाहून तो घरी येई.

अशा तऱ्हेने आपल्या ईश्वरी देण्याचा विकास करू पाहात होता; आणि ती दुःखद घटना झाली. केशव हा मित्रमंडळाचा प्राण; परंतु तो दुःखी होता. कोणते होते त्याला दुःख? शाळेत त्याची नीट प्रगती होत नव्हती. त्याला इंग्रजी, गणित वगैरे विषयांत शेकडा दहाही मार्क मिळत नसत.

"बाबा, इंग्रजी, गणित मला येत नाही. मी पास होणार नाही. मला बडोद्यास पाठवा. तेथील व्यायामशाळेत मी शिकेन. महाराष्ट्रात मी व्यायामाचा प्रसार करीन." केशव वडिलांना म्हणे.

''हे भिकारडे विचार सोडून दे. मी डॉक्टर आहे. तूही डॉक्टर हो. हा दवाखाना पुढे चालव. इंग्रजी, गणित या विषयांचा अधिक अभ्यास कर. त्या रामभाऊंजवळ शीक. तुला डॉक्टर झालेच पाहिजे. मॅट्रिक हो.'' वडील म्हणाले.

केशव कसा पास होणार? तो खूप अभ्यास करी. गणिते सोडवीत बसे, इंग्रजी वाक्प्रचार घोकीत बसे; परंतु त्याच्या लक्षात काहीही राहात नसे. वार्षिक परीक्षेत आपण पास होणार नाही हे केशवला दिसत होते. तो निराश झाला.

त्याने काहीतरी निश्चय केला. मित्रमंडळाचे उरलेसुरले काम त्याने पुरे केले. या मित्रमंडळाचे वाचनालय व ग्रंथालय होते. मी माझी कितीतरी पुस्तके या संस्थेला दिली होती. केशवने पुस्तके वगैरे त्या दिवशी नीट व्यवस्थित लावली. सायंकाळी तो सर्व मित्रांस भेटला.

''आता मी उद्यापासून तुम्हाला भेटणार नाही!'' केशव मित्रास म्हणाला.

''इतका का अभ्यासात दंग होणार आहेस? कोठे एकांतात जाऊन बसणार की काय? केशव, कशाला करतोस अभ्यास?'' मुले म्हणाली.

''मी आता अभ्यास न करण्याचे ठरविले आहे.'' केशव म्हणाला.

''मग का भेटणार नाहीस? आमच्या अभ्यासात व्यत्यय येईल म्हणून केशव, तुझे हसणे पाहिले म्हणजे आम्हास उत्साह मिळेल. तू उत्साहमूर्ती आहेस. तू भेटत जा. बाकी कोणी नाही भेटले तरी तू भेट.'' ती म्हणाली.

''मी थट्टा नाही करीत. खरेच नाही मी भेटणार. ही शेवटची भेट!'' केशव जरा गंभीरपणे म्हणाला.

''आजची शेवटची भेट. उद्या सकाळी आठ नाही वाजले तो येशीलच सतावायला.'' कोणीतरी बोलले.

मित्र पांगले, घरोघर गेले. केशव घरी गेला. केशव घरी झोपला; परंतु सकाळ झाली तरी तो अजून उठत का नाही? रात्री का बराच वेळ तो जागत होता? गणिते का सोडवीत बसला होता? अभ्यास करून का केशव दमला होता? ऊठ. केशव ऊठ.

केशव उठला नाही. आठ वाजून गेले तरी उठला नाही. शेवटी त्याचे वडील त्याच्या खोलीत गेले. तो तेथे काय दिसले? अंथरुणात रक्त दिसले. केशवच्या तोंडातून रक्ताच्या गुळण्या बाहेर पडलेल्या होत्या. गणित व इंग्रजी यांनी केशवचे प्राण घेतले. मुलाचे गुणधर्म न ओळखणाऱ्या आंधळ्या पित्याने मुलाचे प्राण घेतले.

केशवने अफू घेतली होती. काचाही कुटून खाल्ल्या होत्या. मरण निश्चितपणे यावे म्हणून दोनतीन उपाय त्याने केले होते. उत्साहमूर्ती केशव या सर्वव्यापी दास्याला बळी पडला. आज या हिंदुस्थानात कितीतरी मुलांच्या आत्म्यांचा असा वध होत असेल. त्यांच्या गुणांचा विकास व्हावयाच्या ऐवजी विनाश होत असेल! ''परधर्मो भयावह.'' असे आपण हजारो वर्षे पुटपुटत आलो; परंतु पदोपदी परधर्म आपणावर लादला जात आहे. व्यायामप्रेमी माणसावर तू डॉक्टर हो अशी सक्ती केली जात आहे. ज्यांना ज्यांना वर्णधर्माचे खरे महत्त्व वाटत असेल ते आधी पारतंत्र्य दूर करावयास उठतील व असे स्वराज्य आणतील की, ज्यात कोणाच्याही अंगच्या गुणांचा विकास व्हावयास अडचणी येणार नाहीत, जेथे सर्वांच्या जीवनकळ्या नीटपणे फुलतील तेथेच खरे स्वराज्य समजावे!

केशव गेला! खरोखरच ती शेवटची भेट ठरली. त्याचे मित्र धावत गेले. ते रडू लागले. दिलदार, दमदार असा तो तरुण गडी तेथे मृत्यूचा सवंगडी होऊन पडला होता. केशवच्या मरणाचा आम्हा सर्वांवर परिणाम झाला; परंतु मजवर फार झाला. आपणही केशवप्रमाणे निघून जावे असे माझ्या मनात येऊ लागले; परंतु विचार पक्का होईना. आत्महत्या ही साधी गोष्ट नाही. ती करणारा भेकड नसतो. आत्महत्या करणाराही एक प्रकारे वीर असतो. स्वतःच्या हाताने स्वतःच्या पंचप्राणांचा दिवा मालवणे ही सोपी गोष्ट नाही.

माझ्या मनात असे विचार येत होते. याच सुमारास आणखीही एक गोष्ट घडली. राम माझ्यापाशी बोलेनासा झाला. काय कारण झाले ते मला कळले नाही; परंतु तो बोलेना. मला वाईट वाटले. माझे काही वार नव्हते. मी ते उपवास आनंदाने काढीत होतो; परंतु रामच्या न बोलण्याचा उपवास मला सहन होईना.

''राम, का रे बोलत नाहीस तू? मी तुझ्याकडे राहिलो तो केवळ तुझ्यामुळे माझा तुला कंटाळा आला असेल, मी तुला नकोसा वाटत असेन तर तसे सांग. मी जगात कोठेही जाईन. बोल, माझ्याजवळ बोल.''

मी कितीतरी रामची मनधरणी केली; परंतु तो एक शब्दही बोलला नाही. राम निश्चयी आहे. त्याचा निश्चय सदैव अभंग असतो. माझ्या मनात रामच्या घरून निघून जावे असे कितीदा तरी आले; परंतु पाय निघेना. आणि मी जाणार तरी कोठे? कोठे राहणार? राम बोलत नसला, तरी तो दिसत असे. त्या घरात तो होता. ती माझी आशा

होती. तेवढा माझा आधार होता. कॉलेजमध्ये एका बाकावर आम्ही दोघे बसत होतो. परंतु एक शब्दही एकमेकांजवळ आम्ही बोलत नसू.

अनासक्त प्रेम मला शिकायचे होते. खरे प्रेम ते ज्याला कोणतीही अपेक्षा नाही. असे प्रेम करायला शिकले पाहिजे. तो अभ्यास हवा; परंतु या जन्मी तरी केवळ नि:स्वार्थ प्रेम मला करता येईल की नाही देव जाणे. हळूहळू मी अभ्यास करीत आहे. चिखलातून कमळाकडे जात आहे. अंधारातून उजेडाकडे जात आहे. वासनामय व सापेक्ष प्रेमातूनच निरपेक्ष व निर्हेतुक असे निष्पाप प्रेम फुलत जाते. सर्व संस्कृतीचा उगम मुळात गढूळ वृत्तीतूनच आहे. ओबडधोबडातूनच सुंदरता पुढे निर्माण होते.

मी असा दु:खीकष्टी होतो. तो राम आजारी पडला. अतिसार व ताप याने तो आजारी पडला. त्याला कॉलेजमध्ये येता येईना. तो घरी अंथरुणावर पडून असे. तो खूप अशक्त झाला; परंतु तो मजजवळ बोलत नसे. मी कोणती सेवा करणार? तो खाली शौचास गेला की हळूच मी त्याचे अंथरूण झाडून ठेवीत असे. एके दिवशी मी बुधवारच्या बागेतून गुलाबाची फुले चोरून तोडून आणली. तेथे पाट्या होत्या. फुलास हात लावू नये म्हणून पाट्या होत्या. तरीही मी फुले तोडली. सार्वजनिक कायदा मी मोडीत होतो. बागेत येणारा प्रत्येकजण जर फुले चोरून नेईल तर बागेत सौंदर्य व सुगंध राहील का? सामुदायिक आनंदासाठी ती फुले होती. ती फुले सर्वांसाठी होती. ती मी का म्हणून तोडून न्यावी?

माझ्या मित्रासाठी ती मी तोडली. मला माझा एक मित्र काय तो दिसत होता. त्याचे आजारीपण दिसत होते. दुनिया मला दिसत नव्हती. मी ती फुले माझ्या कोटाच्या बटनहोलमध्ये अडकवण्यासाठी तोडली नव्हती. माझ्या नाकपुडीत कोंबण्यासाठी ती मी तोडली नव्हती. मित्राला– आजारी मित्राला बरे वाटावे, प्रसन्न वाटावे, म्हणून मी तोडली होती. तरीही ती चूकच होती. मी बागेच्या माळ्याला विचारले पाहिजे होते. कदाचित् त्याने दिली असती. त्याने नसती दिली तरीही त्याची चूक नव्हती. त्याचे सार्वजनिक कर्तव्य त्यात होते.

माझ्या मित्रप्रेमाच्या मोहाने ती फुले मी तोडली. नकळत रामच्या उशीजवळ मी ती ठेवली. रामने ती हुंगली. त्या फुलांचा त्याने अव्हेर केला नाही. त्याला का माहीत नव्हते ती फुले कोणी आणली ते? त्याला खात्रीने माहीत असले पाहिजे. मग श्यामशी

अबोला धरणाऱ्या रामने श्यामने आणलेली फुले का फेकली नाहीत? मानवी मनाचे खेळ समजणे कठीण आहे.

आम्ही रोज घरी फुलांचा पुडा आणीत असू; परंतु त्यात कण्हेरीचीच फुले असावयाची. एके दिवशी सायंकाळी पुडा आणताना मी फुलवाल्याला म्हटले, ''दोन गुलाबाची पाकळ्या न गळणारी फुले घाल.''

''महिना चार आणे देऊन पुडा नेणाऱ्याला गुलाबाची फुले मिळत नसतात!'' तो म्हणाला.

मला वाईट वाटले. माझ्या खिशात दोन दिडक्याही नव्हत्या. हृदयातील प्रेम त्या फुलवाल्याला कसे दाखवू? मी तेथेच घुटमळत ह्रोतो. हळूहळू तेथे गर्दी होऊ लागली. भराभरा पुडे बांधून फेकून देण्यात येत होते. पुडे घेऊन लोक जात होते. मी एकदम तेथील दोन गुलाबाची फुले लांबविली. मी पळू लागलो; परंतु ओरड झाली. त्या फुलवाल्याने मला बकोटी धरून ओढून आणले. समोरच फरासखाना होता!

''देऊ का पोलिसाच्या ताब्यात?'' तो म्हणाला.

''द्या वाटले तर. परंतु मी देवासाक्ष सांगतो की ही फुले मला नको होती. माझ्या आजारी मित्रासाठी मला ती हवी होती. त्याला फुले पाहून बरे वाटते. म्हणून मी तुमच्याजवळ मागितली. तुम्ही दिली नाहीत. मजजवळ पैसे नाहीत. मी दोन फुले लांबविली. तुम्ही आजाऱ्याला बरे वाटावे म्हणून दोन फुले नाही देणार?'' माझा आवाज सद्‌गदित झाला.

''जाऊ द्या.'' सभोवतीचे लोक म्हणाले.

''ही घे तुला फुले.'' एकजण एकदम म्हणाला.

त्या गृहस्थाने एक आणा देऊन गुलाबाची फुले घेतली व मला दिली. फुलवाला लाजला. मीही लाजलो.

''नकोत मला.'' मी म्हटले.

''नको म्हणू नका. तुझ्या मित्रासाठी ने.'' तो भला मनुष्य म्हणाला.

मी ती फुले घेऊन निघालो. परंतु मी घरी आलो नाही. ती फुले घेऊन मी कोठे गेलो? त्याच पूर्वीच्या शनिवारवाड्यासमोर बागेत मी गेलो. तेथील थंडगार लोखंडी बाकावर मी बसलो होतो. गर्दी कमी होऊ लागली. मी शांतपणे उठलो व बागेतील एका हौदाजवळ गेलो. ती फुले त्या हौदात मी सोडली!

का सोडली ती फुले? जी फुले देण्यासाठी मी चोरी केली, ती मला आयती मिळाली असता मी का फेकून दिली? ती का आसक्ती मी फेकीत होतो? तो का मोह मी फेकीत होतो? मला माहीत नाही. ती फुले मी फेकली एवढी गोष्ट खरी.

''श्याम, मला कॉलेजमध्ये येववत नाही. घरी वाचवत नाही. तू वाचीत जाशील माझ्याजवळ बसून?'' रामने एके दिवशी अकस्मात् मला विचारले.

न बोलणारा राम बोलला. मला अपार आनंद झाला. माझे हसू मला आवरेना. हृदयातील समाधानाचा झरा हास्याने वाहू लागला.

''हो, वाचीन.'' मी म्हटले.

मी आमची अभ्यासपुस्तके रामजवळ बसून वाचू लागलो. मला आनंद होत असे; परंतु मला माझ्यासाठी पुन्हा वाचावे लागे. मोठ्याने वाचू लागल्याने माझ्या लक्षात राहात नाही. मनात वाचले तरच माझ्या लक्षात राहते. दिवसा मी रामजवळ वाचीत असे व रात्री मी स्वत:साठी वाचीत असे.

''श्याम, तुला माझ्यासाठी त्रास. तुला दोनदोनदा वाचावे लागते.'' राम म्हणाला.

''मला मुळीच त्रास नाही. तुझ्या थोडे उपयोगी पडता आले म्हणून मला आनंद होतो. त्रास होतो वगैरे मनातही आणू नकोस.'' मी म्हटले.

राम बरा झाला. आम्ही पुन्हा हसू-बोलू लागलो. माझ्या मनातील बरीचशी निराशा नष्ट झाली. मरणाचे विचार मावळले. पुन्हा जीवनाचा प्रकाश भरला; परंतु ते दिवस एक प्रकारे गंभीर असेच गेले. माझ्या मनाची खूप ओढाताण त्या वेळेस चाले. जगणे, मरणे, प्रेम, भेट, कर्तव्य या सर्वांची अधिक ओळख मला होत होती. जीवनातील अधिक अर्थ कळत होता. झाड वाढू लागले. जोराने वाढू लागले म्हणजे जरा वेडेवाकडेही जाते. तसेच जीवनाचेही आहे; परंतु त्यामुळे निराश होऊ नये. शेवटी वर फुले-फळे येऊन वृक्ष कृतार्थ होईल, यात शंका नाही.

+++

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय सातारा
दाखल नं. ११४८११ ग्रंथानुक्रमांक नि. ६२५८
किंमत १०० /- पाने १४४

क्षुद्र मन

कॉलेजच्या पहिल्या वर्षाची आमची वार्षिक परीक्षा जवळ येत होती. राम हुशारच होता. माझी शाश्वती नव्हती. तरीही मी अभ्यास करीत होतो. गणित व शास्त्र या दोनच विषयांची मला धास्ती होती. गणितातही उत्तीर्ण झालो असतो; परंतु शास्त्रात माझी गती कुंठित होई.

आज वार्षिक परीक्षेचा दिवस. राम व मी दोघे कॉलेजमध्ये तयारीने गेलो. पहिली प्रश्नपत्रिका तर मी छान लिहिली. नंतर दुसरी आली. तीही मी लिहू लागलो. साधारण १ तास झाला असेल. एकाएकी माझ्या अंगात ताप भरू लागला. तरी मी लिहीतच होतो. शेवटी मी काय लिहीत होतो हे माझे मलाच कळेना. डोळ्यांपुढे काळोख येऊ लागला. अंगात अपरंपार ताप भरला.

मी पर्यवेक्षकास सांगितले. कॉलेजचे प्रमुख तेथे आले. त्यांनी अंगास हात लावून पाहिला. हात धरून त्यांनी मला नेले. टांगा बोलावण्यात आला. शांतपणे मी टांग्यात बसलो. कॉलेजचा शिपाई बरोबर होता. घर आले. मी उतरलो. शिपाई टांग्यात बसून निघून गेला.

रामची आई घरात होतीच. मी परत आलो हे पाहून ती चपापली. खाली आली. माझा हात धरून तिने मला वर नेले. अंथरूण पसरण्यात आले. पांघरूण घेऊन मी निजलो.

''अंग दुखते का?'' आईने विचारले.

''नाही.''

''कपाळ दुखते का रे?''

''नाही.''

''मलेरिया आहे. घाम येऊन निघेल. ही तापनळी लावून पाहा बरे.'' मी तापनळी लावली. तो १०५ चे वर ताप होता. मी जरा घाबरलो; परंतु आईने धीर दिला. रामच्या आईलाकिती तरी वैद्यकीय ज्ञान होते. जणू ती डॉक्टरच होती. ती उपजतच परिचारिका होती.

''श्याम, घाबरू नकोस. हिवतापात खूप चढतो ताप. १०० चेही वर जातो. दोषी ताप असला तर एकदम इतका चढत नाही. पडून राहा. आणखी पांघरूण घालते. घाम आला म्हणजे मोकळा होशील.'' असे म्हणून आईने अंगावर आणखी पांघरुणे घातली.

काम करायला रामची आई खाली गेली. मी तेथे एकटा होतो. माझे कपाळ वगैरे काही दुखत नव्हते. परंतु परीक्षा बुडाली म्हणून मला वाईट वाटत होते. दुसरी प्रश्नपत्रिका मी थोडी लिहिली होती. जेवढे लिहिले होते, तेवढ्यानेही मी त्या विषयात उत्तीर्ण होईन अशी मला खात्री होती. उद्या ताप न निघाला तर? मग काय करायचे? एक वर्ष फुकट जाणार! आपले शिक्षण अपुरेच राहणार असे माझ्या मनात आले. मी अंथरुणातल्या अंथरुणात रडू लागलो. नेमका परीक्षेचे वेळेस कशाला आला ताप असे मनात येई.

सायंकाळी राम घरी आला. तो मजजवळ बसला. माझा हात तो चेपीत होता. माझे अंग चेपीत होता. मी काही बोलत नव्हतो. मधून तो माझ्या अंगाला हात लावून पाही. घाम येत आहे की काय ते तो बघे.

''श्याम, सकाळला ताप निघेल. आजची दुसरी प्रश्नपत्रिका उत्तीर्ण होण्यापुरती लिहिली आहेस ना? मग झाले तर. वर्ष फुकट जाणार नाही. उद्या ये परीक्षेला. आता

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

नाही वाचलेस तरीही तू पेपर लिहिशील. फार तर वर नाही येणार. पास तर होशील!'' असे म्हणून राम संबोधित होता.

मी काहीच बोलत नव्हतो. शांतपणे पडून होतो. जे होईल ते पाहावे. क्षणभर मनात विचार आला की देवाने मला न्यावे. ताप निघूच नये. तो विचार मनात आला व मी एकदमच रामचा हात माझ्या हृदयाशी धरला. मी डोळे मिटून ठेवले होते. जणू डोळे मिटावे अशी इच्छा करीत होतो.

''काय रे झाले श्याम?'' एकदमच रामने विचारले.

''राम, मी देवाकडे गेलो तर? जावे असे वाटते. कशाला मी बरा होऊ? ताप आता निघूच नये. जगातील सारा ताप आता संपो. ही यात्रा आता पुरे. केशव आपण होऊन गेला. मला हा ताप घेऊन जावो. मी मेलो तर तुला माझी आठवण येईल? कोणाला येईल का माझी आठवण?'' असे मी म्हणालो.

मरावे असे मला वाटत होते; परंतु जगाने माझी आठवण ठेवावी अशीही माझी इच्छा होती. जगाने स्मरण ठेवणे म्हणजे एक प्रकारे अमर होणे. स्मृती म्हणजे मृतीवर विजय. मी जगातील कष्ट, दुःखे सहन करायला तयार नव्हतो. माझ्यामागे अनेक उणिवा होत्या, त्या मला सहन होत नव्हत्या. म्हणून मी मरू पाहात होतो; परंतु आपली विस्मृती सर्वांना व्हावी असे नव्हते वाटत. आपले केवळ शून्य व्हावे, भस्म व्हावे असे नव्हते वाटत. स्मृतिरूप श्याम रामजवळ राहावा, बहीणभावांजवळही राहावा असेच मला वाटत होते.

राम हसला.

''वेडा आहेस तू! अरे मरायला काय झाले? हा बघ घाम येऊ लागला. आता ताप निघेल. नीट पडून रहा. मी खाली जातो. तुला जेवायला हवे का?'' त्याने विचारले.

''नको.''

''कढत दूध घे. मग आणीन.'' असे म्हणून तो गेला.

मला खरोखरच घाम येऊ लागला. घाम येत होता त्याचे वाईट वाटत होते. ताप निघणार वाटते! कशाला आला क्षणभर? यायचे होते तर जीवन संपवायला यायचे होते असे मनात म्हणून मी तापावर चरफडत होतो. परंतु एकीकडे घाम पुशीतही होतो. ताप कमी झाला. माझा जरा डोळाही लागला.

''श्याम, कढत दूध घे. हे कोयनेलही घे. ताप निघाला आहे. उद्या येऊ नये म्हणून जपले पाहिजे.'' राम म्हणाला.

मी कोयनेल घेतले. दूध घेतले. शांतपणे झोपी गेलो.

दुसरा दिवस उजाडला. तापनळी लावून पाहिली. ताप मुळीच नव्हता; परंतु मला खूप ग्लानी आली होती. पुस्तक वाचवत नव्हते. मी पडूनच राहिलो.

''श्याम, मागे तू मला वाचून दाखवीत असे, आता मला आजच्या दिवस तुला वाचून दाखवू दे.''

''असे दुसऱ्याने वाचून माझ्या लक्षात येत नाही. मी मनात वाचीन तेव्हाच मला समजेल. असू दे. तू कर अभ्यास...'' मी म्हटले.

आम्ही लवकर जेवलो. परीक्षेला जाण्यापूर्वी थोडे पत्ते खेळलो. शेवटी आईला नमस्कार करून आम्ही दोघे निघालो. परीक्षा सुरू झाली. तिसरी प्रश्नपत्रिका होती. मी जवळजवळ अर्धी लिहिली तो पुन्हा ताप आला. त्या तापाची मला लाज वाटली. आजही पुन्हा कालच्यासारखा देखावा. आवेक्षकांनी मला हात धरून नेले. शिपायाने टांगा आणला. मला घरी पोहोचवण्यात आले.

जेवढे लिहिले होते, तेवढ्याने मी पास झालो असतो; परंतु दुपारची चौथी प्रश्नपत्रिका अजिबात राहिली. आता वर्ष फुकट जाणार! का तेवढ्या विषयाला पुन्हा बसू देतील? अद्याप दुसरे विषय होतेच; त्यांना तरी कोठे जाता येणार होते? मी अंथरुणात पडून तडफडत होतो. समोर भिंतीवर देवांची, देशभक्तांची सुंदर चित्रे होती.

सायंकाळी राम आला. तो मजजवळ बसला.

''राम, आता वर्ष गेलेच फुकट!'' मी म्हटले.

''हो, तसे दिसते खरे. परंतु आपला काय उपाय? पुढच्या वर्षी बस. खिन्न नको होऊ.'' तो म्हणाला.

''एकेक वर्ष असे वाढणे म्हणजे जिवावर येते.''

''खरे आहे. पण काय करणार? खरे ना? पडून राहा. उगीच मनाला त्रास देऊ नकोस.''

तिसरे दिवशी मी परीक्षेला गेलो नाही. उगीच पुन्हा ताप यावयाचा. दुपारी आपला मला ताप भरे. भरपूर भरे. ७ पर्यंतही ताप यायचा. परीक्षा संपली. रामने प्रश्नपत्रिका चांगल्या लिहिल्या होत्या. तो मेडिकल कॉलेजमध्ये जाणार होता. त्या

वेळेस पहिल्या वर्षाची परीक्षा देऊनही कॉलेजमध्ये जाता येत असे. राम पुढे मुंबईस राहणार होता.

''श्याम, मुंबईस कोठे या सुट्टीत नोकरी मिळेल का? तेवढीच मदत होईल मला. पुढे मेडिकल कॉलेजमध्ये जावयाचे आहे. पैशाचे काम. आधी प्रवेश मिळेल तेव्हा! परंतु आपण आशेने तयार राहिले पाहिजे.'' राम म्हणाला.

''राम, माझा दादा आहे त्या खात्यात हंगामी माणसे नेमतात. आपण दादांना पत्र लिहू. मिळेल तुला दोनतीन महिने नोकरी.'' मी म्हटले.

मी दादांना पत्र लिहिले. त्याचे उत्तर आले की, ''या, नोकरी मिळेल.''

तापाने मी अशक्त झालो होतो. मलाही घरी जावयाचे होते. राम व मी मुंबईला दादाकडे जाण्यासाठी निघालो. आम्ही दोघे मित्र असे बरोबर कधीच गेलो नव्हतो. मला खूप आनंद झाला होता. रामबरोबर श्याम जात होता.

दादा कुलाब्याला राहात असे. तेथेच राहायचे, तेथेच काम करायचे. मोकळी हवा, भरपूर जागा. म्हटले तर शहर, म्हटले तर खेडेगाव असे तेथे वाटे. आंबे, शेवग्याच्या शेंगा वगैरेंची तेथे झाडे होती. राम व मी तेथे आलो. वहिनीला आनंद झाला. दादांनाही. राम कामावर जाऊ लागला. मी घरीच असे. वाचीत असे वा झोपत असे.

''श्याम, मी येथे आलो, ते बरे नाही केले.'' राम म्हणाला.

''का बरे? माझ्या भावाचे घरी तुला का परकेपणा वाटतो? वहिनी, दादा सारी कशी छान वागतात!'' मी म्हटले.

''तसे नाही रे; परंतु मी येथे नोकरी करायला नसतो आलो तर तू येथे नोकरी केली असतीस. जे काही शंभर पाऊणशे रुपये मिळाले असते ते तुला उपयोगी पडले असते. तुझा या नोकरीवर आधी हक्क होत नाही?'' राम म्हणाला.

''राम, मी आजारीपणातून उठलेला. मी अशक्त झालो आहे. मला कशी झाली असती नोकरी? मी त्याग करून काही तुला नाही दिली ही जागा. मी बरा असतो तर मीच केली असती नोकरी. राम, तुझ्या मनात असे का आले? कोणी का अशा अर्थाचे बोलले? माझ्या तर मनातही नाही.'' मी म्हटले.

आमचे दिवस मजेत जात होते. माझी प्रकृती सुधारली. आम्ही खेळत असू. दळीत असू. वहिनी कढत कढत भाकरी भाजून देई. आम्ही खात असू. इतक्यात माझी

बहीणही सासरहून आली. तिचा विनोदी व आनंदी स्वभाव. खूप गंमत होई. कोकणातून वडीलही आले. मला पाहण्यासाठी आले. मावशीही लवकरच येणार होती. दादाचे घर म्हणजे जणू गोकुळ झाले. हास्य, विनोद, खेळ, खाणेपिणे... केवळ आनंद होता.

परंतु माझ्या मनात मधून मधून वर्ष फुकट जाणार हे दुःख होते. मी एकटा बसलो म्हणजे ते मनात येई; परंतु तिकडून काहीतरी विनोद करीत अक्का येई व माझे दुःख नाहीसे होई.

''श्याम, ये आपण खेळू.'' वडील म्हणत.

''आपण दोघेच का खेळणार?'' मी म्हणे.

''एकट्यानेसुद्धा खेळता येते. ये. असा खिडकीत नको बसू घुम्यासारखा. अरे, गेले वर्ष तर गेले.'' ते म्हणत.

मुंबईला बाबू म्हणून माझा एक चुलत भाऊ होता. लहानपणी तो व मी कोकणात एकाच शाळेत शिकलो. तो माझ्यापुढे एक इयत्ता होता. तो मुंबईला इंग्रजी शिकू लागला. तो आता कॉलेजमध्ये होता. तो इंटर सायन्सच्या परीक्षेस बसला होता; त्याचा लवकरच निकाल लागावयाचा होता. बाबूला निकाल आधीच कळला होता. परंतु संपूर्णपणे कळला नव्हता. पहिला वर्ग त्याला मिळाला होता; परंतु पहिल्या वर्गात तो पहिला आला होता की काय ते कळायचे होते.

बाबू दादाकडे आला होता. बाबू फार हुशार होता. तो आनंदी होता. पहिला वर्ग मिळाला आहे, परंतु पहिला आलो आहे की नाही ते अद्याप कळायचे आहे वगैरे माहिती त्याने दिली. माझ्या वडिलांनी बाबूस शाबासकी दिली. सर्वांना आनंद झाला होता.

''बाबू, पेढे कधी देणार?'' अक्काने विचारले.

''एकेक नाही पुरणार. दोनदोन तरी हवेत.'' दादा म्हणाले.

''अरे, पण खरोखर निकाल लागू दे. ही आतील बातमी काय कामाची? पेढे घेऊन येईन. श्याम; तुला किती हवेत पेढे?'' त्याने माझ्या पाठीवर हात मारून म्हटले.

''मला मुळीच नकोत!'' मी म्हटले.

''सर्वांचे गोळा करून खाशील.'' बाबू म्हणाला.

''श्यामला गोड नाही आवडत.'' आक्का म्हणाली.

"परंतु पेढ्याचे गोड आवडते." दादा म्हणाला.

"श्यामचे पेढे रामला जायचे नाहीतर. रामभाऊंची मजा आहे." वडील म्हणाले.

"राम आहे तर सारे आहे." श्याम म्हणाला.

बाबू गेला. चहा घेऊन गेला. आनंदी व मोकळ्या स्वभावाचा, स्पष्टवक्ता व करारी बाबू निघून गेला. मी मात्र अधिकच खिन्न झालो. बाबू पास झाला. त्याला पहिला वर्ग मिळाला. कदाचित् तो पहिलाही येईल. आणि मी? माझे वर्ष फुकट जात होते. वर्ष फुकट नसते गेले तरी पहिला वर्ग थोडाच मिळाला असता? मला गणित येत नाही, शास्त्र समजत नाही. मी माझ्या स्वत:च्या दुखात पुन्हा मग्न झालो.

कामावरून राम आला. परंतु मी हसलो नाही. मी आरामखुर्चीत डोळे मिटून पडलो होतो. रामला वाटले की मला झोप लागली आहे, तोही बोलला नाही. परंतु मी डोळे उघडले.

"झोप नव्हती वाटते लागली? खोटे खोटे सोंग." राम म्हणाला.

"मला बरे नाही वाटत." मी म्हटले.

"कपाळ का दुखते?"

"नाही."

"ताप का आला आहे?"

"नाही."

"मग काय होते?"

"कळत नाही. मनाचे दुखणे आहे. मनाच्या दुखण्यावर कोणता उपाय?"

"हसावे, खेळावे, खुर्चीतुन उठून बाहेर पडावे; फिरायला जावे. मनाचे दुखणे बरे करणे आपल्या हाती असते." राम म्हणाला.

ते बोलणे तसेच राहिले. दोन दिवस गेले. बाबूच्या परीक्षेचा निकाल वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाला. बाबू पहिल्या वर्गात पहिला आला होता. त्याला शिष्यवृत्त्या मिळाल्या होत्या. दादाने, रामने निकाल वाचला. सर्वांना आनंद झाला. परंतु मी तेथून उठून गेलो. त्या आनंदात मी सहभागी झालो नाही. बाहेर झाडाखाली मी हिंडत होतो.

इतक्यात बाबू आला. पेढे घेऊन आला. त्याला पाहताच माझे तोंड काळवंडले. मत्सराचे काळे ढग तोंडावर पसरले. बाबू पहिल्या वर्गात पहिला आला. आणि मी?

बाबूचे यश मला बघवेना. भावाच्या यशाचे मला वैषम्य वाटले. मी घरात गेलो नाही. मी बाहेरच हिंडत राहिलो.

घरात सारे बाबूभोवती जमले होते. सारेजण पेढे खात होते. परंतु एकलकोंडा मत्सरी श्याम तेथे नव्हता.

''श्याम कोठे आहे?'' वडिलांनी विचारले. त्यांनी मला हाका मारल्या. मी घरात गेलो. बाबू माझ्याजवळ आला. तो मला पेढे देऊ लागला; परंतु मी घेईना. त्याने चार पेढे पुढे केले. सारे पुढे केले. परंतु माझा हात पुढे होईना.

''श्याम, घे ना रे.'' बाबू म्हणाला.

''तो एवढे देतो तर घे. न घेतलेस तर त्याला काय वाटेल? घे हो श्याम.'' आक्का म्हणाली.

''अरे, तुझे वर्ष फुकट गेले म्हणून वाईट नको वाटून घेऊ. तूही येशील पहिल्या वर्गात. ये. असे नये करू.'' वडील म्हणाले.

परंतु मी पेढा घेतला नाही. बाबूला वाईट वाटले. परंतु तो मोकळ्या स्वभावाचा. श्यामची लहर नसेल असे त्याला वाटले. मत्सराचे जहर श्यामच्या मनात असेल अशी शंकाही त्याला आली नाही. त्याने पेढे देऊन ठेवले व तो म्हणाला, ''मी गेलो म्हणजे श्याम खाईल, सारे खाईल.''

बाबू निघून गेला. मी नंतर पेढा खाल्लाही. परंतु त्या दिवशीचे माझे वर्तन फार वाईट होते. दुसऱ्याच्या यशात, आनंदात, सुखात आपणास सहजपणे भागीदार होता आले पाहिजे. माझ्या भावाच्याही यशात मी भागीदार होऊ शकत नव्हतो. मग जगाच्या सुखदु:खात कसा झालो असतो?

तो दिवस मला आठवतो व माझी मला लाज वाटते. मनुष्य आपली स्वत:ची तुलना नेहमी दुसऱ्याशी करीत असतो. त्या तुलनेत तो हिणकस ठरला तर त्याला वाईट वाटते. वाईट वाटून वर चढण्यासाठी मनुष्य झटला तर त्यात काही वावगे नाही. परंतु वाईट वाटणे निराळे आणि दुसऱ्याचा द्वेषमत्सर करणे निराळे. आपण प्रयत्न करून दुसऱ्याप्रमाणे व्हावे, गुण अंगी आणावे, कीर्तिमान् व्हावे, परंतु दुसऱ्याचा द्वेष नको. त्या दुसऱ्याला गुरू करावे.

अद्यापही ती क्षुद्र वृत्ती माझी संपूर्णपणे गेली आहे असे नाही. जगात जगावे तर पहिल्या प्रतीचे होऊन जगावे असे मला मधून मधून वाटते. नाहीतर मरून जावे.

आपल्यात जेवढे गुणधर्म असतील त्यांचा आपण विकास करावा. पण बेडकीने बैल होऊ पाहू नये. शेवंतीने गुलाब होण्याच्या भानगडीत पडू नये. आपली जी शक्ती असेल ती वाढवावी; शक्यता असेल त्याच गोष्टीपाठीमागे जावे. उगीच निराश व दु:खी होण्यात काय अर्थ? तो मूर्खपणा आहे.

दुसऱ्यांच्या गुणांचा, दुसऱ्यांच्या कर्तृत्वाचा मनापासून गौरव करणे, त्यांना धन्यवाद देणे, त्यांची आणखी उन्नती व्हावी म्हणून त्यांना मदत करणे, ते पुढे जावेत म्हणून खटपट करणे हे थोर मनाचे लक्षण आहे. माझ्याजवळ ही वृत्ती नव्हती. ती प्रयत्नाने मी अंगी आणली आहे. दुसऱ्यांच्या कर्तृत्वात आनंद मानायला व स्वत:ला जे करता येईल ते नम्रपणे जगाला द्यायला मी शिकत आहे. आपली क्षुद्र वृत्ती कमी करीत जाणे म्हणजेच जगणे.

+++

सत्याग्रह

महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह संपवून स्वदेशी परत आले होते. भारतसेवक समाजास त्यांनी मिळावे अशी नामदार गोपाळकृष्ण गोखले यांची इच्छा होती. परंतु महात्माजींना त्यांनी इच्छास्वातंत्र्य दिले होते. ते गांधीजींना म्हणाले, ''तुम्ही हिंदुस्थानभर हिंडा. परिस्थिती पाहा. नंतर काय ते ठरवा. घाई नाही.''

गांधीजी हिंदूस्थानभर हिंडू लागले. राजकारणही आध्यात्मिक असले पाहिजे हा विचार ते अनेक ठिकाणी सांगत होते. सत्याचा प्रकाश हवा. आपले राजकारण देवासमोर नेण्याच्या लायकीचे असले पाहिजे, असे ते सांगू लागले. गांधीजी हिंडत हिंडत कविसम्राट रवींद्रनाथ यांच्या शांतिनिकेतनात गेले. तेथे असतानाच नामदार गोखले देवाकडे गेल्याची अत्यंत दु:खद वार्ता त्यांना कळली.

बनारस हिंदु विश्वविद्यालयाचा पदवीदान समारंभ होता. समारंभास गांधीजींनाही आमंत्रण होते. त्या समारंभास मोठमोठे अमीर, उमराव होते. मोठमोठे संस्थानिक होते. त्यांच्या अंगावर भरजरी पोषाख होते. अंगावर सोन्यामोत्यांचे,

हिरेमाणकांचे अलंकार होते. हिंदुस्थान दरिद्री आहे, लाखो लोक अर्धपोटी येथे राहतात, ही गोष्ट तेथील तो लखलखाट पाहून कोणाला खरी वाटली असती का?

गांधीजींना तेथे बोलण्याची विनंती करण्यात आली. ती सौम्यमूर्ती उभी राहिली व तिचे हिंदीत भाषण सुरू झाले. गांधीजी काय म्हणाले?

''राजेरजवाड्यांचा हा थाटमाट पाहून मला लाज वाटते. प्रजा निरक्षर आहे. दारिद्र्य अपरंपार आहे. उद्योगधंदे बुडाले आहेत. आरोग्य नष्ट झाले आहे. रोग फैलावत आहेत. आपली प्रजा मरणपंथास लागली असता हे विलास यांना कसे सुचतात?'' अशा आशयाचे ते भाषण होऊ लागले. आजपर्यंत अशी स्पष्ट वाणी भारतात कोणीही उच्चारली नव्हती. हिंदीतून कोणी बोलला नव्हता. गांधीजींचे भाषण मध्येच बंद करण्यात आले!

गांधीजी हिंदुस्थानभर हिंडले. कोणत्याही संस्थेस न मिळता त्यांनी स्वतंत्रच राहण्याचे ठरविले. साबरमतीच्या तीरावर त्यांनी आश्रम स्थापिला. ज्या ठिकाणी प्राचीन काळी दधिची तपश्चर्या करीत होते तेच हे ठिकाण. जगाच्या कल्याणासाठी दधिची ऋषींनी स्वत:ची हाडे इंद्रास दिली, त्याच ठिकाणी गांधीजीही आपले निर्मळ जीवन जगाला देण्यासाठी साधना करू लागले. १९३० साली या आश्रमातूनच सत्याग्रहाची यात्रा सुरू होईल असे कोणास वाटले असेल काय?

हिंदुस्थानभर प्रचंड सभा झाल्या. सरकारला प्रत्यक्ष आव्हान अद्याप कोणी दिले नव्हते. ही सर्व जनतेची चळवळ होती. नि:शस्त्र चळवळीत सर्व जनता सामील होऊ शकते. अशा सभा पूर्वी झाल्या नव्हत्या. असा उत्साह सर्व जनतेत मोकळेपणे कधी संचारला नव्हता.

हुतात्मा स्वामी श्रद्धानंद दिल्लीला होते. दिल्लीचा जनतासागर सभेला लोटला. श्रद्धानंद पुढे होते. पाठीशी हजारो लोक लाटांप्रमाणे हेलावत होते. गुरखे शिपाई स्वामीजींना आड आले. त्यांनी बंदुका रोखल्या.

''चलाव तेरी गोली!'' स्वामीजी निर्भयपणे म्हणाले. ते अद्भुत तेज होते. भारताचा आत्मा प्रकट होत होता. पहाडाप्रमाणे धिप्पाड असे स्वामीजी होते. श्रद्धानंदांनी मुसलमान बंधूंच्या मशिदीतून भाषणे केली. गोळीबाराला बळी पडलेल्या हिंदू हुतात्म्यांना पोहोचवण्यासाठी मुसलमान आले. मुसलमान हुतात्म्यास हिंदूंनी खांदा दिला. ज्या श्रद्धानंदांना मुसलमानांनी मशिदीतून व्याख्यानासाठी पाचारिले,

त्यांचाच वध एक मुसलमान बंधू करतील असे त्या वेळेस कोणाला सांगितले असते तर खरे वाटले असते का? परंतु असे प्रकार मानवी इतिहासात होत असतात. मानव समाजाचा प्रवाह सदैव सरळ वाहत नसतो. तो कधी वाकडा, कधी सरळ, कधी उथळ, कधी गंभीर असाच चालत आला आहे.

महात्माजी मुंबईला होते. प्रार्थना व उपवासदिनाला मुंबईत कधीही पूर्वी पडला नव्हता असा हरताळ पडला. समुद्रावर लोक पर्वणी समजून स्नानाला गेले. माणुसकी मेली म्हणून डोक्यावर टोपी न घालता लाखो लोक सभेला जमले.

मी त्या वेळेस मुंबईस होतो. मी त्या सभेला गेलो होतो. अफाट सभा. जिकडे तिकडे माणसेच माणसे. झाडावरून कित्येक लोक चढले होते. कोणी ताडाच्या उंच झाडावरही चढले होते. जणू काय देव खाली ऐकायला आले होते. राष्ट्राची मान उंच होत होती.

त्या वेळेस मी महात्माजिस पाहिले. प्रथमच पाहिले. भारताचा आत्मा पाहिला. भारताची पूंजीभूत पुण्याई पाहिली. भारताचे तप पाहिले, वैराग्य पाहिले. चालती बोलती गीता पाहिली. सत्यप्रेमाचा नवा अवतार पाहिला. माझे डोळे भरून आले होते. मी सद्‌गदित झालो होतो. एक प्रकारे हृदय उचंबळून आले होते.

महात्माजींचे सर्वांत मोठे राष्ट्रावर उपकार म्हणजे त्यांनी जनतेला निर्भय केले. पूर्वी राजकारण तिसऱ्या मजल्यावर चाले. कोणी ऐकत नाही ना? गुप्त पोलीस नाही ना? अशा सावधगिरीने चाले; परंतु गांधीजींनी राजकारण उघडे केले.

स्वातंत्र्याची गाणी पोरेबाळे म्हणू लागली. सर्व राष्ट्राचा आत्मा मुक्त झाला. स्वातंत्र्याला वाचा फुटली. निःशस्त्र जनताही अन्यायाविरुद्ध उभी राहू शकते. जनतेला आत्मविश्वास आला. शंभर वर्षे कोंडलेली, गुदमरलेली आत्मज्योती पुन्हा प्रज्वलित झाली. म्हणून सर सॅम्युअल होअर म्हणतात, "गांधींच्यामुळे आम्ही हिंदुस्थानाकडे अधिक आदराने पाहू लागलो." हिंदुस्थान राष्ट्र आहे, तेथे माणसे नांदतात, ही गोष्ट जगला कळली. महात्माजींनी मेंढरांना माणुसकी दिली.

महाराष्ट्राच्या इतिहासात एक दंतकथा आहे. ज्याच्या नावाने आपण शालिवाहन शक मानतो, त्या शालिवाहन राजाने कुंभारांच्या मडक्यांचे घोडेस्वार बनवून शक शत्रूंचा पराजय केला अशी दंतकथा आहे. या दंतकथेचा अर्थ काय? अर्थ इतकाच की, महाराष्ट्रातील लोकांची डोकी म्हणजे मडकी झाली होती. लोकांत तेज नव्हते.

मातीप्रमाणे लोक पडले होते. कोणीही येऊन तुडवावे. परंतु शालिवाहन राजाने या मातीत तेज ओतले. मडक्यांची झुंजार माणसे झाली. श्री शिवाजी महाराजांनी हेच केले. मावळ्यांत तेज ओतून त्यांच्याकरवी साऱ्या पातशाह्या हादरविल्या. महात्माजींनी हेच केले. मृतवत् पडलेल्या राष्ट्रांत त्यांनी चैतन्य ओतले. राष्ट्र उभे राहिले. लढू लागले. नि:शस्त्राच्या शस्त्राने लढू लागले.

ती विराट सभा झाली. मी घरी आलो. दुसऱ्या दिवशी सायंकाळी मी चौपाटीवर गेलो. मी चौपाटीवर सारखा हिंडत होतो. फिरायला येणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या पाठोपाठ जात होतो. लोक काय बोलतात, त्यांची कशाविषयी चर्चा चालली आहे, ते ऐकण्याची मला उत्सुकता होती. कोठे कोठे लोकांचे समुदाय बसलेले असत. मी जवळ बसून त्यांचे बोलणे ऐके.

मला काय ऐकू आले? लोकांच्या ओठांवर कोणते शब्द होते? कशाची चर्चा चालली होती? देशाच्या गोष्टी होत्या का? सत्याग्रहाचा उच्चार होत होता का? स्वदेशीचा बोलबाला होत होता का? काय ऐकू आले?

देशाशिवाय सारे ऐकू येत होते. सत्याग्रह, स्वदेशी, स्वातंत्र्य याशिवाय सारे ऐकू येत होते. प्रत्येकाच्या बरोबर त्याचा त्याचा संसार होता. कोणी आपल्या ऑफिसातील कथा सांगत होते. कोणी नोकरीबद्दल बोलत होते. स्वत:च्या वर्तुळापलीकडे कोणी जात नव्हते.

समोर अनंत सागर उचंबळत होता. भारतात नवचैतन्याचा सागर उचंबळेल का? उचंबळून कायम टिकेल का? मी एका खडकावर बसलो होतो. सारे लोक चहा, चिवडा, चिरुट याचेच का भक्त? भव्य, दिव्य असे त्यांना नाही का सुचत? सारा पोरखेळच का? राष्ट्राची नाडी देशप्रेमाने ताडताड का उडत नाही? का नाही देशाच्या गोष्टी ओठावर? त्या पोटातच नसतील का?

मी या विचारात होतो. कितीतरी वेळ श्याम तेथे बसला होता. रात्र झाली. आजूबाजूस दिवे लागले. समुद्राच्या लाटांवरील स्वच्छ फेस अधिकच सुंदर दिसू लागला. लोकांना मी नावे ठेवीत होतो. त्यांचा तिरस्कार करीत होतो.

मी लोकांची परीक्षा घेत होतो; परंतु माझी परीक्षा कोण घेणार? मी त्याची नाडी तपाशीत होतो; परंतु माझी कोण तपासणार? मी त्यांना नावे ठेवली, त्यांना तुच्छ मानले. परंतु मला अधिकार होता का? माझे हृदय तरी शाबूत होते का? मी

देशासाठी मरणार होतो का? स्वदेशीला वाहून घेणार होतो का? मी काय करणार होतो?

मी लाजलो. मी उठलो. माझ्या हातून काय होणार हा विचार आला. माझ्या डोळ्यांसमोरून लोक गेले. श्यामचे जीवन श्यामसमोर उभे राहिले. त्या लाटांजवळ मी गेलो. कितीतरी वेळ त्या लाटांत मी उभा होतो. देशप्रेमाच्या लाटा माझ्या जीवनात अशा रात्रंदिवस उसळतील का असे मनात आले. समुद्राला ओहोटी आहे, भरती आहे. परंतु लाटा रात्रंदिवस आहेत. देशभक्ती कधी कमी कधी जास्त, परंतु सदैव जागृत असेल का?

मला काही कळेना. डोळे मिटून श्याम उभा होता. त्या वेळेस माझी काय मन:स्थिती असेल ते सांगता येत नाही; परंतु शेवटी हात जोडून मी देवाला म्हटले.

''या श्यामच्या हातूनही थोडेफार करून घे. माझे हातही तुझे कार्य करायला पसंत कर.''

मित्रांनो, आपण सामान्य माणसे. आपण एखादे वेळेस उसळतो; प्रचंड आदळआपट करतो. पुन्हा थंडावतो, गप्प बसतो. कधी बिजली चमकते, कधी अंधार गुडुप. स्थिर असा ध्येयाचा नंदादीप, स्थिर कर्तव्यनिष्ठा, क्षण न् क्षण ध्येयसेवेने नटविणे हे आपल्या हातून होत नसते.

परंतु अखंड निष्ठेशिवाय कार्य होत नाही. स्थिर अशी सतत सेवा झाली पाहिजे. ध्येयाचा विसर कधीही पडता कामा नये. असे लोक जेव्हा मिळतील, तेव्हा समाजाला नवी कळा चढेल. स्वत:चे जीवन व समाजाचे जीवन कृतार्थ होईल.

जगाची परीक्षा घेणारा न होता, जीवनाच्या परीक्षेत मी कसा उत्तीर्ण होईन याचीच चिंता मला लागो. माणुसकीची परीक्षा द्यायला आलेले आपण सारे उमेदवार आहोत. त्यात उत्तीर्ण होण्यासाठी प्रयत्न करूया. पहिल्या वर्गात उत्तीर्ण न झालो तरी निदान काठावर तरी उत्तीर्ण होऊया.

+++

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

दवाखान्यात

अद्याप उन्हाळ्याची सुट्टी होती. राम तात्पुरती नोकरी करीत होता. मी कर्मशून्यच होतो; परंतु एकाएकी माझ्या उजव्या बरगडीत खूप दुखू लागले. तेथे एक लहानसे टेंबुकही आले. पुष्कळ तेल चोळले, शेकले; परंतु वेदना राहात ना. शेवटी बिब्बा घालता. परंतु त्यानेही काही झाले नाही.

मला वाईट वाटत होते. परीक्षेच्या वेळेस मला ताप आला. त्यामुळे वर्ष फुकट जाणार हा विचार दुःख देतच होता. पुढे काय करावयाचे हा प्रश्न मनासमोर होता. त्यात हे आजारीपण. दादावर सारा भार. दादाला पगार फार नव्हता. चाळीस रुपये होता. त्यात तो काय काय करणार?

''श्याम, फारच त्रास होतो का?'' रामने विचारले.

''हो.'' मी म्हटले.

''पुण्याला येतोस?''

''तेथे कोठे राहावयाचे?''

''एखाद्या मोफत दवाखान्यात. एका दवाखान्यात थोडी ओळख आहे. तेथे ठेवतील तुला. नीट परीक्षा केली जाईल. पुण्याला, आई वगैरे आहेतच. ती मधून मधून दवाखान्यात येत जाईल. येतोस पुण्याला?''

''उद्या ठरवू.''

''रामला झोप लागली. मला झोप नव्हती. मी शांतपणे पडून होतो. पुण्याला जाण्यायेण्याचा खर्च करावा लागला असता. गरिबांना दुखणी येऊ नयेत; परंतु आमच्यापेक्षा दरिद्री होते त्यांचे काय? त्यांना आजाराचा विचार करायला वेळच नसतो. आजारी मुले खोलीत टाकून कामावर जावे लागते. रजा मिळत नाही. मिळाली तर पगार नाही. कठीण अवस्था.

शेवटी पुण्यास जाण्याचे ठरले. राम बरोबर येणार होता. आगगाडीत बसून निघालो. आगगाडीत कोण गर्दी. त्या गर्दीत आजाऱ्याला कोण विचारतो? रामच्या खांद्यावर मान ठेवून मी बसलो होतो. झोपायला जागा नव्हती. वेदना त्रास देत होत्या. एका स्टेशनवर जरा जागा झाली. मी पडून राहिलो. पाय फार लांब करण्याइतकी जागा नव्हती; परंतु अगदीच बसून होतो, त्यापेक्षा बरे. परंतु पुढच्याच स्टेशनवर एक सद्‌गृहस्थ आले.

''अहो, जरा उठून बसा.'' तो म्हणाला.

''त्यांना बरे नाही.'' राम म्हणाला.

''सेकंड क्लासमध्ये जायचे होते.'' सद्‌गृहस्थ म्हणाले.

मी उठून बसलो. तिसऱ्या वर्गाच्या डब्यात बसणाऱ्याने आजारी पडता कामा नये, आजारी असले तरी निजता कामा नये, हे ज्ञान मला झाले. ते सद्‌गृहस्थ सुशिक्षित होते; परंतु अशिक्षित पत्करले. अशिक्षित अधिक सहानुभूती दाखवतात. कारण कायद्याचे ज्ञान त्यांना थोडे कमी असते. भूतदयेचा कायदा त्यांना माहीत असतो. सुशिक्षिताला सरकारी कायदा माहीत असतो आणि सरकारी कायदा जाणणारे पुष्कळदा माणुसकीचा कायदा विसरून जातात.

लोकमान्य टिळकांनी ''जो आजूबाजूच्या दु:खाचा विचार करून वागतो तो सुशिक्षित'' अशी एकदा व्याख्या केली होती. मनुष्य ज्या मानाने दुसऱ्याच्या दु:खाचा अधिक विचार करील त्या मानाने तो अधिक सुशिक्षित. एखादा निरक्षर मनुष्य जर दुसऱ्याच्या दु:खाने दु:खी होत असेल, ते दु:ख दूर करू बघत असेल तर तो दुसऱ्याच्या

दु:खाने दु:खी होत असेल, ते दु:ख दूर करू बघत असेल तर तो दुसऱ्याच्या दु:खाविषयी उदासीन व बेफिकीर राहणाऱ्या पदवीधरापेक्षा अधिक सुशिक्षित समजावा. मनुष्याच्या शिक्षणाचे माप सहानुभूतीच्या नळीने घ्यावे.

आम्ही पुण्यास आलो. राम, त्याची आई व मी अशी त्या दवाखान्यात आलो. तो मोफत दवाखाना होता. प्रचंड होता. कितीतरी येथे डॉक्टर, किती दाया, किती दालने, किती व्यवस्था! मला तपासण्यासाठी टेबलावर निजविण्यात आले. रोग्याची परीक्षा सुरू झाली. दोनचार डॉक्टर होते. त्यांचे तर्क चालले होते.

"तुम्हाला कधी नारू झाला होता का?"

"नाही."

"कधी लहानपणी पडला होता?"

"लहानपणी पडलो असेन; परंतु आठवते त्या वेळेपासून पडलो नाही. निदान येथे बरगडीत लागण्याइतके कधी लागले असे आठवत नाही."

"मधून मधून दुखत असे का?"

"पूर्वी नव्हते कधी दुखत. आताच दुखू लागले."

"चमत्कारिक दिसतो रोग. पाहून या. तुम्हाला दवाखान्यात ठेवून घेतो. 'क्ष' किरणांनी फोटो घेऊ."

डॉक्टरांची आपसात चर्चा चालली होती. मला नेण्यात आले. एका खाटेवर निजवण्यात आले. मला नवीन कपडे देण्यात आले. माझे घरचे कपडे काढण्यात आले. राम व त्याची आई निघून गेली. रामला परत मुंबईस जावयाचे होते. त्याला रजा नव्हती.

मी खाटेवर पडलो होतो; परंतु एकाएकी मला ताप आला. अंग फणफणत होते. बरगडीतील वेदना दूर राहिल्या. तापाने निपचित पडून राहिलो. ते टेंबूक आपोआप नाहीसे झाले. 'क्ष' किरणांनी फोटो काढण्यात आला; परंतु काही विशेष असे दिसून आले नाही.

मला रात्री मुळीच झोप येत नसे. मी जागा असे. बारानंतर दिवे बारीक होत. आजूबाजूचे रोगी जरा जरा झोपत. परंतु मी जागाच. झोप नाही म्हणजे काही नाही. खरोखर झोप म्हणजे देवाची थोर देणगी आहे. सारे शारीरिक व मानसिक ताप आपण झोपेत विसरतो. शत्रूमित्र विसरतो. सुखदु:खे विसरतो. पापपुण्ये विसरतो. जणू मुक्तात्मे आपण होतो. गढूळ पाण्यात निवळ टाकली म्हणजे सारा गाळ खाली बसून

निर्मळ पाणी वर राहते, त्याप्रमाणे झोपेची निवळ गढूळ त्रस्त जीवनात पडली म्हणजे जीवन निर्मळ व शांत होते. झोप म्हणजे महान् रसायन, झोप म्हणजे अमृत. शरीराची, मनाची, बुद्धीची– सर्व झीज झोपेत भरून येते. झोप म्हणजे औषधींची औषधी. सर्व जखमांवरचे रामबाण मलम म्हणजे झोप. झोप म्हणजे सर्वांत मोठी दाई, सर्वांत मोठी आई. झोपेच्या कुशीत मनुष्य गेला की ताजातवाना होऊन उठतो. अंतर्बाह्य तरतरीत होऊन उठतो. झोपेचा लोप होणे म्हणजे ईश्वरी कोप होय!

मला झोप येईना. काय करावे सुचेना. पहाट केव्हा होते, याची मी वाट पाहात असे. चार वाजले की कढत चहा आम्हाला येई. मी चहा पीत नसे. चहाबरोबर ब्रेड पण असे. चहा आला म्हणजे मी समजे की आता उजाडणार. तो चहा म्हणजे जवळजवळ दुधाशिवाय असे. फारच बेताचे दूध त्यात असे.

दुपारी दहाअकरा वाजता वाटीभर साबुदाणा मिळे. साबुदाण्याचा मऊ भातच म्हणा ना. तो लचका असे. त्यात दूध नसे. तो साबुदाणा मी खात असे. दोनतीन वाजता फळे मिळत. अंडीही मिळत. तोपर्यंत अंडे मी पाहिले नव्हते.

"हे काय आहे?"

"अंडे."

"ते कशाला? मी अंडी नाही खात, हे नका आणीत जाऊ. फळे ठेवीत जा."

फळे मोठ्या सुपारीएवढाली असत. ती संत्री होती की मोसंबी मला आठवत नाही; परंतु फारच बारीक व लहान असत.

त्या दवाखान्याचा अपरंपार खर्च असे. रोग्यांसाठी म्हणून भरपूर दूध व इतर वस्तू खर्ची पडत असत; परंतु रोग्यांसाठी पुरेसे नीट वाटणीस येत नसे. दवाखान्यातील सर्वांचा त्यात भाग असे. रोग्यांना कसे दूध मिळते, कशी फळे मिळतात, हे डॉक्टरांनी नको का पाहायला? नर्सनी नको का पाहायला? बरदार्शींनी नको का पाहायला? सर्वांनी चव घेतल्यावर, सर्वांच्या घरी गेल्यावर, मग रोग्यांजवळ त्या वस्तू येत. जगणाऱ्यांची आधी काळजी, मग मरणाऱ्यांची.

सार्वजनिक नीती आपल्या जीवनातून नष्ट झाली आहे. आपण सारे स्वत:पुरते पाहणारे झालो आहोत. कर्तव्याची जाणीव भारतीय जीवनातून नष्ट झाली आहे. एखादा सरकारी डॉक्टर असावा. तेथील दवाखान्यातील रीत पाहा. तेथे डॉक्टर कसा वागतो, कंपाउंडर कसा वागतो ते पाहा. पुष्कळ गरीब लोकांना हे मोफत सरकारी

दवाखाने नकोसे वाटतात. एकदा माझ्या बहिणीकडे मी गेलो होतो. तिच्या नवऱ्याच्या कचेरीतील एक शिपाई तिच्या घरी आला होता. त्याला उसने पैसे पाहिजे होते.

''कशाला रे पैसे?''

''वैद्याला द्यावयाला.''

''तू येथील मोफत दवाखान्यात का जात नाहीस?''

''केव्हा जायचे? दवाखाना आठनंतर उघडणार. मग तेथे केस काढायची. कंपाउंडर खुशीत असला तर देतो पटकन् काढून. मग डॉक्टरांकडे नंबर लागायचा. ओळखीचे लोक आधी पुढे जातात. आमची केव्हातरी वेळ येते. मग औषध घेण्यासाठी बाटली ठेवून बसायचे. परंतु कचेरीची वेळ होऊन जाते. आम्ही शिपाई. आम्हाला आधी जायला पाहिजे. कचेरी उघडून ठेवली पाहिजे. फडका मारला पाहिजे. केव्हा घेणार ते औषध? रजा तर आम्हाला नाहीच मिळायची. गरिबांची चारी बाजूंनी दुर्दशा असते दादा.''

त्या शिपायाचे ते शब्द माझ्या कानात आहेत. हिंदुस्थानातील अधिकारी म्हणजे अरेराव. जनतेचा आवाजच बंद असल्यामुळे या अरेरावांची अरेरावी चालते. आपण जनतेचे सेवक आहोत ही भावना ना डॉक्टरला, ना कोणाला; परंतु ही कर्तव्यभावना जोपर्यंत येणार नाही तोपर्यंत सारे व्यर्थ आहे. स्वराज्य मिळाले तरी काय? शेवटी समाजात राष्ट्रपोषक असे सामाजिक सद्गुण वाढल्याशिवाय सारे फुकट आहे.

आमचे मोफत सरकारी वा इतर सार्वजनिक दवाखाने कितीतरी पटीने सुधारले पाहिजेत; परंतु माणुसकीशिवाय हे कसे व्हायचे? दवाखानेही जणू यंत्रे. सारे यंत्रांप्रमाणे चालायचे. मानवी यंत्र जेथे जगवायचे आहे तेथे दवाखान्यातील माणसांनी यंत्रे बनून कसे होईल? दाई ठराविक वेळी येते. हातात बाटली घेऊन येते. ती दिसताच रोगी मुकाट्याने आ करतो. ती ओतते ते औषध. निघून जाते. दाईच्या हातात बाटली असते, परंतु पोटात प्रेम नसते. तिचे कर्तव्य नीरस असते. केवळ यंत्रमय असते, ''बरे वाटते का? आता आ करा हां. लवकर व्हाल बरे. जरा औषध कडू असायचेच.'' असे गोड शब्द जर दाई बोलेल तर तेच औषध जरा निराळा परिणाम करील. मनुष्याचे मनही प्रसन्न ठेवावे लागते. रोग्याच्या मनाकडे कोणी लक्ष द्यावयाचे? दवाखान्यातील क्रिया साऱ्या निर्जीव व निष्प्राण असतात.

हिंदी राष्ट्राच्या कोणत्याही क्षेत्रात जा, तेथे हेच दिसेल. कारखान्यात जा. तेथे मालक कामगारांना कसे वागवतो ते पाहा. सावकार व जमीनदार यांचेकडे जा. तो शेतकऱ्यांना कसे वागवतो ते पाहा. शाळांतून जा. तेथे शिक्षक विद्यार्थ्यांस कसे वागवतो ते पाहा. कोठेही जा. परस्परांचे संबंध पोकळ, प्राणहीन, केवळ यांत्रिक, भावनाहीन असे दिसतात. दवाखान्यातही तोच प्रकार.

मी अंथरुणावर पडून होतो. जुलाबाचे औषध दिले जाई; परंतु शौचास लागे त्या वेळेस रडू येई. वॉर्डबॉय बेडपॅन लवकर द्यायचा नाही. त्याने दिलेच तर रागारागाने द्यायचा. तंगड्या पटकन् उचलून ते सारायचा खाली. शौचाला झाले तरी ढुंगण पुसायला कागद लवकर मिळायचे नाहीत. कागद मिळाला तरी पुरेसा मिळत नसे.

"अरे, जरा अधिक दे की कागद." मी म्हटले.

"मोफतचा कागद अधिक नसतो." तो वॉर्डबॉय म्हणाला.

वॉर्डबॉय चिरिमिरी अपेक्षितात. जो रोगी रुपया आठ आणे देईल, त्याची ते चिंता वाहतात. त्याला सारे वेळच्या वेळी मिळते. कागद भरपूर मिळतो; परंतु मी कोठून देणार चिरिमिरी?

तिसरे प्रहरी रामची आई व रामचे भाऊ भेटायला येत. येताना फळे आणीत. ती केव्हा येतात याची मी वाट पाहात बसे. त्यांचे तोंड दिसताच माझे तोंड फुले. तो वेळ आनंदात जाई; परंतु ती निघून गेली की पुन्हा यंत्रमय जीवनात अडकून पडायचे.

त्या दवाखान्यातील एक गोष्ट मी विसरणार नाही. एके दिवशी तेथील वसतिगृहातील एक विद्यार्थी आला. तो माझ्या ओळखीचा नव्हता. तो इकडेतिकडे हिंडत येत होता. माझ्या खाटेजवळ तो थांबला. तो माझ्याकडे पाहात होता. मी त्याच्या दृष्टीस दृष्टी देऊ शकलो नाही.

"तुम्हाला बरे नाही का वाटत?" त्याने विचारले.

"वाटेल हळूहळू बरे." मी म्हटले.

"तुमचा चेहरा असा मलूल का?" त्याने विचारले.

"रोगी का कोठे हसतात? त्यांना येथे कोण हसवणार? येथे कोण आहे त्यांचे? बिचारे असतात पडून. औषधापेक्षाही सहानुभूती हवी. या येथल्या रोग्यांजवळ कोण गोड बोलतो, कोण गोड हसतो, कोण सहानुभूतीपूर्वक विचारपूस करतो? रोग्याला सारखी घरची आठवण येते. तो खिन्न होतो. दुसरे काय?" मी म्हटले.

“मी येत जाईन तुमच्याकडे.”

“मी का येथे एकटा आहे?”

“परंतु मी तर येथे एकटा किती जणांकडे जाणार? मी विद्यार्थी आहे. फार वेळ नसतो. एकाचीही चौकशी केली तरी पुरे. मुळीच न करण्यापेक्षा थोडे केलेले बरे नाही का?”

“तुम्ही केव्हा याल?”

“केव्हा येऊ?”

“अगदी उजाडता या. मला रात्री झोप येत नाही. मी कंटाळतो. फुलांना सूर्याचे दर्शन घडताच जशी ती हसतात, तसा मी तुम्हाला पाहून हसेन. झोप न मिळाल्यामुळे कोमेजलेला चेहरा माझा हसेल. उजाडता या. याल?”

“येईन. गजर लावून ठेवीन.”

“फार लवकर नको.”

तो तरुण निघून गेला. मला आनंद झाला. एक नवीन मित्र मिळाला. सहानुभूतीची नवीन जागा, नवीन स्थान. परंतु मनात शंका आली. तो येईल का? तो थट्टा करीत होता? परंतु त्याच्या चेहऱ्यावर प्रामाणिकपणा होता. डोळ्यांत करुणा होती, आपलेपणा होता. येईल तो. तो फसवणार नाही. फसवणाऱ्याचा चेहरा निराळा असतो.

परंतु काय असेल ते असो. त्या दिवशी मला झोप लागली. कितीतरी दिवसांत अशी गाढ झोप लागली नव्हती. पहाट केव्हा होते याची मी रोज वाट पाहात असे. माझ्या खाटेवरून फुललेली फुले दूर दिसत. ती मी बघत असे; परंतु पहाटेची रोज प्रतीक्षा करणारा आज माझे डोळे त्यांच्याकडे बघत नव्हते. माझे डोळे मिटलेले होते. मी शांत झोपत होतो.

मी जागा झालो. प्रसन्न वाटत होते. तो तरुण विद्यार्थी आला होता का? त्याने हाक मारली असेल का मला? तो आलाच नाही? पडल्या पडल्या मनात विचार येत होते. इतक्यात माझ्या उशीजवळ दोन सुंदर सुगंधी फुले दिसली. ताजी मधुर फुले. कोठून आली होती ती फुले? ती का बगीच्यातून माझे डोळे फुलवण्यासाठी धावून आली? कोणी आणली ती फुले, कोणी ठेवली?

होय, तो तरुण येऊन गेला. फुले देऊन निघून गेला. प्रेम व सहानुभूती यांचा पवित्र व निर्मळ सुगंध देऊन गेला. मला जाग आली नाही याचे वाईट वाटले. अशी

कशी झोप लागली? रोज लागत नाही, आजच का लागली? देव आला परंतु माझा दरवाजा बंद होता. त्याने ठोठावले परंतु मी गाढ झोपेत होतो. ती फुले मी हातात घेतली. त्यांच्याकडे पाहात होतो. हातातून मी ती खाली ठेवली. हातात ती लवकर कोमेजतील अशी भीती वाटली; परंतु लवकर वा उशिरा ती कोमेजणारच. ती देणगी कोमेजणार, केरात जाणार. परंतु ती देणगी मजजवळ आहे. पार्थिव रूपात नसली तरी चिन्मयरूपात आहे. ती फुले मी कधी विसरेन का? ती फुले कधीही कोमेजणार नाहीत. ती सदैव टवटवीत आहेत. हे जग वाईट आहे असे मनात येताच ती फुले मला आठवतात. ती मला सावध करतात. या जगाविषयी कृतघ्न नको होऊ असे सांगतात.

ती फुले कोणी पाहील, कोठून आणलीस म्हणून कोणी विचारील असे मला वाटले. ती फुले मी लपवून ठेवली. उशीखाली ठेवली. उशीखालूनही त्यांचा वास येत होता. तो तरुण मला पुन्हा दिसेल अशा आशेने मी दिवसभर वाट पाहात होतो. माझे डोळे त्याला शोधीत होते. हजारो चेहरे आले व गेले; परंतु तो चेहरा मला दिसला नाही.

दिवस गेला. रात्र आली. आज झोप लागली तरी पहाटे जागे राहावयाचे असे मी ठरविले. झोप केव्हा लागली ते कळले नाही. आणि मी पहाटे जागा झालो नाही. बरेच दिवसांची उरलेली झोप. ती भरून निघायची होती. पहाटेच्या पाखरांच्या किलबिलाटाने मी जागा झालो नाही. चहा व ब्रेडवाल्याच्या आवाजाने जागा झालो नाही. मी शांतपणे झोपलो होतो. जागा झाल्यावर आधी फुले आहेत का पाहिले. होती. आजही तो मित्र येऊन गेला. अज्ञात मित्र येऊन गेला. तो मित्र मिळाला या सुखद विचाराने तर मला झोप नसेल ना लागत? माझ्या जीवनाच्या खोल भागात शिरून तेथून तो मित्र का मला आराम देत होता?

"तुम्हाला आता घरी जायला हरकत नाही." डॉक्टर म्हणाले.

"बरे." मी म्हटले.

तिसरे प्रहरी रामची आई व त्याचे भाऊ आले होते. मी दवाखान्यातील कपडे काढले. माझे कपडे घातले. दवाखाना सोडून मी निघालो; परंतु तो तरुण केव्हा भेटेल? ना त्याचे नाव माहीत, ना गाव. उद्या तो उष:काली येईल, फुले घेऊन येईल, परंतु खाट रिकामी दिसेल. त्याला काय वाटेल? माझ्यासाठी आणलेली फुले तो दुसऱ्या रोग्यास देईल का? दुसरे रोगी रोज बघत असतील. त्यांना मत्सर वाटत असेल का? जे मजविषयी त्यास वाटे ते दुसऱ्या रोग्यांबद्दल वाटेल का? मी गेलो असे पाहून त्याला

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

वाईट वाटेल का? का घरी गेला, घरच्या प्रेमळ वातावरणात गेला असे मनात येऊन त्याला बरे वाटेल? काय होईल त्याची मनःस्थिती?

अंथरुणात पुष्कळ दिवस पडून राहिल्यामुळे व एक पाय जरा आखडून मी निजत असल्यामुळे माझा एक पाय आखडून गेला. तो जमिनीस लागेना. मी घाबरलो. रामच्या भावाचा आधार घेऊन मी बाहेर गेलो. टांग्यात बसलो. त्या फूल देणाऱ्या मित्राला प्रणाम करून निघालो.

''कोणाला केलास प्रमाण?'' बाळूने विचारले.

''दवाखान्यातील देवाला.'' मी म्हटले.

''जेथे सेवा होते, तेथे देवच आहे. थोडीफार, वेडीवाकडी तरी येथे अनाथांची सेवा होते. म्हणून येथे देव आहे. दवाखाना म्हणजे मंदिर.''

परंतु माझ्या डोळ्यांसमोर डॉक्टर नव्हते, दाया नव्हत्या, खाट नव्हती. औषधे नव्हती. माझ्या डोळ्यांसमोर शेवटी शेवटी भेटलेला तो तरुण होता, हळूच फुले देऊन जाणारा तरुण. जगाला प्रेम द्यावे, जगाला न कळत द्यावे, असे का तो मला शिकवून गेला?

पुन्हा तो तरुण मला भेटला नाही. पुष्कळ दिवसांनी त्या दवाखान्याभोवती, त्या वसतिगृहाभोवती मी मधून मधून फेऱ्या करीत असे; परंतु वसतिगृहात कधी गेलो नाही. देवाचे सहज दर्शन झाले तर बघत असे. परंतु देवाचे दर्शन झाले नाही. ''फुलांच्या स्मृतीरूपाने तो मजजवळ आहे.''

✦✦✦

धाकट्या भावाचे पत्र

दवाखान्यातून रामच्या घरी मी गेलो. पायाला तेल चोळून व त्यावर कढत पाणी घालून हळूहळू तो बरा करीत होतो. पाय जमिनीस टेकू लागला. मला आनंद झाला. तैमूरलंग होण्याची पाळी आली नाही. मी अद्याप अशक्त होतो. हळूहळू शक्ती येत होती. पुन्हा मुंबईस भावाकडे जावे असे मला वाटत होते. रामच्या आईकडे किती दिवस राहायचे? सध्या वार नव्हते. शाळा कॉलेज बंद होती.

मी पुन्हा मुंबईस आलो. मी मुंबईस आलो याचे रामला वाईट वाटले. श्याम पुण्यात का राहिला नाही, त्याला परकेपणा वाटला का, माझ्या घरी त्याची नीट काळजी घेतली गेली नाही वगैरे शंका त्याच्या मनात आल्या. त्याने त्या बोलून नाही दाखविल्या; परंतु एका वहीत त्याने लिहून ठेवले होते. एके दिवशी अकस्मात् ती वही मला मिळाली. मी पाहू लागलो. रामने तिच्यात काही काही लिहिले होते. मी ते सारे वाचले. रामचे ते लिहिणे वाचून मला वाईट वाटले. काही गोष्टींनी आनंदही झाला.

''श्यामचे माझ्यावर प्रेम आहे. आम्ही दोन मित्र आहोत. श्याम काही सर्वगुणसंपन्न नाही. त्याच्यात दोष आहेत. त्याचे दोष मला माहीत आहेत; परंतु किती झाले तरी श्यामही मनुष्यच ना. त्याच्या दोषांकडे मी कशाला पाहू? ते जातील हळूहळू, परंतु त्याचे गुण माझ्या डोळ्यांसमोर येतात.

श्याम हळवा आहे. तो मनातील कोणाला सांगत नाही. माझ्यापासूनही स्वत:चे दु:ख तो लपवून ठेवतो. जरा काही झाले की त्याचे मन दु:खी होते. जगात अशाने कसा निभाव लागणार ?

* * *

''श्याम पुण्याहून का आला ? माझ्या घरी का नाही राहिला ? माझे घर त्याला घरासारखे नाही का वाटले ? तेथे त्याला सहानुभूतीची का उणीव भासली ? राम तेथे नव्हता. परंतु रामची आई होती, रामचे भाऊ होते. त्यांनी श्यामची काळजी नसेल का वाहिली? तो आजारातून घरी आला होता. त्याला नसेल का खायला काही करून दिले? अरेरे, श्याम निघून आला आणि मी श्यामच्या भावाच्या घरी आनंदात आहे. माझ्या घरी श्यामला का आनंद मिळाला नाही.''

* * *

''परलोक आहे की नाही? श्यामचा व माझा काय संबंध? श्याम नेहमी म्हणतो की'' पूर्वजन्मीचे आपले ऋणानुबंध आहेत. खरे असेल का हे? मी श्यामला सांगेन, ''मी आधी मेलो तर परलोक आहे की नाही ते तुला येऊन सांगेन. तू आधी मेलास तर मला येऊन सांग.'' परंतु श्याम तयार नाही. तो म्हणेल, ''आपण एकदमच मरू. असे मागे पुढे नको.'' आपल्या हातात काय आहे?

* * *

असे विचार त्या वहीत होते.

एके दिवशी रात्री आम्ही दोघे मित्र फिरायला गेलो होतो. समुद्रावर गेलो होते. चंद्र होता आणि समुद्र नाचत होता. फेसाची फुले वर फेकीत होता.

''श्याम, खरे सांग. तू पुण्याहून इतक्या लवकर का आलास ? आमच्या घरी का राहिला नाहीस ?''

''येथे यावेसे वाटले.''

"का वाटले ?"

"का वाटले ?"

"ते कसे सांगू! एके दिवशी अकस्मात् येथे यावेसे वाटले. किती दिवस राहायचे? सध्या वार नाही, काही नाही म्हणून आलो."

"माझ्या घरी तुझी आबाळ झाली ना? तुला घरच्यासारखे तेथे का वाटले नाही? कोणी बोलले असेल. होय ना?"

"राम, असे काही नाही. माझी कितीतरी काळजी सारीजण घेत होती. दवाखान्यात असेपर्यंत रोज येत होती. येताना फळे आणीत असत. घरी गेल्यावरही माझ्यासाठी आई कितीतरी करी. मधल्या वेळेस मला शिरा करून देई. उजाडता काही खायला देई. घरीसुद्धा माझे असे कोणी करते ना? काहीतरी तू मनात आणतोस. मलाच वाटले की किती दिवस राहावयाचे? त्यांना नाही कंटाळा आला. मलाच कंटाळा आला. मी निघून आलो."

"श्याम, या वर्षापासून मी मुंबईला राहणार. मी मेडिकल कॉलेजमध्ये राहणार! मग तुझे कसे होईल? मी पुण्यास नसलो तर का कंटाळणार?"

"परंतु पुण्यास आता जायलाच नको."

"का?"

"काय जाऊन करायचे?"

"तू अर्ज केला आहेस ना?"

"केला आहे. परीक्षेच्या वेळेस मला ताप आला. मी तीन पेपर अर्धवट लिहिले आहेत. त्यात मी पास असेन. सहामाहीच्या निकालावरून पाहू नको. मी सहामाहीत नापास झालो होतो; परंतु त्या वेळेस मजजवळ पुस्तकेही नव्हती. या वेळेस मी अभ्यास केला होता. दिलेल्या अर्धवट पेपरवरूनही ही गोष्ट धानात येईल तरी माझ्या स्थितीचा विचार करावा, असे मी कॉलेजच्या प्रमुखास लिहिले आहे; परंतु अद्याप त्याचे उत्तर नाही. आता मुंबईतच पाहावी कोठे नोकरी. श्यामचे शिकणे संपले. शिकून तरी पुढे काय? परंतु शिकायची इच्छा होती. नाही नशिबी."

"पुन्हा जा पहिल्या वर्गात."

"नकोच ते आता."

“श्याम, माझ्यावर का रे प्रेम करतोस?”

“मला तरी काय माहीत? पूर्वजन्मीचे संबंध.”

“पूर्वजन्म आहे का पुनर्जन्म आहे?”

“यात काय संशय?”

“श्याम, तू आधी मेलास तर येऊन सांग. मी आधी मेलो तर तुला सांगेन. तुझ्या कानात सांगेन. तुझ्या लेखणीत संदेश देईन. विसरू नको हां. आपण ठरवून ठेवू.”

“राम, आपण एकदम मरू. तो बघ समुद्र बोलावतो आहे. चल, त्याच्यात शिरू. हातात हात घेऊन जाऊ. येतोस?”

“त्या बघ लाटा तुझ्या बोलण्याला हसत आहेत. मरणे सोपे नाही. श्याम, गुडघाभर पाण्यात आपण जाऊ व परत फिरू. जीवनाची आसक्ती लहानसहान नसते. चल, ऊठ, खूप शीक. तू प्रोफेसर हो. मी डॉक्टर होईन. तू तत्त्वज्ञान शीक. मनाचे रोग बरे करणारा हो. मी शरीराचे रोग बरे करण्याची विद्या शिकेन, चला घरी जाऊ. दादा म्हणत असतील कोठे गेले पारवे.”

आम्ही घरी गेलो. असे दिवस जात होते. एके दिवशी कॉलेजच्या चालकांकडून पत्र आले. मी ते फोडले.

“तुम्हाला पास झाल्याचे सर्टिफिकेट देण्यात येईल.” असे त्या पत्रात होते. किती आनंद झाला मला! एक वर्ष वाचले. आता मला पुढे भीती नव्हती. पुढे ऐच्छिक विषय होते. गणित व शास्त्र यापुढे आवश्यक नव्हते. मला जर तसे पास सर्टिफिकेट मिळाले नसते तर मी पुढे शिकलो नसतो. जरी पुन्हा शिकायला गेलो असतो तरी गणित व शास्त्र यात उत्तीर्ण झालोच असतो असे नाही; परंतु मी पुढे शिकावे अशी देवाची इच्छा होती. तुमच्या माझ्या गाठी पडायच्या होत्या. त्या वेळेसच नोकरी धरली असती; तर कोठल्या तरी खात्यात मी कारकून असतो. कशाला तुम्ही भेटला असता?

दादाला, रामला सर्वांनाच आनंद वाटला.

“श्याम, आता पूर्वीप्रमाणे जेवत जा.” दादा म्हणाला.

“आता जरा लठ्ठ हो.” राम म्हणाला.

“मठ्ठ माणसांनी लठ्ठ होण्यात काय अर्थ ?” मी म्हटले.

“आता पुण्यास जाशील ना ?”

“हो.”

“राम नसला तरी?”

“राम जवळच आहे.”

मी आता हसू खेळू लागलो. इतके दिवस छातीवर जणू धोंडा होता. तो निघाला. मी पाखरू बनलो. हवेत भुरभुर उडू लागलो.

असा आनंद चालला होता. इतक्यात आणखी एक पत्र आले. अक्षर चांगलेसे नव्हते. पाकीट होते. पाकिटावर पेन्सिलीने लिहिलेला पत्ता होता. कोणाचे ते पत्र? कोकणातून आले होते. आमच्या गावाहून आले होते. वडिलांचे तर खास नव्हे. ते मोडी लिहितात व शाईने लिहितात. त्यांचे अक्षरही सुंदर. मग कोणी लिहिले होते ते पत्र? लहान भावाने? पुरुषोत्तमाने? छे:! त्याला कोण देणार कार्ड? त्याला कोठे लिहायला येत असेल? त्याने आजपर्यंत कोठे लिहिले आहे पत्र?

शेवटी ते पत्र मी फोडले. धाकट्या भावाचेच ते पत्र होते. पुरुषोत्तमाने लिहिलेले पत्र. तो पाचवी इयत्ता पास झाला होता. काय लिहिले होते त्याने?

“तीर्थस्वरूप आण्णास शि. सा. नमस्कार.

तू मला तिकडे ने. मला तेथे राहवत नाही. तेथे सारी मला बोलतात. तू पुण्यास मला ने. मी तिकडे शिकेन. येथे कोणी नाही असे वाटते. तू नेशील तर बरे. तू नेले नाहीस तर मी जीव देईन. खरोखरच जीव देईन. आण्णा, तू ने, मला ने.

तुझा

पुरुषोत्तम

ते पत्र मी कितीदा तरी वाचले. काय करावे सुचेना. मी पुण्यास वार लावून शिकत होतो. येत्या वर्षी नादारी मिळण्याची शक्यता नव्हती. कारण मला नुसते पास सर्टिफिकेट मिळणार होते. माझ्याच फीची पंचाईत होती. शिकवणी केली असती परंतु कोण देणार, कोठे देणार, कोठे मिळणार? शिवाय मुलांना गणित विषयाची शिकवणी हवी असते. गणितात तर मी ढ. फीसाठी मलाच दादाजवळ, मावशीजवळ पैसे मागावे लागले असते. मग आता पुरुषोत्तमाला कसे आणायचे?

आईला जाऊन दीड वर्ष झाले होते. आई नसली म्हणजे सारी आबाळ. पुरुषोत्तम आजोळी होता. आजोबा, आजी होती; परंतु ती वृद्ध झालेली. त्यांचा

स्वभावही जरा रागीट. मनात प्रेम असे; परंतु बाहेरचा आविर्भाव रागाचा व्हावयाचा. पुरुषोत्तमाजवळ तेथे कोण? त्याला आईची आठवण येत असेल. आम्ही भाऊ इकडे. त्याला भावांजवळ राहायची साहजिकच इच्छा होणार; परंतु कसे आणायचे?

आणि न आणले तर जीव देईन म्हणतो! त्या शब्दांनी मी घाबरलो. खरेच का तो असे करील? आईवेगळा असल्यामुळे तो इतका का कंटाळला? आईचे पांघरूण गेले म्हणजे नाही का कोणाचे? असतील. इतरही पांघरुणे घालतील; परंतु ती अपुरी पडतात. आईचे पांघरूण पुरून उरते.

मी ते पत्र दादाला दाखविले. तो तरी काय म्हणणार? कुलाबा एका बाजूला. तेथे जवळ इंग्रजी शाळा नाही. स्टेशन जवळजवळ दोन मैल लांब. मग आगगाडीतून जावयाचे. पास हवा. पुन्हा भाऊ लहान. मुंबईस कधी न आलेला. मुंबईच्या गर्दीतून नीट शाळेत जाईल–येईल का? ऑफिसच्या वेळेला व सायंकाळी मोटारीची कोण गर्दी! रस्ता ओलांडणे मुश्कील होते. म्हणून मुंबईस भावाला ठेवणे कठीण होते. मग का पुण्यास न्यावयाचे? कोठेतरी नेणे प्राप्त होते. कारण त्याने भीती घातली होती.

"दादा, तू पाच रुपये दे व मावशी पाच रुपये देईल. दहा रुपये होतील. रामच्या घरी विचारतो. दहा रुपये देऊ. भावाला ठेवाल का? दुसरा काय उपाय?" मी म्हटले.

"विचारून बघ." दादा म्हणाला.

मी रामच्या घरी पत्र लिहिले. काही हरकत नाही असे उत्तर आले. मग कोकणात मी वडिलांस पत्र लिहिले. बोटी बंद होण्याची वेळ आली होती. ३१ मे ला शेवटची बोट निघायची. भावाला कोणाबरोबर तरी पाठवून द्या असे मी कळविले.

भाऊ आला. पुरुषोत्तम आला. दादाने त्याला नवीन कपडे केले. त्याला किती आनंद झाला! कोकणात दोन दोन वर्षांत नवीन कोट मिळायचा नाही; परंतु तेथे येताच नवीन कोट, नवीन तुमानी, नवीन सदरे. पुरुषोत्तम ऐटला. ते कपडे घालून तो हिंडे फिरे.

"अरे, पुण्यात गेलास म्हणजे घाल ते नवीन कपडे. येथे कशाला?" मी म्हटले.

"पुण्याहून तर मुंबई मोठी. पुण्यापेक्षाही मुंबईस चांगले हवेत कपडे. तू तर रोज साबण लावून तुझा शर्ट धुतोस. मला नको का सदरा? मी का तो कोकणातलाच घालू फाटका व तांबड्या मातीने लाल झालेला? मी तुमचा ना भाऊ? तुमच्यासारखा नको राहू?"

पुरुषोत्तम असे बोलायला शिकला असेल असे वाटले नव्हते. त्याचे बोलणे खरे होते. त्याने का फाटके घालावे? ती आम्हाला लाज होती, आम्हाला वाटली पाहिजे होती. आम्ही चांगले कपडे घालावे व त्याने का वाईट? उलट लहानांना आधी चांगले द्यावे मग आपण घ्यावे.

पुरुषोत्तमाचे शब्द मला शिकविते झाले. मला कितीतरी लहानपणाच्या आठवणी झाल्या. दादा आधीपासून दूर होता. परंतु मी बरीच वर्षे घराजवळ होतो. पुरुषोत्तमासाठी खाऊचे पैसे जमवून मी सदरा-कोट शिवून नेला होता. आईने माझ्या भातावर दही घातले तर ते मी त्याच्या भातावर घालीत असे. वडिलांनी एकदा रागावून शिक्षा म्हणून पुरुषोत्तमास अंगण बेणून टाकावयास सांगितले होते. त्याला मी मदत करू लागलो होतो. लहानगा भाऊ व ते म्हणाले होते, ''हेच प्रेम मोठेपणीही ठेवा. मोठेपणी एकमेकांस अंतर देऊ नका.'' त्या वेळेस आई होती. आज आई नाही. आज तर या धाकट्या भावावर अधिकच मायेची पाखर घातली पाहिजे होती. लहानपणी श्लोक, स्तोत्र मी लहान भावास शिकवीत असे. आता पुन्हा तो शिकायला आला होता. पुण्यास माझ्याजवळ राहणार होता. त्याला मी शिकवीन, प्रेम देईन, सारे देईन असे मी मनात म्हटले.

''पुरुषोत्तम, तू पालगडलाच सात इयत्ता का नाही केल्यास?''

''तुम्ही सारे इंग्रजी शिकलेत, मी नको वाटते शिकू?''

''तू का खरेच जीव दिला असतास?''

''आण्णा, मागच्या वर्षीच असे मनात येत होते. आई नाही. कोणी नाही. आपली गणपतीची विहीर आहे ना? ती पावसात तुडुंब भरलेली असायची. तिच्यावरूनच शाळेत जायचे. वाटे, टाकावी बुडी आत म्हणजे आई घेऊन जाईल. शेवटी यंदा तुला लिहिले. यंदा पुन्हा पावसाळा येईल. पुन्हा विहिरी भरतील. पुन्हा उडी टाकावी असे मनात येईल. मला तिकडे राहवत नाही. आई असती तर राहिलो असतो.''

भरलेल्या विहिरी पाहून स्वत:च्या रिकाम्या जीवनाची का त्या लहान भावास नकळत जाणीव होई? पाऊस पडून रित्या-कोरड्या झालेल्या विहिरी तुडुंब भरत परंतु आईरहित झालेल्या पुरुषोत्तमावर कोण पाऊस पाडणार! त्याचे जीवन कोण तुडुंब भरणार!

''आण्णा, मला खात्रीच होती की तुम्ही बोलवाल. दादा, तू, मावशी मला तिकडे ठेवणार नाही. मी माझ्या मित्रांना सांगून टाकले होते. वासू खरे वगैरेंना सांगितले होते. ते मला हसत. कोणी तुला नेणार नाही म्हणत. परंतु मला मात्र वाटे की आपण जाणार. रोज दुपारी मी पत्राची वाट बघत असे. ज्या दिवशी पत्र आले त्या दिवशी मी धावत जाऊन सर्वांना सांगितले. खरेच.'' पुरुषोत्तम सांगू लागला.

मी त्याला जवळ घेऊन त्याच्या पाठीवरून हात फिरवला. इतक्यात राम आला.'' काय रे, पी काय करतोय? पडत होतास की काय? कोकणात अजून आंबे असतील, अळू आता पिकतील, फणस पिकतील. इकडे कशाला आलास? कोकणातच राहायचे. पावसाळ्यात काकड्या कशा असतात, पाऊस कसा धोधो पडतो!''

''पण आण्णा कोठे आहे कोकणात? दादा कोठे आहे कोकणात? त्यांना इकडे आवडते. मग मलाही आवडेल.'' धाकटा भाऊ म्हणाला.

''त्यांनासुद्धा इकडे नाही आवडत, नाइलाजाने राहातात.'' राम म्हणाला.

''मीही नाइलाजाने आलो.''तो म्हणाला.

''वा रे पी!'' राम हसून म्हणाला.

''मला पी का म्हणता?'' भावाने विचारले.

''मग का टी म्हणू? टी पी असे म्हणू?'' रामाने हसून म्हटले.

''अरे, तुझे नाव पुरुषोत्तम ना! त्याचे इंग्रजीत थोडक्यात पी असे होईल.'' मी सांगितले.

''परंतु पी, तू काय पिणार? दुसऱ्याला काय देऊन 'पी' म्हणणार?'' रामने विचारले.

''राम, आम्ही परस्परांस प्रेम देऊ. दुसरे काय देणार? पी प्रेम पिईल. त्यासाठी तर तो आला आहे. ते पिण्याला भरपूर मिळेना म्हणून तो आला आहे. आम्ही एकमेकांस भरपूर प्रेम देऊ व म्हणू 'पी!' आम्ही सर्व जगाला प्रेम देऊ व म्हणू ''पी, तहानलेल्या जगा, पी!'' राम, खरे की नाही? जग दूर राहो. आपण तरी प्रेम लुटूया. त्यात तरी कधी तूट न येवो.'' मी म्हटले.

''कशात तूट नको?'' प्रेमळ दादा येऊन विचारता झाला.

''प्रेमात.'' मी म्हटले.

''प्रेमात तूट पडायला नको असेल तर ते देत जा. ते दिल्याने दुणावते. एकदा देण्याची सवय झाली म्हणजे द्यावेसेच वाटते. आपण परस्परांस देऊ, जगाला देऊ. आपल्या आसपासच्या जगाला. कारण सर्व जगाला आपले हात थोडेच पुरणार? जगातील झाडामाडास देवाचे मेघ पाणी घालतात. शेतीभाती जगाचे मळे ते पिकवतात परंतु माणूस एखाद्या झाडाला पाणी घालील, एखादे फुलझाड फुलवील. आपल्या आसपास जे आहेत, ज्यांच्याशी आपला संबंध येतो, त्यांना तरी आपण म्हणूया की घ्या प्रेम!श्याम, त्या दिवशी बाबू परीक्षेत पहिला आला, त्याने पेढा आणला; परंतु तुला आनंद झाला नाही. तू पेढा घेतला नाहीस. मला मेल्याप्रमाणे झाले तुझे वर्तन पाहून. आपल्या जवळच्या भावाच्या आनंदात तू वाटेकरी होऊ शकला नाहीस. मग जगाच्या सुखदु:खात सहभागी होणे तर दूर राहो. जवळच्यांच्या तरी जीवनाशी एकरूप होऊया. श्याम, वाईट नको वाटून घेऊ; परंतु सांगतो की, कृती कठीण आहे. प्रेम, प्रेम म्हणून आपण पुकारा करू; परंतु कोणी प्रेमाचा भुकेला आला तर त्याला आपण दूर घालवू. नि:स्वार्थ प्रेम कठीण आहे. कठीण आहे म्हणूनच मनुष्याने करायला शिकले पाहिजे.'' दादा म्हणाला.

''दादा, तुझा श्याम पुढे चांगला होईल. तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने चांगला होईल. मी प्रेमाची पाणपोई घालून बसेन. जगाने यावे, माझे प्रेम प्यावे, खुशाल निघून जावे. मी प्रतिप्रेमाची अपेक्षा करणार नाही. कोणी क्षणभर मजजवळ बसले, हसले तरी ठीक. लगेच गेले तरी ठीक. झऱ्याप्रमाणे मी माझे जीवन वाहते ठेवीन. होवो, माझी इच्छा सफल होवो.'' मी म्हटले.

''मन:पूर्वक प्रयत्न करशील तर होईल.'' दादा म्हणाला.

''मी प्रयत्न करीन. दुसरे काय माझ्या हाती?'' मी म्हटले.

''राम आहे ना तुझ्या हाती?'' माझ्या हातात हात घालून राम म्हणाला

''आण्णा, मला भूक लागली. वहिनीने केव्हाच पाने घेतली आहेत. चला ना सारे. पुरुषोत्तम येऊन म्हणाला.

आमची प्रेमचर्चा चालली असता तो केव्हाच उठून गेला होता. त्याला चर्चा नको होती. त्याला भूक लागली होती. चर्चेने का पोट भरते? घोटभर मिळेल तर पोट भरेल! शाब्दिक प्रेमाचा सुकाळ झाला आहे, परंतु जीवनदायी प्रेमाचा दशदिशांत दुष्काळ आहे!

+++

इंग्रजीचे वेड

मॅट्रिकच्या वर्गात असताना मला मराठी वाचनाचे वेड लागले होते. आता इंटरमिजिएटमध्ये असताना मला इंग्रजी वाचनाचे वेड लागले. पुण्यास भावासह मी आलो. त्याला इंग्रजी शाळेत. घातले मीही कॉलेजमध्ये दुसऱ्या वर्गात दाखल झालो. इंग्रजी, इतिहास, संस्कृत व तर्कशास्त्र चारच विषय होते.

संस्कृतसाठी आम्हाला दोन पुस्तके होती. एक मृच्छकटिक नाटक व दुसरे दशकुमारचरित्र. दशकुमारचरित्र मला मुळीच आवडत नसे. किती ती कृत्रिम भाषा! प्रास, अनुप्रास आणण्यासाठी अपरिचित असे शब्द घातलेले. हत्तीसाठी हस्ती हा शब्द चालणार नाही; गज चालणार नाही; वारण, मातंग चालणार नाहीत. मग हत्तीला कोणता शब्द वापरायचा? पाठीमागे 'अनेक' शब्द आहे. तेव्हा 'अनेकप' हा शब्द हत्तीला वापरला पाहिजे. द्विप हाही हत्तीला शब्द आहे; परंतु तो वापरूनही थोडा अर्थ लक्षात यावयाचा. म्हणून महाकवी दंडी अनेकप हा शब्द वापरतील. हत्ती पाणी सोंडेत घेतो व मग तोंडात ओततो. जणू दोनदा पितो. म्हणून त्याला 'द्वि-प' असा संस्कृत शब्द आहे. 'अनेकप' या शब्दात 'अनेक' शब्दाचा अर्थ 'द्वि' असा घ्यावयाचा.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

'अनेक' शब्दबरोबर प्रास, अनुप्रास साधण्यासाठी हत्तीला 'अनेकप' शब्द वापरणाऱ्या दंडीस धन्यवाद!

दशकुमारचरित्रात त्याच त्या प्रकरणाच्या कथा आहेत. तीच ती ठराविक ठशाची शृंगारिक वर्णने, अवयववर्णने. मला ते पुस्तक हातात धरू नये असे वाटे. त्या तासाला मी वाचनालयात जाऊन बसे. तेथे एखादे इंग्रजी पुस्तक बरोबरचे वाचीत बसे किंवा मासिके वाचीत बसे. त्या वेळेस श्री. अरविंद घोष 'आर्य' नावचे इंग्रजी मासिक काढीत असत. मला ते फार आवडे. त्यात गीतेवर निबंध येत असत. तसेच योग, भारतीय संस्कृती, पाश्चिमात्य तत्त्वज्ञान यावरही निबंध असत. मी ते मासिक वाचीत बसे. सारेच मला समजत असे अशातला भाग नाही; परंतु वाचीत असे. जेवढे समजले तेवढे घेत असे.

मृच्छकटिक नाटक मला आवडे. सर्व संस्कृत नाटकांत अप्रतिम नाटक. मृच्छकटिकात जशा अनेक छटा आहेत, जसे सर्वांगीण जीवन दाखविले आहे तसे इतर नाटकांत क्वचितच आढळेल. यातील विनोद व उपहास यांना तुलना नाही. शकार हे पात्र केवळ अद्वितीय आहे. कोणी म्हणतात की हे नाटक जर शोकांत झाले असते तर त्याचा अपार परिणाम झाला असता.

संस्कृतात शोकांत नाटक नाही. ज्या भरतमुनीने नाट्यशास्त्र लिहिले, त्याने असा दंडक घालून ठेवला की, नाटक हे सुखांतच असले पाहिजे. नाटकाचा शेवट गोडच झाला पाहिजे. असे का सांगितले? नाटक म्हणजे जीवनाचे प्रतिबिंब ना? जीवनात तर सुखदु:ख यांची खिचडी आहे. मग नाटकात शेवटी आनंदच का दाखवायचा?

जगात काही असो; परंतु नाट्यसृष्टीत तरी शेवटी सद्गुण विजयी होतात असे दाखवू. या नाट्यसृष्टीत तरी सत्यता शेवटी सिंहासनावर बसवूया! आपल्या सद्गुणाचे चीज शेवटी स्वर्गात कोठे व्हायचे नसून या पृथ्वीवरच ते होते असे नाटककाराने तरी का दाखवू नये? त्याच्या सृष्टीतही शेवटी सत्याचा वध का, सद्गुणांना सुळी का? प्रेक्षकांना येथील तेथे सद्गुणांचे बक्षीस बघू दे. तरच मनावर परिणाम होईल. शेवटी सारे चांगले होईल. आपण चांगल्या रीतीने वागूया हे तत्त्व बिंबेल.

प्राचीन ग्रीक नाट्यशास्त्र सांगे की, नाटक सुखांत तरी करा, नाहीतर दु:खांत तरी करा. त्याचा पुन्हा अर्थ असा की, सुखांत नाटकात अथपासून इतिपर्यंत हास्यरसच

असावयाचा. सारी गंमत व मौज. याच्या उलट दु:खांत नाटकात अथपासून इतिपर्यंत सारे गंभीर वातावरण. कोठेही हास्याची, विनोदाची छटा नाही.

महाकवी शेक्सपिअर याने प्रथम केवळ सुखांत अशी नाटके लिहिली. मग केवळ दुखांत अशी लिहिली; परंतु शेवटी सुखदु:खमिश्रित अशी लिहिली. त्या महाकवीला जीवनाच्या आरंभी जीवन म्हणजे गंमत आहे असे वाटले असेल; परंतु मग जीवन म्हणजे निराशा, केवळ दु:ख असा अनुभव आला असेल आणि शेवटी त्याच्या परिणतप्रज्ञेला, परिपक्व प्रतिभेला जीवन संमिश्र आहे असे आढळून आले असेल.

संस्कृत नाटके शेवटी जरी सुखांत होत असली तरी जीवनातील झगडे, आशानिराशा, नाना विपत्ती, संशय या सर्वांना त्यात स्थान आहे. सुखदु:खे दोघांना येथे स्थान आहे. फक्त शेवटी सुखाचा विजय असतो.

जीवनात सुख व दु:ख दोन्ही असल्यामुळे एक प्रकारची गोडीही आली आहे. दिवस व रात्र, प्रकाश आणि अंधार, पौर्णिमा नि अमावस्या असे हे जीवन आहे. जन्म व मरण या दोन्हींनी जीवन नटले आहे. चढ व उतार दोन्ही आहेत. दु:खामुळे सुखात किंमत आहे, चव आहे. मरणामुळे जीवन प्रेमळ व मधुर झाले आहे.

परंतु भारतीय संस्कृती जीवनाकडे सुख वा दु:ख या दृष्टीने पाहावयास शिकवीत नाही. सद्‌गुणांचे शेवटी बक्षीस मिळालेच पाहिजे असे गीता म्हणत नाही. जय वा पराजय, कर्तव्य करणे हेच खरे माणसाचे कर्तव्य. समुद्राच्या लाटा खाली-वर होत तीर गाठतात. कधी खाली, कधी वर त्याची फिकीर न करता मी कर्तव्य करीत आहे, या भावनेचा आनंद हाच खरा आनंद. आनंदफल-लाभात नसून कर्तव्य केले, करीत आहे, या वृत्तीत आहे.

ते काही असो. प्राचीन संस्कृत नाटकांत शेवटी आनंद आहे. शेवटी गोड आहे. जीवनाकडे आशामय दृष्टीने पाहावयास शिकविले आहे. मी ते आमचे मृच्छकटिक कितीदा वाचीत बसे. दशकुमारचरित्र हातात धरीत नसे तर हे नाटक हृदयाशी धरून बसत असे.

या वेळेस मला इंग्रजी खूप वाचावे असे वाटू लागले. इंग्रजी काव्य, निबंध, नाटक सारे प्रकार भरपूर वाचावे असे मनात आले. कार्लाइल हा माझा आवडता लेखक. त्याचे लिहिणे मला गुदगुल्या करी. त्याचे निबंध मी पाठ केले. एकोणिसाव्या

शतकात इंग्लंडमधील कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी कार्लाइल व रस्किम या दोन महान लेखकांचे लेख बऱ्याच अंशी कारणीभूत झाले. त्यांनी समाजातील झब्बूवर झोड उठविली. केवळ पैसे हे ज्याचे दैवत अशा भांडवलदार वर्गावर टीकेचे शस्त्र धरले.

मी जे जे वाची, त्यातून टिपून घेत असे. परंतु शेवटी काय टिपून घ्यावे, किती टिपून घ्यावे असे होई. त्या महान वागीश्वरांच्या लिहिण्यात जिकडेतिकडे माणिकमोतीच विखुरलेले आहेत असे वाटे. इंग्रजी वाङ्मय किती समृद्ध असे मनात येई. मराठी भाषा अशी कधी तरी होईल का? इंग्रजीचा जगभर व्याप. त्यांचे जगावर साम्राज्य. इंग्रजी ही जगाची व्यापारी व राजकीय भाषा व्यापाप्रमाणे वैभव. इंग्रजी भाषेच्या व्यापामुळे तिचे वैभवही वाढले.

इंग्रजीतील सारे उत्तमोत्तम मराठीत आणावे असे माझ्या मनात येई. इंग्रजी कवींची काव्ये पद्यात नाहीत तर निदान मराठी गद्यात उतरावी असे वाटे. रवींद्रनाथांनी गीतांजली इंग्रजी गद्यात लिहिली तरी किती गोड वाटते! त्या गद्याला जणू पंख आहेत असे वाटे. मीही असे सुंदर मराठी गद्य लिहीन, गद्यच पद्याहून गोड करीन असे मनात म्हणत असे.

मराठी वाङ्मय जर समृद्ध व्हावयास पाहिजे असेल तर ते खपले पाहिजे असे केले पाहिजे. ते खपण्यासाठी स्वस्त केले पाहिजे. पुष्कळ खपले तर स्वस्त करता येईल. स्वस्त केले तर खपेल. खपण्याची आशा असती तर स्वस्त करता येईल. यासाठी वाचनाची अभिरुची जनतेत वाढली पाहिजे. जनता साक्षर झाली पाहिजे. साक्षर जनतेला मग वाचावेसे वाटते. आपल्याकडे अद्याप शेकडा ९० लोक म्हणे निरक्षर आहेत. श्रवणभक्ती हेच अद्याप ज्ञानाचे साधन आहे.

आणि मराठी भाषेची निर्हेतुक सेवा करणारे निघतील तेव्हाच ती समृद्ध होईल. मी एका तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकास एकदा म्हटले, ''तुम्ही मराठीत पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास का लिहीत नाही?'' ते म्हणाले. ''मोफत का लिहायचे? लिहिण्याचा मोबदला कोण देतो?'' मी त्यांना म्हटले, ''तुमचा सद्ग्रंथ प्रसिद्ध करायला कोणी मदत करील. छापणे तुमच्या अंगावर पडणार नाही.'' ते म्हणाले, ''परंतु माझ्या श्रमाचा काही मोबदला नको का? मी फुकट एक ओळही लिहिणार नाही.''

त्यांचे ते शब्द ऐकून मला वाईट वाटले. जे आपण वाचलो, जे आपण शिकलो, ते आपल्या सर्व बंधुभगिनींना केव्हा देऊ असे झाले पाहिजे; परंतु कोणाला आहे ही उत्कटता? श्री ज्ञानेश्वरांनी संस्कृतातील ब्रह्मज्ञानाचा पसारा पाहिला. ते ज्ञान मराठी भाषेत केव्हा आणीन असे त्यांना झाले. माझ्या मराठीत ब्रह्मविद्येचा सुकाळ कधी होईल असे त्यांना झाले. त्यांच्या त्या तळमळीतूनच अमृताप्रमाणे असणाऱ्या त्या ओव्या भराभरा बाहेर पडल्या. आपल्या या ज्ञानेश्वरीचे पैसे किती मिळतील ही त्यांना चिंता नव्हती. जवळ कागद ना शाई. कोळशाने त्यांनी त्या माणिकमोत्याहून अधिक मोलाच्या अशा ओव्या लिहिल्या. खांबावर लिहिल्या. जसे ज्ञानदेव, तसेच ते दासोपंत. दासोपंतांनी लक्षावधी ओव्या लिहिल्या. मराठीचा त्यांना किती अभिमान! संस्कृत श्रेष्ठ भाषा आहे असे म्हणणाऱ्यास ते विचारतात, ''मराठीचे वैभव संस्कृतात आहे का? संस्कृतात ''घट'' हा शब्द आहे; परंतु मराठीत मडके, गाडगे, परळ, खापर, ठिला, डेरा किती शब्द! भिन्न भिन्न छटा दाखविणारे शब्द! संस्कृतात 'प्रवाह' म्हणाल. परंतु मराठीत ''ओहोळ, ओढा, नाला, वहाण, पऱ्ह्या'' किती शब्द! असे हे दासोपंत! निंबाचा पाला खाऊन ते राहात.

मोरोपंतांनी लक्षावर काव्यरचना केली. कशासाठी?

''आपण काही तरावया गावे''

हाच एक हेतू. धनार्जनाचा हेतू नाही. मराठीच्या प्राचीन वागीश्वरांनी मराठीची सेवा करावी, मराठी भाषा बोलणाऱ्या स्त्रीपुरुषांसमोर आपल्याजवळचे विचार न्यावे, या एकाच भावनेने लिहिले. आणि आजही मराठी संपन्न व्हावी असे वाटणाऱ्यांनी तेच केले पाहिजे.

निरनिराळी कॉलेजे आहेत. कितीतरी त्यातून प्राध्यापक आहेत; परंतु त्यांनी त्या त्या विषयात मराठी समृद्ध केली फारसे दिसत नाही. मराठी हे शिक्षणाचे वाहन (माध्यम) झाल्याशिवाय मराठीत नाना विषयांवर रचना होणार नाही हेही खरे. शिक्षण मातृभाषेतूनच हवे. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी मराठीतूनच सर्व शिक्षण देण्याचा प्रारंभ झाला. १८३० च्या सुमारासच मराठीत मोठमोठे ग्रंथ झाले. वैद्यकशास्त्र वगैरेंवर अनुवादरूप प्रचंड ग्रंथ झाले. तसेच पुढे पुन्हा सर्व विषय इंग्रजीतून शिकविण्याची पद्धत पडली. संस्कृत सुद्धा इंग्रजीतून शिकवायचे! असला चावटपणा दुनियेत कोठेही कधी झाला नसेल.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)

परंतु विद्यापीठ ज्ञानदानार्थ मातृभाषेचे वाहन करो वा न करो. माझी मराठी समृद्ध झाली पाहिजे, तिच्यात अमुक एका विषयावर पुस्तक नाही असे नाही होता कामा अशी तळमळ प्रत्येक साहित्यिकास, प्राध्यापकास व शिक्षकास वाटली पाहिजे. कविश्रेष्ठ रवींद्रनाथ म्हातारपणीही विद्यार्थ्यांसाठी विश्वरचनेवर पुस्तक लिहितात. कवी आपली वीणा बाजूला ठेवून ज्या सृष्टीने तो वेडा होतो, त्या सृष्टीचे शास्त्रीय ज्ञान मुलांना देण्यासाठी वृद्धपणी उभा राहतो; परंतु शास्त्र विषयाचे प्राध्यापक काय करीत आहेत? त्यांना सोप्या सोप्या भाषेत जनतेसाठी नाही का काही लिहिता येणार?

पंडित जवाहरलाल एकदा म्हणाले, ''मी राजकारणात पडलो नसतो तर हिंदी भाषेत जगातील उत्तमोत्तम ग्रंथ आणून टाकले असते. त्यासाठी आमरण धडपडलो असतो.'' आपल्याकडे असे कोण म्हटले? प्रतिवर्षी मराठी साहित्य संमेलने भरतात; परंतु मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी एखादी प्रत्यक्ष योजना कोणी मांडीत नाही. जगातील ही इतकी उत्कृष्ट पुस्तके आहेत. यांची भाषांतरे मराठीत करवूया. निरनिराळ्या लोकांकडे हे काम देऊया. असे का नाही कोणी करीत? मी एकदा मराठी साहित्य संमेलनाच्या थोर अध्यक्षास लिहिले, ''रवींद्रनाथांच्या सर्व ग्रंथांची मराठीत एकटाकी भाषांतरे करावी असे मला वाटले. एकाच लेखकाने सर्व ग्रंथांचे भाषांतर करणे बरे. मी सामान्य माणूस आहे. भाषांतराची परवानगी मला मिळणार नाही. तुम्ही संस्थेच्या वतीने विश्वभारतीजवळ ती परवानगी मागा. मला या भाषांतरापासून पैची अपेक्षा नाही. भाषांतरे करून साहित्य संमेलनाच्या स्वाधीन करीन. इच्छा इतकीच की, मराठी रवींद्रनाथ यावेत.'' अध्यक्षांचे पत्र आले ''प्रयत्न करीन.'' परंतु पुढे ते बहुधा विसरले. इंग्रजी किंवा पाश्चिमात्य वाङ्मय मराठीत आणण्याचे दूर राहो;परंतु भारतातीलच भिन्न भिन्न प्रांतांतील वाङ्मय मराठीत आपण का आणू नये? ज्यांना स्वतंत्र प्रतिभा आहे; त्यांनी भाषांतरे करण्याच्या भानगडीत नये पडू. त्यांनी स्वतंत्र नद्या निर्माण करून मराठी भाषेचा प्रदेश सुपीक करावा; परंतु स्वतंत्र नद्या निर्माण करण्याची ज्यांना शक्ती नाही. त्यांनी परप्रांतीय भाषातून मराठीत पाट आणावे. मातृभाषेचे ऋण फेडावे.

प्रेमचंद आणू सारा मराठीत, शरच्चंद्र आणू मराठीत, द्विजेन्द्र रॉय आणू मराठीत, इक्बाल आणू मराठीत, न्हानालाल, गिजुभाई वगैरेंची पुस्तके आणू मराठीत, काकासाहेब कालेलकर आणू मराठीत, भारती या तामिळ कवीची काव्ये आणू

मराठीत. मराठीच्या बाजारपेठेत साऱ्या भरतखंडातील भावना, कल्पना, विचार मांडून ठेवू असे कैवाऱ्यांना वाटले पाहिजे.

धुळ्याच्या तुरुंगात मी होतो. रवींद्रनाथांच्या साधनेचे इंग्रजी पुस्तक मी काही विद्यार्थ्यांबरोबर वाचीत होतो. इतरही मंडळी मी मराठी सांगे ते ऐकत. एके दिवशी पूज्य विनोबाजी आमच्या खोलीत आले. खानदेशातील एक शेतकरी सत्याग्रही विनोबाजीस म्हणाला, ''हे सारे इंग्रजीत आहे; परंतु आम्हाला कसे कळणार?'' पूज्य विनोबाजी म्हणाले, गुरुजींसारख्यांचे हे काम आहे. त्यांनी मराठीत आणले पाहिजे.

मराठीत सारे आणावे असे कॉलेजमध्ये मी शिकत होतो तेव्हापासून वाटे; परंतु लेखक व प्रकाशक यांचे हक्क असतात. ज्ञानावरही आज हक्क आहे. ज्ञान ही सुद्धा एक बाजारातील वस्तू झाली आहे. ते ऋषितुल्य इतिहाससंशोधक राजवाडे ''हक्क स्वाधीन ठेवले नाहीत.'' असे आपल्या ग्रंथावर लिहीत. अर्वाचीन जगात आपल्या ज्ञानावर हक्क न ठेवणारा हा एकच महापुरुष झाला असेल.

एकदा मी एका सुंदर इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद केला. त्या इंग्रजी कंपनीला लिहिले, ''मराठीत प्रसिद्ध करायला कृपेने परवानगी द्या.'' त्यांचे पत्र आले ''१५०० रुपये द्या.'' कोठून आणू दीड हजार रुपये? मला वाटले की, आपण भाषांतर प्रसिद्ध करावे. पुढे काय व्हायचे असेल ते होईल. ज्ञानासाठी कायदेभंग. ज्ञानप्रसारासाठी कायदेभंग. माझ्या लोकांना पोटभर भाकर मिळावी म्हणून जसा सत्याग्रह करावयाचा, त्याप्रमाणे माझ्या गरीब लोकांस पोटभर विचार मिळावेत म्हणूनही सत्याग्रह का करू नये? परंतु मी केला नाही. मनात तडफडत बसलो.

वास्तविक त्या त्या लेखकाला आपल्या लिहिण्याचा प्रसार होत आहे. हे पाहून आनंद वाटला पाहिजे. लेखकास होत असेलही; परंतु पुष्कळ वेळा लेखक व प्रकाशक निराळे असतात. लेखकाची कितीही इच्छा असली की, दुसऱ्या भाषेत अनुवाद करण्यास परवानगी द्यावी तरी प्रकाशक तयार होतीलच असे नाही. कारण प्रकाशकांचा तो धंदा असतो.

कितीही अडचणी असल्या तरी तळमळ, उत्कटता व खरी मातृभाषेची भक्ती असेल तर आपणास कितीतरी करता येईल. धनाची स्पृहा न ठेवता जे जे आपण इतर भाषेतील चांगले वाचू ते ते मातृभाषेत केव्हा आणू असे आपणास झाले पाहिजे. मग साहित्य समृद्ध होते की नाही पाहा.

कॉलेजमध्ये असताना मी इंग्रजी वाचीत असे. त्याचा अनुवाद करण्याची सवय करीत असे. मराठीत लिहून बघत असे. पुढेमागे मी सारे मराठीत आणीन असे मनात म्हणत असे. आणि इतर व्याप सांभाळून मी कितीतरी आता लिहून ठेवले आहे. सुंदर ग्रंथांची भाषांतरे करून ठेवली आहेत. त्या माझ्या पेट्या भरलेल्या आहेत. ती भाषांतरे करताना सद्‌विचारांची संगती मिळाल्यामुळे मला आनंद होतच होता. मराठीत मी आणीत आहे, सुंदर भाषेत मांडित आहे, याचीही जाणीव मला कृतार्थ वाटे. आता ते प्रसिद्ध होईल तेव्हा होईल. कोणी मिळेल प्रकाशक तर होईल प्रसिद्ध. नाहीतर श्याम मेला म्हणजे त्या वह्या द्या इतिहाससंशोधक मंडळाला.

तुरुंगात चांगले पुस्तक मिळाले म्हणजे मला वाटे याचे भाषांतर मराठीत आधी करू दे. मी क्षणाची विश्रांती न घेता ते करून ठेवीत असे. रात्र झालेली असावी, आसपास सारे राजकीय कैदी झोपलेले असावेत; परंतु श्याम लिहिण्यात तन्मय असे. मराठी भाषेत सुंदर पुस्तक आणण्यात तल्लीन झालेला असे. माझा तो अपार आनंद होता.

विनायक कोंडदेव ओक यांनी 'बालबोध' म्हणून मुलांसाठी सुंदर मासिक चालविले होते. त्यांचा एक नियम असे, "रोज दहा तरी ओळी मराठीत लिहून ठेवीन." त्यांनी कितीतरी लिहिले, ते सारे राहिले असे नाही; परंतु त्याचा उपयोग व्हायचा तेवढा होईल. आपल्या शक्तीप्रमाणे कार्य करणे एवढे आपल्या हाती. मातृभाषेची सेवा हेही एक पवित्र कर्तव्य आहे. स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांची सेवा प्रत्येकाला आहे. स्वदेशाची सेवा म्हणजे दुसऱ्या देशांवर आक्रमण नव्हे. स्वधर्म-सेवा म्हणजे माझाच धर्म चांगला, बाकीचे वाईट असे म्हणणे नव्हे. एकमेकांस चांगले म्हणूया, एकमेकांपासून चांगले घेऊया, आणि अवघाचि संसार सुखाचा करूया.

कॉलेजमध्ये असताना इंग्रजीचे वेड लागले; परंतु माझ्या मराठीत हे सारे केव्हा येईल, मराठी समृद्ध व सुंदर कधी होईल ही तळमळ तेव्हापासून मला लागली. ती तळमळ आजही आहे. त्या तळमळीप्रमाणे हातून फारसे झाले नाही; परंतु ती तळमळ तरी माझ्या हृदयात आहे, याचेच मला समाधान आहे.

+++

यमुताई

मागे मी एकदा तुम्हाला यमुताईविषयी थोडेसे सांगितले होते. त्यांच्याकडे माझा एक वार होता. यमुताई एकट्याच होत्या. त्या वृद्ध झाल्या होत्या. त्यांचे नेमनियम फार. व्रतेवैकल्ये फार. पहाटे उठून त्या ओंकारेश्वरावर जाऊन नदीच्या पाण्याने रोज स्नान करून यावयाच्या. जोपर्यंत त्यांना जाववत होते, तोपर्यंत हे व्रत टळले नाही. नंतर घरी पूजा, जप वगैरे व्हावयाचे. त्यांचे एक दर्भासन होते. त्यावर बसून त्या जप करीत.

यमुताईंचे सोवळेओवळे फार. हाती धरायला त्या कागदसुद्धा घेत नसत. शहरात हाती धरायला पाने कोठून मिळणार? त्यांच्याजवळ एक फडके असे; परंतु तेसुद्धा त्या फार वापरायच्या नाहीत. हातांनीच चुलीवरचे कढत भांडे पटकन उतरीत. जणू त्यांचे हात भाजतच नसत. अगदी नाइलाज झाला तरच त्या फडके उपयोगात आणायच्या.

''यमुताई, कागद हाती धरायला घेतला म्हणून काय झाले? कागदही का सोवळाओवळा असतो?'' मी विचारले.

‘‘ते कागद जवदेमसणे असतात. कोठून आले असतील देव जाणे. म्युनिसिपालिटीच्या पेटीतील कागद गरीब लोक गोळा करतात व ती रद्दी व्यापारी विकत घेतात. त्या कागदातून आपण माल आणतो. तेच कागद आणखी चुलीजवळ कशाला आणू? शुद्ध निर्मळ अन्न, त्याच्याजवळ नकोत ते कागद. कोणाची थुंकी त्या कागदांना लागली असेल, धूळ बसलेली असेल, सारे ब्रह्मांड असेल त्या कागदावर. नको ती घाण.’’ असे त्या म्हणाल्या.

यमुताई एकदाच जेवत. कांदा, लसूण वगैरेस त्या स्पर्शही करीत नसत. त्यांचा वासही त्यांना सहन होत नसे. एके दिवशी मी त्यांच्याकडे काही कामासाठी गेलो होतो. कांदा खाऊन गेलो होतो. मी त्यांच्याजवळ बोलत होतो.

‘‘श्याम, कांदा खाऊन आला आहेस?’’ त्या एकदम म्हणाल्या.

‘‘होय.’’ मी म्हटले.

‘‘जरा दूर बस. भपकारा येतो तुझ्या बोलण्याबरोबर. मला मुळीच नाही सहन होत हा वास.’’ त्या म्हणाल्या.

मला लाज वाटली. वाईट वाटले. मी खाली मान घालून दूर बसलो.

‘‘श्याम, वाईट नको वाटून घेऊ दूर बस सांगितले म्हणून. मला नाही ही सवय आणि निषिद्ध आहे ना. तुम्हीसुद्धा म्हातारपणी सोडाल. आज तरुण आहात तो सारे चालते, सारे पचते. तुम्ही खा. परंतु मला नाही हो वास आवडत, मळमळते. शेजारी कांद्याची भजी असली म्हणजे मला वाटते की कोठेतरी पळून जावे. दार घेते लावून. परंतु वास का यायचा थांबतो? तो येतोच.’’ त्या म्हणाल्या.

मित्रांनो, भारतवर्षात खाण्यापिण्याचे खूप प्रयोग झाले. आपल्यातील पुष्कळसे भेद खाण्यापिण्यामुळेच निर्माण झाले असावेत. आहारशुद्धीचा महान प्रयोग भारतखंडात झाला. मांसाशनत्यागाचा थोर प्रयोग झाला. हळूहळू अजिबात मांसाशन काहींनी सोडले. एके काळी आपण सारेच मांसाशन करणारे होतो; परंतु पुढे मनुष्याची बुद्धी जागी झाली. माणसाने मांस खाणे म्हणजे रानटी पशू होणे असे त्याला वाटू लागले.

परंतु सारे थोडेच सोडणारे होते. चटक लागलेली सुटत नाही. चहाची सवय सोडवत नाही, विडी सोडवत नाही, सुपारीसाठी आपण वेडे होतो. एकदा चटक लागली म्हणजे सोडणे कठीण; परंतु हळूहळू हिंदुस्थानात अनेक जातींनी मांसाशन

वर्ज्य केले. मांसाशन वर्ज्य केले, त्या जाती आपणास इतरांपेक्षा श्रेष्ठ समजू लागल्या. त्या दूर-अलग राहू लागल्या. रोटीबेटी व्यवहाराचे निर्बंध वाढले.

सामान्यत: समान आचारविचारांची, समान आहाराची मंडळी एकत्र राहतात. ते लोक एकेका आळीत राहू लागतात. ही ब्राह्मण आळी, ही सोनार आळी असे गावाचे भाग पाडतात. आपण निरनिराळे किंवा दूर राहतो एवढ्यावरून कोणाला श्रेष्ठ किंवा कनिष्ठ समजण्याची जरूरी नाही. मांसाशन न करणे बरे; परंतु मांसाशन न करणारा संतच होतो व मांसाशन करणारा राक्षसच होतो अशांतील भाग नाही. मांसाशन करणारे वसिष्ठ ऋषी स्वत:ची शंभर मुले विश्वामित्राकडून मारली जात असताही शांत राहिले. न्यूटन् कदाचित मांसाशन करीत असेल; परंतु त्याचा न छापलेला महत्त्वाचा हस्तलिखित शास्त्रीय ग्रंथ त्याच्या कुत्र्याने मेणबत्ती पाडून जाळला तरी तो त्या कुत्र्यावर रागावला नाही. फक्त एवढेच म्हणाला, ''डायमंड, तू किती नुकसान केलेस तुला माहीत आहे का?''

मांसाशन करणारा शांतिसागर असू शकतो तर मांसाशन न करणारा जगदग्नी असू शकतो. खाण्याने काही थोडेफार संस्कार होतात; परंतु पुष्कळसे विवेकाचे काम असते. जीवन विवेकाने अधिक सुधारते. खाण्यापिण्याची त्याला थोडी मदत होते इतकेच.

एकदा एक माझा मांसाशन करणारा मित्र मला स्वत:ला, ''तुमच्या वस्तीत आम्हाला का नाही भाड्याने जागा मिळत? तुम्ही का स्वत:ला श्रेष्ठ मानता? आम्ही का माणसे नाही?'' मी त्याला म्हटले, ''श्रेष्ठ मानीत असतील तर ती चूक आहे; परंतु मी मांसाशन न करणारा, माझ्या शेजारच्या खोलीत कोंबडी कापणारा तू राहिलास, तर मला खंत नाही का वाटणार? तिकडे मासे तळलेस तर तो वास मला सहन होईल का? यासाठी आपण निरनिराळ्या वस्तीत राहतो; परंतु त्यामुळे कोणी कोणास तुच्छ मानावे असे नाही. ही एकमेकांची सोय आहे.''

माझे एक बंगाली मित्र चंद्रोदय भट्टाचार्य सांगत असत, ''आम्ही बंगालमध्ये शाळेत असताना मुसलमान विद्यार्थ्यांपासून दूर बसत असू. त्यांना राग येई. हिंदू मुले आमचा द्वेष करतात असे त्यांना वाटे; परंतु आम्ही द्वेष नसे करीत. पण मुसलमान मुलांच्या अंगाला कांद्यालसणीची घाण यायची. त्यांच्या अंगाच्या घामालाही तो वास यायचा. तो आम्हाला सहन होत नसे.''

कॉडलिव्हर घेणाऱ्या माणसाच्या अंगाला घाण येते. त्याच्या घामाला घाण येते. हा अनेकांचा अनुभव आहे. आपण एकमेकांपासून यासाठी अलग राहू लागलो; परंतु त्यात श्रेष्ठकनिष्ठपणाचा भाव नको होता आणायला. आहार शुद्ध झाल्यामुळे सारे जीवनच शुद्ध झाले असे नाही. शिवाय कांदेलसूण स्वस्त असतात. गरीब लोक स्वस्त खातात. त्यांनी कोठून आणावे ''रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्याः'' असे पदार्थ? श्रमाने त्यांच्या घामाला घाण न येता उलट अत्तराचा वास येतो. श्रमाचा घाम सर्वांत पवित्र. तीच शंकराच्या डोक्यावरील गंगा.

दुसरा कसाही असो, त्याची घृणा न बाळगता त्याच्याजवळ राहणे ही फार दूरची गोष्ट आहे. महात्माजी मांसाशन नाही करीत हे सांगायला नको; परंतु साबरमतीच्या आश्रमात एखादा मांसाहारी पाहुणा आला तर महात्माजी स्वतःच्या हाताने त्याला मांस शिजवून नेऊन देत; परंतु इतकी उदात्त माणुसकी महात्माजीच जीवनात दाखवू शकतील. इतरांनी काय करायचे? इतरांनी इतके तरी करावे की केवळ खाण्यापिण्यावरून श्रेष्ठता-कनिष्ठता अजमावू नये. जीवनातील इतर हजारो क्रियांचे मूल्यमापन करूनच जीवनाची किंमत ठरवावी.

माणसाने मांस सोडलेच पाहिजे. मांस खाण्याने शक्ती येते; परंतु येत असलीच तर ती वृकव्याघ्राची शक्ती. मांस खाऊ लागलो तर कदाचित् दुसऱ्यावर घाव घालताना हात कापणार नाही, सुरा पटकन् भोसकता येईल. भात खाणारे बाजीराव, विश्वासराव, चिमाजी अप्पा, विश्वासराव, पहिले माधवराव बापू गोखले, पटवर्धन सरदार यांनी का घाव घातले नाहीत? आणि घाव घालणे यातच सर्वस्व आहे असे नाही. घाव न घालताही निर्भयपणे उभे राहणे यात का पुरुषार्थ नाही?

डॉक्टर सांगतात की, माणसाच्या पोटाची अंतर्रचना मांसाशनास योग्य अशी नाही; परंतु माणसाने आपले पोट सवयीने वृकव्याघ्रांच्या पोटाप्रमाणे पुन्हा करायचे असे ठरवलेले दिसते. हा विकास नसून विनाश आहे. प्रगती नसून अधःपात आहे.

परंतु आहारमीमांसा सांगणे माझे काम नाही. मी यमुताईविषयी सांगत होतो. त्या मला दूर बस म्हणाल्या, परंतु वाईट नको वाटून घेऊ म्हणाल्या. किती नम्रता व हळुवारपणा त्यांच्याजवळ होता. त्यांच्याजवळ माणुसकी होती. त्यांच्या सोवळेओवळेपणाने माणुसकी मारली नव्हती.

''यमुताई, सर्वांना समानतेने नको का वागवायला?'' मी एके दिवशी म्हटले.

''तुम्ही आम्ही समानतेच्या गप्पा मारू नये. संतांनी त्याचा उपदेश करावा. खरोखरच त्यांना सर्वत्र परब्रह्म दिसते. एखादा विरक्त कामनाहीन संत रस्त्यातून दिगंबर जाऊ लागला म्हणून आपणही जावे का? त्याचा रोमही वाकडा होत नाही. पवित्र भावनेने तो सर्वत्र पाहतो. श्याम, तुला एक गोष्ट सांगू. एकदा एक साधू रस्त्यातून नग्न जात असे. त्याला काही वाटत नसे. परंतु हा असभ्य वर्तन करतो अशी लोकांनी तक्रार केली. रस्त्यातून नग्न जाणे शिष्टाचारास सोडून आहे असे लोकांचे म्हणणे. शिपायांनी त्या साधूला पकडले. त्या साधूवर खटला भरण्यात आला. न्यायाधीशासमोर त्याला उभे करण्यात आले. न्यायाधीशाने विचारले, ''असे दिगंबर का हिंडता?'' साधू म्हणाला, ''ज्यांना वासनाविकारांची भीती असेल त्यांनी वापरावी वस्त्रे. मला कशाला वस्त्रांचे ओझे? कामक्रोधांचे गाठोडे ज्याने फेकले, ज्याने या गाठी सोडल्या, जो निर्ग्रंथ झाला, त्याला इतर धोतरांच्या गाठी कशाला?'' न्यायाधीश पुन्हा म्हणाला, ''खरोखरच का तुम्हाला सारे समान दिसते? स्त्रीपुरुष हा भेद का सारा मावळला? साधू म्हणाला, ''हो.'' न्यायाधीश थट्टेने म्हणाला, ''विष्ठा व अन्न यात फरक आहे की नाही? त्यांनाही समान मानाल का? विष्ठा अन्न समजून खाल का?'' साधू म्हणाला, ''हो.'' आणि त्याने एक हात पाठीमागे नेला. त्या हातावर त्याने शौच केले व दुसऱ्या हाताने खाऊ लागला. न्यायाधीशाने त्याला सोडून दिले. श्याम, हसतोस काय? गोष्टीत अतिशयोक्ती असेल; परंतु त्यातील तात्पर्य आपण घेऊया. सारे सगळ्यांनाच साधत नाही. मोर नाचतो म्हणून लांडोरीने नाचू नये. विवेकाने आपली क्रिया आपोआप पालटत जाईल.'' त्या म्हणाल्या.

यमुताई अशा गोष्टी सांगायच्या, मार्मिक विनोद करायच्या. एखादे दिवशी मी जेवायला जावे. त्यांचा जप चाललेला असे.

''यमुताई, मला उशीर होईल.'' मी हळूच म्हणावे. त्या लगेच उठत. ''माझा जप मागून होईल. श्यामला शिकायचे आहे. वाढते हो तुझे पान.'' असे त्या म्हणत. दुसऱ्याच्या आड त्यांचा जप येत नसे.

यमुताईचा माझ्यावर फार लोभ होता. कोठे वडी मिळाली, त्यांना काही कोण दिले तर श्यामसाठी त्या राखून ठेवीत. एकदा त्यांच्या एका नातलगाच्या घरी एका खेड्यात मला जावे लागले.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

''श्याम, तू आठ दिवस जाशील का गावाला?'' त्यांनी विचारले.

''आहे तयार. परंतु कोठे आहे गाव?''

''आहे भीमेच्या तीरावर. भीमेचे तुला दर्शन होईल.''

''तेथे जाऊन काय करायचे?''

''गुरचरित्राचा सप्ताह. तेथे एक मुलगी आज कित्येक दिवस आजारी आहे. त्यांच्या मनात गुरुचरित्राचा सप्ताह करायचा आहे. तू जा. तुझी देवावर भक्ती आहे, म्हणून तुला आधी विचारले. तुझा अभ्यास बुडेल. परंतु ये जाऊन.''

''एका आजारी माणसासाठी अभ्यास बुडाला तरी चालेल. मी जाऊन येईन.''

मी त्या खेडेगावी गेलो. भीमा नदी वाटेत लागली. पंढरपूरला जी पुढे चंद्रभागा झाली तीच ती भीमा. मी तिचे पात्र पाहून प्रणाम केला. त्या गावी मी सात दिवस राहिलो. सात दिवस गुरुचरित्र वाचले. दक्षिणाही मिळाली. मी परत आलो.

कॉलेजमध्ये मला पहिल्या सहामाहीला नादारी नव्हती. मी शिकवणी करीत असे. इंग्रजी शाळेतील एका मुलास इंग्रजी, गणित वगैरे सारेच विषय शिकवावे लागत. चौथीतील तो विद्यार्थी होता. पहिली सहामाही गेली. दुसऱ्या सहामाहीत मला अर्धनादारी मिळाली. अर्ध्या फीचा हप्ता भरावयाचा होता. शिकवणी सुटली होती. जवळ पैसे नव्हते. मी मोठ्या विवंचनेत होतो.

संक्रांतीचा दिवस होता. मी यमुताईंना तिळगूळ द्यायला गेलो. वास्तविक त्यांच्यापासून घ्यायला. दसऱ्याच्या दिवशी आपण वडील मंडळांस सोने देतो. संक्रांतीस वडील मंडळींनी आपणास तिळगूळ द्यावयाचा. यमुताई घरीच होत्या.

''यमुताई, तिळगूळ द्यायला मी आलो आहे.''

''श्याम, थांब हो. अरे, मीच तुला द्यायची.''

यमुताईंनी मला तिळगुळाच्या वड्या दिल्या. त्यांना प्रणाम करून मी जायला निघालो. इतक्यात त्यांनी मला पुन्हा हाक मारली.

''काय यमुताई?''

''श्याम, या पाटावर बस.''

''खायला का देता?''

''नाही.''

''मग काय?''

त्या काही बोलल्या नाहीत. बाहेर जाऊन त्यांनी तुळशीपत्र आणले. त्यांनी कपाट उघडून त्यातून पैसे काढले.

‘‘श्याम, हात कर पुढे.’’

मी हात पुढे केला. पंधरा रुपयांचे दान त्यांनी माझ्या हातावर सोडले.

‘‘यमुताई, मी का भटजी आहे?’’

‘‘श्याम, तू विद्यार्थी आहेस. गरीब आहेस. होतील तुला फीला, पुस्तकांना. गरीब विद्यार्थी म्हणजेच सत्पात्र.’’

मी ते दान घेऊन निघालो. मी फीच्या चिंतेत होतो. देवाने माझी चिंता दूर केली. यमुताईंना माझी अडचण काय माहीत? त्यांनी ते दान सहज दिले. परंतु मला अगदी वेळेवर मदत झाली. केवळ योगायोगानेच या गोष्टी होतात का?

यमुताई पुढे वरचेवर आजारी पडू लागल्या. त्यांचेकडील वार मी सोडला. त्यांची बहीण त्यांच्या शुश्रुषेसाठी लांबून आली होती. मधून मधून मी यमुताईंना भेटत असे. त्यांचा आशीर्वाद घेत असे. त्यांचे गोड प्रेमळ शब्द ऐकत असे. काही खाऊ घेऊन जात असे. आमची परीक्षा असली म्हणजे मी यमुताईंना प्रणाम करून जात असे. त्या एखादे देवावरचे फूल देत. एखादी दुर्वा देत.

यमुताई बऱ्याच आजारी झाल्या. त्या वेळेस मी कॉलेजच्या शेवटच्या वर्षात होतो. त्या वेळेस मी एकटाच एका जागेत राहात होतो. वार नसेल त्या दिवशी कधी हातानेही जेवण करीत असे. पुन्हा संक्रांतीचाच तो दिवस होता. यमुताईंना तिळगूळ देण्यासाठी जावे असे सारखे मनात येत होते. त्या दिवशी माझा वार नव्हता. जेवून मगच जावे असे मनात आले. मी कुंड पेटवले. तांदूळ धुतले. भात ठेवला. भात शिजेपर्यंत वाचीत बसलो.

मी भात उतरला. आता जेवायचे. परंतु पुन्हा मनात आले आधी जेवू नये. आधी यमुताईकडे जाऊन यावे. मग रात्री येऊन शांतपणे जेवावे. मी घेतलेले ताट उचलून ठेवले. पुन्हा भात बाजूस ठेवला. माझी जणू घाई झाली होती. मी एकदम निघालो. बाहेर रस्त्यावर आलो तो खिशातील नोट नाही. कोठे गेली नोट? मी चुलीजवळ आलो. तेथे भाताची पेज वगैरे सांडली होती; ती चुलीत ढकलण्यासाठी कुंडाच्या खाली ढकलण्यासाठी त्या नोटेचा मी उपयोग केला होता! ती तेथे होती. कुंडात गेली नव्हती. पेजेने लडबडली होती. मी ती नोट पुसून खिशात ठेवली. धावपळ करीत यमुताईकडे निघालो.

झालेला भात न जेवता धावतपळत मी यमुताईंकडे का बरे जात होतो? कोण मला नेत होते, कोण ओढीत होते, कोण बोलावीत होते? मला काय माहीत? त्यांच्याकडे मी बरेच दिवसांत गेलो नव्हतो. मला लाज वाटत होती. इतक्या दिवसांत गेलो नाही. त्यामुळे मन खात होते. कशी असेल त्यांची प्रकृती? बोलतील का, बसतील का? मनात नाना विचार येत होते.

''यमुताईंचे घर आले, त्यांना झोप का लागली आहे?''

''त्या आत आहेत. जा आत श्याम व त्यांना द्या तिळगूळ. थोड्या वेळापूर्वीच त्यांचे भाचे आले होते. तिळगूळ देऊन गेले. तुम्हीही जा हो आत.''

मी आत गेलो. यमुताई अंथरुणावर होत्या. भाच्यांनी दिलेला तिळगूळ तेथे होता. मी तेथे उभा होतो. नंतर खाली बसलो.

''यमुताई'' मी हळूच हाक मारली; परंतु ओ नाही. हालचाल नाही. काही नाही. मी पुन्हा हाक मारली, मोठ्याने हाक मारली. तरी काही नाही.

''यमुताई तर बोलत नाहीत. तुम्ही या ना आत.'' मी घाबरून त्यांच्या बहिणींना म्हटले. त्या आत आल्या. त्यांनी पाहिले तो काही नाही. यमुताईंनी राम म्हटला होता.

''श्याम, तुझा कोट काढ. आपण यमुताईंना खाली घेऊ. त्यांचे ते दर्भासन मांड.'' बहीण शांतपणे सांगत होती.

यमुताईंसाठी घोंगडी पसरली. त्यावर ते दर्भासन ठेवले. त्यावर यमुताईंचा तो मृत देह त्यांची बहीण व मी दोघांनी उचलून ठेवला. तुळशीपत्र आणून मी त्यांच्या ओठांवर ठेवले. त्यांच्या गळ्यात त्यांची माळ घातली. आता मला रडू आले. यमुताईंच्या नातलगांकडे बातमी पाठविली. मंडळी आली. यमुताईंच्या देहाला अग्नी दिला गेला.

यमुताई गेल्या. संक्रांतीच्या दिवशी त्यांनी संक्रमण केले, महान संक्रमण केले. उत्तरायण लागताच त्यांनी देह ठेवला. मी तिळगूळ देण्यासाठी आलो होतो. यमुताईंचे दोन शब्द ऐकण्यासाठी आलो होतो. त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी आलो होतो; परंतु तिळगूळ देण्याघेण्याऐवजी त्यांचा देह मला खाली घ्यावा लागला. त्यांच्या मरणाची वार्ता सर्वांना कळवावी लागली.

''श्याम, यमुताईंचा तुमच्यावर लोभ होता; म्हणून तुम्ही शेवटी आलात. दर्भासन मांडायला तुम्ही आलात. ती तुळशीची माळ त्यांच्या गळ्यात घालायला तुम्ही

आलात. तोंडावर तुळशीपत्र ठेवायला तुम्ही आलेत. वेळेवर आलात.'' यमुताईंची बहीण म्हणाली.

''मी जेवून येणार होतो; परंतु जेवत बसलो असतो तर यमुताईंचा पार्थिव देह दृष्टीस पडता ना. ती नोट धुंडीत बसलो नसतो तर कदाचित् शेवटचा शब्दही मला ऐकायला मिळाला असता. त्या नोटेच्या मोहात मी पडलो. भात शिजवलेला न जेवता मी आलो. जणू मला आतून कोणी बोलावीत होते. यमुताईंचा आत्मा का बोलावीत होता? हा सारा योगायोग कीं याच्या पाठीमागे काही धागेदोरे आहेत? जिवाची जिवाला भेट आहे? काही असो. यमुताई गेल्या. त्यांची पवित्र आठवण हीच आता माझी पुंजी.'' असे मी म्हटले.

यमुताईंची मला कितीदा तरी आठवण येते. ती पवित्र वृद्ध तपस्विनी डोळ्यांसमोर येते. त्यांचे माझ्यावर प्रेम, माझ्यावर लोभ, त्याला मी पात्र नव्हतो; परंतु देव मला दुनियेचे प्रेम देत होता. अनंत हातांनी देत होता. तरीही हा श्याम जगाला कंटाळतोच. जगाने मला फार दिले, मी जगाला काय देऊ या कृतज्ञ विचाराने मी कंटाळतो. कृतघ्नतेने नव्हे.

+++

बालवीर चळवळ

पुण्याला त्या वेळेस नुकतीच बालवीर चळवळ सुरू झाली होती. हिंदुस्थानात ही चळवळ डॉ. ॲनी बेझंट यांनी आणली. मद्रासकडचे या चळवळीचे एक पुरस्कर्ते पुण्यास आले होते. त्यांनी या चळवळीवर व्याख्यान दिले. व्याख्यानानंतर त्यांनी ही चळवळ चालवू पाहणाऱ्यांसाठी एक वर्ग काढला. त्या वर्गात मी गेलो नव्हतो. हळूहळू या वर्गात जे दाखल झाले होते, त्यांनी पुण्यामध्ये ही चळवळ पसरविण्यास प्रारंभ केला.

पुण्याला दत्तोपंत जोशी हल्ली आहेत. महाराष्ट्रात बालवीर चळवळीला त्यांनी सारे जीवन दिले आहे. ते इंग्लंडमध्ये वगैरे जाऊन आले आहेत. या चळवळीचा त्यांनी नीट अभ्यास केला आहे. त्यांनी पुण्यास बालवीरांसाठी वर्ग सुरू केला. ते त्या वेळेस कॉलेजमध्ये शिकतच होते. ते चांगले वक्ते होते. चळवळे होते. वक्तृत्वोत्तेजक समारंभास त्यांना बक्षीस मिळावयाचेच.

त्यांचे जोडीदार नातू म्हणून होते. हल्ली ते पुण्यास डॉक्टर मो. ना. नातू म्हणून प्रसिद्ध आहेत. टिळक विद्यापीठाच्या आयुर्वेद महाविद्यालयात ते निर्वेतन शिकवीत

असतात. उत्साही, उदार, सदैव उद्योगरत्न असे हे डॉक्टर नातू आहेत. ते अत्यंत साधे आहेत. व्यायामविषयक चळवळीत ते भाग घेतात. देशातील मुले उत्साही, चपळ, महत्त्वाकांक्षी, पुढे जाऊ पाहणारी अशी व्हावीत असे त्यांना फार वाटते.

जोशी व नातू त्यांच्या वर्गात मी माझे नाव दिले. आमचे शिवाजी पथक होते. कॉलेजमधील फारशी मुले यात नव्हती. हायस्कूलातील मुले बरीच होती. शहरात दुसरीही पथके निघाली. आमचे पथक वाढत होते. कितीतरी मुले येऊ लागली. सायंकाळी आम्ही नूतन मराठीच्या मधल्या जागेत किंवा कधी भारत सेवक समाजाच्या तिकडे मैदानात खेळण्यासाठी, कवायतीसाठी, शिक्षणासाठी जमत असू.

बालवीर चळवळ ही मुलांच्या सर्वांगीण विकासाची चळवळ आहे. ही चळवळ मुळात दक्षिण आफ्रिकेत बोअर युद्धाचे वेळेस निघाली. लढाईत निरोप पोहोचविणे, शत्रूचा मार्ग शोधून काढणे, नाना प्रकारची कामे तरुण करू लागले. त्या कामांसाठी तरुणांना शिक्षण देण्यात येऊ लागले. त्या लढाईत या तरुणांनी आश्चर्यकारक काम बजाविले. लढाईनंतर या शिक्षणपद्धतीस व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला गेला. जीवन म्हणजे लढाईच आहे. नित्य धडपड आहे. या लढाईसाठी उत्कृष्ट नागरिक तयार व्हावेत म्हणून ही चळवळ उभारली गेली.

शहरातील शिक्षण दिवसेंदिवस एकांगी होत चालले आहे. साध्या साध्या गोष्टीही मुलांना माहीत नसतात. झाडांची माहिती नसते; पक्ष्यांची, पशूंची माहिती नसते; दोरीला गाठ कशी द्यावी हेही माहीत नसते. साधी झोपडी कशी उभारावी, झाडावर कसे चढावे, आकाशातील तारे कसे ओळखावे, त्यांच्यावरून दिशा व वेळ कशी ओळखावीत, आम्हाला काही माहीत नसते. निरनिराळे सुंदर सुंदर खेळ तेही आम्ही विसरत चाललो. बंधुभाव, सहकार्य, उत्साह, चपळता नाना प्रकारचे राष्ट्रीय सद्गुण त्यांचाही लोप होत चालला. भीती तर मैत्रीण झाली. साहस लोपले. पराक्रम संपला. जीवनात सत्याला थारा नाही, श्रद्धेला वाव नाही. स्वावलंबन नष्ट झाले. दुसऱ्यास साहाय्य करण्याची वृत्ती मेली. फाजील घमेंड व अहंकार जीवनात शिरली. नम्रता नाहीशी झाली. सर्वांशी भांडणे. उधळपट्टीची सवय झाली. बोलण्यात, विचारात, कृतीत पवित्र्य राहिले नाही. ना ज्ञानाची तहान, ना पराक्रमाची. जीवनाला जणू अर्थच उरला नाही.

एका अमेरिकन कवीची मी एक कविता वाचली होती. त्या कवितेत एक मुलगा म्हणतो, ''मला अमुक येत नाही, तमुक येत नाही असे मास्तर सारखे म्हणतात; परंतु

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

मला येते ते मास्तरांना येते का? झाडांना कोणत्या ऋतूत बहर येतात, गुलाब कधी फुलतात, जाईजुई कधी फुलतात आहे का त्यांना माहीत? आपल्या गावच्या नदीचे पाणी कोठे खोल, कोठे उथळ आहे हे आहे का त्यांना माहीत? त्यांना पक्ष्यांची नावे येतील का सांगता? निरनिराळे पक्षी कधी व किती अंडी घालतात हे सांगतील का मास्तर? ते माझ्याप्रमाणे पोहतील का, झाडावर झपझप चढतील का, त्यांना चाकूला धार लावता येते का? गाईची धार काढता येते का? काय येते त्यांना? त्यांच्या परीक्षेत मी नापास होत असेन; परंतु माझ्या परीक्षेत तेही नापास होतील.'' अशा आशयाची ती कविता होती.

शिक्षण असे विशाल हवे. जीवनाशी संबद्ध असे हवे. शाळेतील उणिवा भरून काढण्यासाठी बालवीर चळवळ आली. शाळेतील शिक्षणातील अपूर्णता दूर करण्यासाठी बालवीर चळवळ आली. मला ही चळवळ आवडू लागली. आमचा एक गणवेष होता. मी तो केला. खाकी शर्ट व पँट केली. डोक्याला आम्ही हिरवा मंदिल बांधित असू. पाठीवर त्याचा शेपटा सोडीत असू. जणू मराठे स्वारच. मला डोक्याला हिरवा पटका बांधता येईना. परंतु हळूहळू बांधता येऊ लागला. तो पोषाख करून मी जाऊ लागलो. श्याम हिरवा पटका बांधून जाऊ लागला. याशिवाय आणखी आमच्याजवळ एक शिटी असे. हातात काठी असे. गळ्याभोवती चौकोनी रुमाल गळगाठीप्रमाणे (नेकटायप्रमाणे) बांधलेला असे. या सर्व पोषाखाचा उपयोग असे. कोणी पडला तर काठ्यांचा लगेच स्ट्रेचर करता येतो. डोक्याचा पटका त्या काठ्यांभोवती गुंडाळता येतो. गळ्याभोवती असणारा रुमाल जखमेवर वगैरे बांधता येतो. एखाद्या झाडावरून उतरायचे झाले, एखाद्या टेकडीवर चढायचे झाले, विहिरीत उतरायचे झाले, पाणी काढायचे झाले तर डोकीचा पटका काढावा, उपयोग करावा. एका पटक्याला दुसऱ्याचा पटका बांधावा. मारवाडी लोकांची पागोटी किती लांब असतात? जणू दोन बोट रुंदीची ती शंभर हात दोरीच असते. मारवाडात पाणी खोल. डोक्याचे पागोटे सोडावे, त्याला लोटा बांधावा, पाणी काढावे व प्यावे.

आम्हाला या पोषाखाचा उपयोग काय ते सांगण्यात येई. केवळ ऐटीने मिरवण्यासाठी तो पोषाख नव्हता. त्यात उपयुक्तताही होती. अर्थात् पोषाख दिसेही छान. महाराष्ट्राचा पटका तर खुलून दिसे. आम्हाला प्रथमोपचाराचे शिक्षण देण्यासाठी डॉ. व्ही. सी. गोखले येत असत. आम्हाला ताऱ्यांची माहिती देण्यासाठी

आमच्या कॉलेजच्या प्रिन्सिपॉलसाहेबांचे चिरंजीव येत असत. आम्ही नूतन मराठीच्या गच्चीवर जमत असू. तेथून वर अनंत आकाशात अनंत तारे दिसत. भारताचा सारा इतिहास वर रंगवून ठेवला आहे. डोक्यावर आशीर्वाद देण्यासाठी पूर्वज आहेत. तो ध्रुव वर आहे, ते सप्तर्षी आहेत, ययाती-शर्मिष्ठा आहेत, ते सत्यवचनी मृग तेथे आहेत. तो श्रावण आईबापांना कावडीत घालून नेणारा तेथे आहे. ते प्रोफेसर आपटे आम्हाला ताऱ्यांची माहिती सांगताना रंगत. खेड्यातील वृद्ध माणसांना ताऱ्यांची किती माहिती! परंतु आम्हाला एक चंद्र ओळखता येतो. बाकीच्यांची माहिती शून्य. महात्माजी येरवड्याच्या तुरुंगात असताना आकाशातील हे देवाचे काव्य अभ्यासू लागले, चाखू लागले. आकाशातील ताऱ्याचे महान् उपासक श्री. काकासाहेब कालेलकर तेथे होते. महात्माजी तुरुंगातून आश्रमातील मुलांना ताऱ्यासंबंधी पत्रे लिहू लागले. महापुरुषांना नेहमी नवीन नवीन शिकायला आहेच. सृष्टी अनंत आहे. त्यांना जीवनाचा कोठेही कंटाळा येत नाही.

आपण आकाशाकडे कधी पाहातही नाही. प्रभातकाळी अद्याप झुंजुमुंजू आहे तो कशी मौज असते त्याचा आपणास अनुभव नाही. आकाशात आता थोडे ठळक ठळक तारे दिसत असतात. महाकवी मुक्तेश्वरांनी म्हटले आहे, "तो अरुणहंस येत आहे. त्याने आकाशातील तारारूपी मौक्तिकांचा फराळ चालविला आहे. आता थोडेसेच मोती शिल्लक आहेत. तेही तो खाईल." हळूहळू तारे जातात. पूर्वेकडे रंग पसरतात. किती प्रसन्न शोभा. परंतु आपण कधी पाहतो का? रात्री आकाशात ताऱ्यांची अमर व मनोरम मौज दिसते; परंतु कोण बघतो? दिवसा थकलेल्या जनतेच्या डोळ्यांना आनंद देण्यासाठी देव वर फुलबाग फुलवितो; परंतु आपण डोळ्यांना दिपवणाऱ्या झगझगीत बोलपटांनाच जाऊ. बोलपट पाहा; परंतु ईश्वराचाही हा मूक चित्रपट पाहा.

प्रथमोपचार आम्ही शिकलो. तारे ओळखायला शिकलो. कधी ते दुर्बिणीतून पाहिले. नंतर निशाणांनी, शिट्टीच्या आवाजांनी व प्रकाशात दूरच्या लोकांस संदेश द्यावयास आम्ही शिकलो. एकजण पर्वतीवर उभा. एकजण नूतन मराठीच्या गच्चीवर उभा. इकडून एकाने निशाणाच्या खुणांनी संदेश कळविला. त्याने तिकडे तो बरोबर ओळखला; परंतु निशाणे आपण दिवसा पाहू. उजेड असताना व मध्ये काही आड नसेल तर पाहू; परंतु तशी परिस्थिती नसेल तर? तर मग शिट्टीच्या आवाजाने संदेश

कळवायचा. तारायंत्रात जशाप्रमाणे पद्धत आहे तशीच शिट्टीत. बॅटरीच्या साहाय्यानेही संदेश द्यावयास आम्ही शिकलो.

अशी उपयुक्त विद्या आम्ही मिळवीत होतो. त्याच्या जोडीला दोऱ्यांना गाठी कशा बांधाव्या, तात्पुरती झोपडी कशी उभारावी, आगीतून माणसांना कसे बाहेर काढावे तेही शिकत होतो. झाडाची किंवा इमारतीची उंची कशी काढावी, तात्पुरते पूल कसे बांधावे हेही आम्ही शिकलो. नाना गोष्टी शिकत होतो.

नवीन नवीन खेळ आम्ही खेळत असू, प्रामाणिकपणा वाढवणारे खेळ, दक्षतेचे खेळ, स्मरणाचे खेळ. आमचे जोशी मोठे हुशार. ते फार चपळ. नाना प्रकारचे खेळ ते शिकवावयाचे. पाठीला हात लागला की त्याने बाजूस व्हायचे असा एक खेळ मजेचा होता. दोन्ही पक्ष एकमेकांत मिसळत. एकमेकांच्या पाठीस हात लावायचा. ज्याच्या लागला असेल त्याने प्रामाणिकपणे बसायचे. हा खेळ प्रामाणिकपणावर उभारलेला होता. तर ''राम म्हणतो खाली बस, राम म्हणतो ऊठ'' हा खेळ मनाच्या दक्षतेचा होता. नुसते 'बस' म्हटले तर बसायचे नाही. ''राम म्हणतो बस'' की बसायचे. मोठा मजेदार खेळ. असे खेळ खेळताना गंमत होई. हुतुतू तर होताच. नातू छान खेळत आणि तो भिडे म्हणून मुलगा होता-काय छान खेळायचा तो!

मी कॉलेजमध्ये होतो; परंतु या मुलांशी मी एकरूप झालो. करी, परचुरे, भिडे, जेजुरीकर किती तरी हायस्कूलमधली मुले माझ्या ओळखीची झाली. आम्ही आमच्या पथकाचे एक हस्तलिखित मासिक सुरू केले. मी त्यात पुष्कळ लिहीत असे. वनसंचारावर मी एकदा लिहिले होते. आमच्या पथकातील मुले नापास होऊ नयेत म्हणूनही खटपट केली जाई. काही मुलांस मी संस्कृत व इंग्रजी शिकवीत असे. मराठीही समजावून देत असे. आमची वक्तृत्वोत्तेजक सभाही होती. त्यात आम्ही निरनिराळ्या विषयांवर बोलत असू.

आम्ही निरनिराळ्या पेठांत राहात असू. त्या त्या पेठातील बालवीरांनी एकमेकांस पहाटे जाऊन उठवायचे असा प्रघात आम्ही सुरू केला. एकेकाची एकेक आठवडाभर पाळी असे. त्या आठवड्यात त्याने आपल्या पेठेतील बालवीरांना पहाटे उठवायचे. भिडे व मी आम्ही दोघे पहाटे पळायला जाण्याचा अभ्यास सुरू केला. आम्ही दोघे नूतन मराठीच्या अंगणातून पळत निघत असू, शेतकी कॉलेजपर्यंत

आम्ही पळत जात असू. लगेच परत फिरून पुन्हा नूतन मराठीपर्यंत पळत येत असू. मग लिंबू चोखून खात असू.

आम्ही पळत असताना कधी कधी कुत्री अंगावर भुंकत येत व तीही आमच्या बरोबर पळू लागत. पळताना आमच्या डोळ्यांतून पाणी येऊ लागे व पुढचे दिसेनासे होई. नाकालाही धार लागे. काही पेन्शनर मंडळी लकडी पुलावरून हळूहळू पोषाखात गुरफटलेली जाताना दिसायची. हॅम्लेट नाटकातील भुताचीच त्यांना पाहून आठवण होई; परंतु वृद्धपणातील त्यांच्या नियमितपणाला प्रणाम. जीवनाची देणगी जपून वापरली पाहिजे. ती जपून वापरणाऱ्यांविषयी आदरच वाटला पाहिजे.

आमच्या अनेक बाबतीत परीक्षा घेतल्या जात. स्मरणशक्तीची परीक्षा घेतली जाई. नाना प्रकारचे जिन्नस एके ठिकाणी ठेवायचे. ते एक मिनिटभर पाहू द्यावयाचे. मग त्यांच्यावर झाकण घालायचे आणि त्या जिनसांची नावे आपण स्मरणाने लिहून काढावयाची. बारा मिनिटांत मैलभर चालणे. स्वत:च्या श्रमाने निदान आठ आणे मिळविणे. एका आगकाडीने विस्तव पेटवून स्वयंपाक तयार करणे अशा अनेक परीक्षा असत.

आम्हाला आमची दैनंदिनी लिहावी लागे. रोज एक तरी सत्कृत्य त्या डायरीत असले पाहिजे. सत्कृत्ये धुंडाळायला नकोत. चांगल्या गोष्टी करण्याची संधी पदोपदी असते. मी लकडी पुलाजवळ सकाळच्या वेळी खेड्यातून गाणी म्हणत येणाऱ्या ओझीवाल्या बायका विसावा घेत, त्यांच्या डोक्यावर त्या टोपल्या पुन्हा देण्यासाठी जात असे. म्हणजे डायरीत लिहायला झाले. प्रथम सत्कृत्य करण्याची संधी शोधावी लागे; परंतु पुढे डोळे आले. रस्त्यात काचा पडलेल्या असतात. त्या उचलून म्युनिसिपालिटीच्या पेटीत टाकणे; सार्वजनिक पाण्याचा नळ तसाच मोकळा कोणी सोडतात, तो बंद करणे; रस्त्यात कोणाच्या हातून धान्य किंवा काही सांडले तर ते गोळा करायला त्याला मदत करणे; कचरा असेल तो दूर करणे; कोणाला औषध आणून देणे; कोणी पडला तर त्याला उचलणे कितीतरी गोष्टी असतात.

आम्हाला वनसंचाराची सर्वांत मौज वाटे. रोज उठून शहरात राहणे. कधीतरी दाट जंगलात जावे, सृष्टीच्या निर्मळ सान्निध्यात असावे, विशाल सौंदर्य पाहावे. शहरातील सौंदर्य म्हणजे छाटलेले अन् कापलेले. शहरातील बागा बघा, तेथली झाडे बघा. झाडांना आकाशाला भेटण्याची परवानगी नाही. त्या झाडांना नाना प्रकारचे

आकार देतील, छाटतील, कापतील. परंतु घनदाट जंगलात जा. तेथील सौंदर्यात अनंतता असते, भव्यता असते. ते सौंदर्य स्तब्ध करते, गंभीर करते.

आम्ही बालवीर कधी कधी वनविहाराला जात असू. बरोबर शिधासामुग्री नेत असू. रानात गेल्यावर तेथे झोपड्या बांधीत असू. निरनिराळ्या कामांसाठी तुकड्या पाडीत असू. जळण गोळा करणारी तुकडी, पाणी आणणारी तुकडी, पाने आणून पत्रावळी लावणारी तुकडी, धान्य निवडणारी व भाजी चिरणारी तुकडी, स्वयंपाक करणारी तुकडी, पहारा करणारी तुकडी, साफसफाई करणारी तुकडी अशा तुकड्या पाडल्या जात. सारे आपापल्या कामाला लागत.

एकदा असेच आम्ही वनविहाराला गेलो होतो. स्वयंपाक मला चांगला येतो असे मी सांगितले. स्वयंपाक करणाऱ्या तुकडीत मी दाखल झालो. चुला पेटवला. आधण ठेवले. मी घरी चार माणसांचा भात नीट करीत असे; परंतु चाळीस माणसांचा कसा करायचा? त्याचा अनुभव नव्हता. तांदळाच्या वर चार बोटे पाणी असले म्हणजे झाले. या नियमाप्रमाणे त्या मोठ्या पातेल्यात मी तांदूळ व पाणी ठेवले. परंतु पातेले दाटले. भात शिजेना. दुसऱ्या पातेल्यात उपसून काढावा लागला. कसातरी भात तयार झाला. थोडा थोडा कच्चाच राहिला. इतर कामे करणारी मुले भुकेली. परंतु माझा भात होतच होता, माझी मान खाली झाली, स्वयंपाक करण्याचा गर्व जिरला. मला रडू येऊ लागले.

''श्याम, अरे रडतोस काय? जरा कच्चा भातच बरा. तो भूक धरून असतो. पुन्हा दुपारी खेळायचे आहे. टेकडी सर करण्याचा खेळ. सारे पचून जाईल. ये. आपण वाढू.'' भिडे म्हणाला.

''बालवीर रडत नाही. तो नेहमी स्मितमुख असतो असे आपल्या नियमात आहे.'' करी म्हणाला.

''चुकले तरीही का हसतमुख राहायचे!'' मी विचारले.

''मुद्दाम चूक थोडीच झाली. अनुभवानेच शिकायचे.'' भिडे म्हणाला.

पत्रावळी मांडण्यात आल्या. सर्व भाताचा फन्ना उडाला. भांडी घासण्यात आली. स्वच्छता करण्यात आली. नंतर गाणी, नकला, वेणुवादन वगैरे कार्यक्रम झाले. भिडे हा फारच सुंदर वेणू वाजवी. मी कुत्र्याप्रमाणे भुंकलो व मांजराप्रमाणे गुरगुरलो.

मग आम्ही खेळलो. दोन तुकड्या केल्या. एक तुकडीने टेकडीवर निशाण रोवून त्या निशाणाचा सांभाळ करायचा. दुसऱ्या तुकडीने ते निशाण जिंकून

घ्यावयाचे. टेकडीवर हल्ला चढवायचा. एक प्रकारची लुटुपुटीची लढाईच ती. टेकडीवर बालवीर चढले. निशाण रोवण्यात आले. शिट्टी झाली. दुसरी तुकडी वर चढू लागली. दुसऱ्या तुकडीने निरनिराळ्या टोळ्या पाडल्या. लढाई ऐन रंगात आली की, एकदम एका टोळीने नव्या दमाने जयघोष करीत यावे असे ठरले. झोंबाझोंबी चांगलीच झाली. कोणाला लागले, कोणी पडले, कोणाचे खरचटले; परंतु सर्वांना जसा वीररस चढला होता. खूपच दंगल झाली. शिट्टी वाजली. खेळ संपला.

सूर्यास्त होत आला. आम्ही झोपड्यांतून परत आलो. रात्री खाण्याचा कार्यक्रम नव्हता. पहारे नेमले गेले. दोन दोन तासांचा एकेका टोळीला पहारा होता. रात्री गोष्टी सांगण्याचा कार्यक्रम झाला. मी जावईबुवांच्या गमतीच्या गोष्टी सांगून सर्वांना पोट धरून हसायला लावले.

आमच्या पथकनायकाने सर्वांना एकेक कोयनेलची गोळी दिली. ''कच्चा भात होता. रानचे पाणी होते. जपून असणे बरे.'' असे ते म्हणाले. आम्ही झोपी गेलो; परंतु मध्यरात्री एक मौज झाली. बारा ते दोन ज्यांचा पहारा होता ते ज़रा भित्रे होते. हातात काठी घेऊन ते फेऱ्या घालीत होते. आमच्या नायकाने हळूच बाजूला जाऊन काही विचित्र आवाज काढला. मी जागा होतो. तो आवाज ऐकून मलाही भीती वाटली.

ती मुले घाबरली. ती सभोवती फिरेनाशी झाली. तो तो भयाण आवाज जवळ आल्यासारखे वाटले. नायकाने अंगावर घोंगडी घेतली. तो आता चतुष्पाद झाला. हे भीषण अस्वल की काय? पहारेकरी मुले आत आत येऊ लागली. तो या घोंगडीतील अस्वलाने एकाला ओढले. त्या मुलांनी किंकाळी फोडली. घोंगडीतून नायक हसत बाहेर पडला.

''अहारे भित्रे, असाच का पहारा करणार?'' ते म्हणाले.

''आम्हाला काय माहीत की तुम्ही होतात.'' ती मुले म्हणाली.

''माहीत असल्यावर पहारा काय करावयाचा? जवळ जायचे, पाहायचे; घोंगडी आहे, की अस्वल आहे, की काय आहे. भीती सोडणे हे पहिले मनुष्यत्वाचे चिन्ह. तुम्ही भित्रे आहात हे मला माहीत होते. आज निदान मध्यरात्री पहारा करायला उभे तरी राहिलात. अशीच हळूहळू भीती कमी होईल. मनाला शिकवू तसे मन होईल.'' नायक म्हणाला.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

आम्ही पहाटे उठून परत पुण्यास येणार होतो. सामानाची आवराआवर झाली. वळकट्या तयार झाल्या. शिट्टी वाजली. रांगेत सारे उभे राहिलो. दि कतार म्हणताच दोन रांगा झाल्या. निघाले बालवीर. गाणी म्हणत निघालो.

''हमारा भारत हमको जिंदगीसे प्यारा.'' हे गाणे प्रभातवेळेस स्फूर्ती देत होते. ''चल रे चल सब भारत संतान। मातृभूमी करे आव्हान'' हे गाणेही मोठे स्फूर्तिदायक होते. मधून मधून विनोदी गाणी होती.

आम्ही पुण्याला केव्हाच आलो. प्रभातवेळ, गाण्याचा ताल, मंद असा शीतल वारा, उत्साह यामुळे चालण्याचा श्रमही झाला नाही. वनविहार इतक्या लवकर आटोपला म्हणून आम्हाला वाईट वाटले. पुन्हा कधी जायचे, पुन्हा कधी जायचे असे सर्वजण विचारू लागले.

अशा त्या बालवीर चळवळीत मी होतो. त्या चळवळीत जी प्रतिज्ञा घ्यावी लागे त्यात, ''ईश्वर, देश व राजा यांच्याशी मी एकनिष्ठ राहीन, यांची सेवा करीन.'' असे शब्द असत. हिंदी बालवीर चळवळ स्वतंत्र नव्हती; परंतु आता तिच्यातून राजा वगैरे शब्द गेले आहेत. त्या वेळेसही ''प्रजेचे रंजन करील तो राजा, दुसरा राजा राजाच नव्हे; त्या ध्येयभूत राजाची सेवा आम्ही करू.'' असे मनाचे समाधान आम्ही करीत असू. परंतु आता ती अडचण राहिली नाही. नवीन शुद्ध राष्ट्रीय स्वरूपात आता बालवीर चळवळ उभारली जात आहे.

आज भारताला जातिभेद, धर्मभेद यांच्या पलीकडे जाऊन एकत्र आणणारी चळवळ पाहिजे आहे. धर्माधर्मांचा आज द्वेष लहान मुलांना शिकविला जात आहे. एकमेकांना शिव्याशाप देण्याचे शिक्षण मुलांना दिले जात आहे. हिंदू-मुसलमान, स्पृश्य अस्पृश्य सारे एकत्र येऊन खेळणार नाहीत का? एकत्र बसणार नाहीत का? एकत्र गाणी गाणार नाहीत का? एकत्र गोष्टी सांगणार नाहीत का? एकत्र जगणार नाहीत का? एकत्र मरणार नाहीत का?

शिक्षणाच्या मंदिरात तरी द्वेष नको. शुक्राचार्यांकडे देवांच्या गुरूचा मुलगा कच संजीवनी विद्या शिकायला गेला तर शुक्राचार्य त्याला हृदयाशी धरते झाले. हा शत्रूचा मुलगा ही भावना त्या दैत्यांच्या गुरूने ठेवली नाही. आमच्या शाळा महाशाळांतील गुरुजन तरी भारतीय ऐक्याचा मंत्र महोरात्र विद्यार्थ्यांसमोर ठेवतील का? सारे वातावरण निर्द्वेष ठेवण्याची खटपट करतील का? भारताचे दुर्दैव दूर व्हावे म्हणून श्रद्धेने झटतील का?

इस्लाम या शब्दाचा अर्थ शांती. हिंदू धर्माच्याही प्रत्येक मंत्राच्या शेवटी त्रिवार शांतीचा उच्चा असतो; परंतु आज या दोन्ही समाजांत परस्परांविषयी केवढी असहिष्णुता! सारे आग वाढवणारे. आग विझविणारा कोणीच नाही का? सारे तेल ओतणारे, शांतीचे मेघ आणणारे कोणीच नाहीत का?

बंगालच्या बाजूला 'ब्रतचारी' म्हणून सुंदर चळवळ वाढत आहे. आनंद, सहकार्य, सेवा, बंधुभाव यांची वाढ करणारी ती चळवळ आहे. माणुसकीचा रस्ता दाखविणारी ती सांस्कृतिक चळवळ आहे. महाराष्ट्रातही एखादी तशाच प्रकारची भ्रातृभाव वाढवणारी अशी तरुणांची चळवळ नाही का होणार? अशी निर्मळ संघटना नाही का कोणी करणार? महाराष्ट्रातील बालवीर चळवळीचे जनक श्री. दत्तोपंत जोशी धडपड करीत आहेत; परंतु आज जातीय वादांना भरती आली आहे. द्वेषाचे नगारे वाजविण्यात पुरुषार्थ वाटत आहे; परंतु द्वेष शमतील. जातीय वाद हटतील आणि मग भ्रातृभावाची देवाची चळवळ पुढे येईल. प्रभू करो व भारताचे ग्रहण सुटो, ऐक्याचा पूर्णचंद्र नटो.

✦✦✦

निष्ठुर श्याम

पुरुषोत्तमाला मी पुण्यास आणले होते. तो इंग्रजी शाळेत जात होता. त्याचे चांगले चालले होते. रामच्या घरीच तो जेवत असे. रामचा सर्वांत धाकटा भाऊ पुरुषोत्तमांच्या एक दोन वर्षे पुढे असेल. सुटी असली म्हणजे किंवा एखादे दिवशी रात्री आम्ही खेळत असू. मी बहुधा खेळला जात नसे. रामचे तिघे भाऊ, रामची आई व पी अशी खेळत. झब्बूने खेळत. कधी कधी कवड्यांनी खेळत.

पुरुषोत्तमाला आम्ही सर्वजण आता पी या नावानेच हाक मारीत असू. रामचे भाऊ चिडविण्याच्या बाबतीत कोणाला हार जायचे नाहीत. एखाद्याच्या पाठीस लागायचे त्यांनी ठरविले तर ते त्याला रडकुंडीस आणल्याशिवाय राहायचे नाहीत. ते भाऊ स्वत: एकमेकांसही चिडवीत. रामाचा धाकटा भाऊ फार चिडायचा; परंतु आता ते सारे पीला चिडवायचे. शेवटी खेळात पी रडू लागायचा.

मी वर वाचीत असे. खाली पीला सारखे चिडवीत आहेत ते मला कळे. मला राग येई. मी खोलीत चडफडे. मी एकदम पीला वर हाक मारून म्हणे, ‘‘जातोस कशाला त्यांच्याबरोबर खेळायला? आणि मग रडतोस का? जाऊच नये आपण. बसावे येथे

काही वाचीत.'' परंतु पीला ते पटत नसे. तो लहान होता. लहान मुले चिडतात, भांडतात, रडतात, परंतु पुन्हा खेळतातच.

मी स्वत: खेळात फार चिडतो. समजा, पत्त्याच्या खेळात सारखे पिसावे लागले किंवा डाव चांगला येईनासा झाला म्हणजे मला मेल्यासारखे होई, आणि बहुधा माझ्याकडे चांगला डाव कधी येत नसे. मी ज्याच्या बाजूचा भिडू असेन, त्या बाजूला बहुधा अपयश ठेवलेलेच; आणि रामाचा सर्वांत मोठा भाऊ हा चिडविणाऱ्यांचा अग्रणी. म्हणून मी हळूहळू घरात खेळणे बंद केले. एखादे वेळेस आईनेच बोलावले तर मी जात असे; परंतु एरव्ही नाही.

पी माझे थोडेच ऐकणार? पुन्हा रविवार आला की ते सारे पीला खेळायला ये म्हणत. तो जाई आणि शेवटी चिडाचिडी होई. खेळात असे चालायचेच. त्यांनी चिडविले तर आपण त्यांना चिडवले पाहिजे. हसण्यावारी नेले पाहिजे. गंमत केली पाहिजे. उत्तरास प्रत्युत्तर पटकन देता आले पाहिजे. खेळातही अनेक सद्‌गुण आपण शिकतो; सहनशीलता, आशावादीपणा, टीकेला तोंड देणे, अपयश आले तरी न खिजणे हे सारे शिकायला सापडते.

पीचा आवाज बरा होता. त्याला गायनाच्या वर्गात घालावे असे मला वाटले. महिना आठ आणे मला वाटते फी होती.

''पी, तू जाशील गायन शिकायला?'' मी विचारले.

''परंतु कोण शिकवील?'' त्याने विचारले.

''येथे गायनाचे वर्ग असतात. त्यातील एखाद्या वर्गात तुझं नाव घालीन; परंतु रोज गेले पाहिजे. अरे, आम्हाला कोणतीच कला नाही. मला गाता येत नाही, वाजवता येत नाही, चित्रकला येत नाही, नाट्यकला येत नाही, मी कलाशून्य आहे. दादालाही नाहीच काही शिकता आले. तू तरी शीक. एखादी कला शीक. मी वाटेल ते करीन परंतु तुला शिकवीन. शिकशील का पी? शीक.'' मी म्हटले.

''जाईन मी शिकायला.'' पी म्हणाला.

एके दिवशी पीला मी एका गायनाचे वर्गात नेले. तेथे नाना तऱ्हेची तंतुवाद्ये होती. तबला होता, पेटी होती, परंतु मी त्यांच्याकडे पाहात राहिलो. त्यांच्यामधून मला संगीत काढता आले नसते. मधुर बोल काढता आले नसते. ती कला माझ्या बोटांत नव्हती. मी दु:खाने माझी बोटे पिरगटली. ती मी चावली. फुकट ती बोटे असे वाटले.

पी व मी तेथे बसलो होतो. इतक्यात कोणीतरी आले. तेच व्यवस्थापक असे वाटले, नमस्कारचमत्कार झाले, आगमनाचा हेतू सांगितला. त्यांना आनंद झाला.

‘‘चांगले आहे. येत जा हा बाळ. अहो, प्रत्येकाला गाणे आले पाहिजे. थोडे नाही का येणार? सारेच काही गंधर्व नाही होणार; परंतु गुणगुण तर करतील की नाही?’’ ते म्हणाले.

‘‘ज्याला ती देणगी आहे त्यानेच शिकावे. सर्वांनाच सारे कसे साधेल? ज्याचा आवाज गोड आहे त्याने शिकावे.’’ मी म्हटले.

‘‘अहो, गोड आवाज नसलेलेसुद्धा प्रसिद्ध गवई झाले आहेत. आवाजही कमावता येतो. अगदी बत्थड गळा जरी असला तरी त्यालाही काही आकार देता येतो. प्रयत्न हवा, उत्कट इच्छा हवी.’’ ते म्हणाले.

‘‘खरे आहे तुमचे म्हणणे. हा येत जाईल. मी जातो. नमस्कार.’’ असे म्हणून मी निघून गेलो.

मी आनंदलो होतो. फार आनंदलो होतो. कर्तव्य केल्याचा तो आनंद होता. मी गरीब होतो. मला नाही काही शिकता आले. परंतु धाकटा भाऊ तरी शिकू दे. येऊ दे आमच्या घरात कला. पीला शिकवीन, तो हुशार आहे; माझे शिक्षण आणखी दोनअडीच वर्षांनी संपेल. पीला मग अडचण भासणार नाही. कला करू दे त्याला हस्तगत. वाजवू दे पेटी, शिकू दे सतार. असे विचार करीत मी चाललो होतो. जणू मस्त बनलो होतो.

संगीत ही खरोखरच अपूर्व कला आहे. संगीत जीवनाचा आत्मा आहे. सर्व सृष्टीत एक प्रकारचे संगीत आहे असे वाटते. जीवनातील विसंगती संगीताने नाहीशी होते. लहान मूल रडत असावे. त्याला जवळ घेऊन गाणे म्हणा. त्याची विसंगती, त्याची विकृती नाहीशी होते. त्याच्या जीवनात संगीत येते. रडणे थांबते.

सामवेद हा संगीताचा वेद. किती सुंदर नाव! सामवेद. संगीताने मनाची जणू साम्यावस्था प्राप्त होते. प्रचंड सभा असावी, तेथे गोंगाट असावा; परंतु एकदम एखादे गाणे कोणी म्हणावे. सारे गोंगाट बंद होतात. हजारो लोकांची मन:स्थिती एकरूप होते. सारे श्रोते एका समान भूमिकेवर जणू येतात. काय जादू आहे! केवढी शक्ती आहे!

आपण जन्मतो तेव्हा हे संगीत बरोबर घेऊन येतो. जसजसे आपण मोठे होतो तसतसे जीवनातील संगीत मरते. लहान मूल नादलुब्ध असते. तालबद्ध नाद त्याला

अधिकच गुंगवतो. पुण्याला एकदा रस्त्यात ''बाबांनो, दारू पिऊ नका, गटारात लोळू नका'' अशा लांब जाहिराती टांगलेल्या होत्या. मोठे लोक ती अक्षरे गद्यात वाचीत. परंतु एक लहान सात-आठ वर्षांचा मुलगा

''बाबांनो, दारू पिऊ नका,
गटारात लोळू नका.''

असे काव्यात-गाण्यात म्हणत गेला. त्याला साधे गद्य नाही आवडले. त्याने त्या गद्याला पंख दिले. कारण त्याला स्वतःला अद्याप पंख होते. त्याचे पंख परिस्थितीमुळे छाटले गेले नव्हते. अजून त्याचा आत्मा उडू शकत होता.

परंतु सर्वांत मोठे संगीत कोणते? संगीतज्ञ सात भिन्न सुरांतून मधुर संगीत निर्माण करतो. त्या सुरांवर संयम ठेवून, कमीजास्त करून प्रमाण साधून तो ते मधुर संगीत जगाला देतो. तो पेटीच्या सुरांतून संगीत काढतो. सतारीच्या नाना तारांतून मधुर बोल काढतो. जगाला डोलवतो. जड वस्तूंतून तो संगीत निर्माण करतो; परंतु जीवनातून संगीत कोण निर्माण करील?

आज हिंदुस्थानातच पाहा. नाना जातीचे, नाना धर्मांचे लोक आहेत. तसेच भिन्न भिन्न आर्थिक हितसंबंध असणारे लोक आहेत. सारखी भांडणे चालली आहेत.रोज उठून मारामारी. यांच्यात मेळ कोण घालणार? यांच्यातून संगीत कोण निर्मिणार? यांच्यातून संगीत उत्पन्न व्हावे म्हणून कोण खटपट करणार? ही जीवनाची कला कोण अभ्यासणार?

जीवनात संगीत उत्पन्न करू पाहणारा हा सर्वांत मोठा संगीतज्ञ. तो सर्वांत मोठा कलावान. एखाद्या विराट सभेत महात्माजी येऊन उभे राहू देत. एकदम सारे शांत होतात. ते गाणे म्हणत नाहीत. परंतु त्यांचे जीवन म्हणजे महान् गीत. त्यांचे दर्शन म्हणजेच सामवेद. ते थोर कलावान आहेत. ते जीवनातून संगीत निर्मू पाहात आहेत. सर्वांना संयम शिकवीत आहेत. तारा फार ताणू नका, तुटतील; असे सर्व प्रकारच्या लोकांना सांगत आहेत. भारतीय जीवनात ते रंग भरू पाहतात. भारतीय जीवन बेरंग झाले आहे. बेचव झाले आहे. बेसूर झाले आहे. या जीवनात रंग येवोत, जीवनात गोडी यावी, मेळ यावा म्हणून जे खटपट करतील ते खरे कलावान्, ते खरे संगीतज्ञ,ते खरे चित्रकार.

बाकीच्या कलावंतांनी या जीवनाच्या कलेला रंग देण्याची साथ केली पाहिजे. महात्माजी हिंदू-मुस्लीम ऐक्याचे संगीत निर्मू पाहात आहेत, तर मग आमच्या

गाणाऱ्यांनी हिंदू-मुस्लीम ऐक्याची गाणी म्हणावीत. शाहीरांनी प्रेमधर्माचे पोवाडे सर्वत्र न्यावे. चित्रकारांनी हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रसंग रंगवावे. वाङ्मयसेवकांनी हिंदू-मुस्लीम ऐक्याच्या कथा लिहाव्या. इतिहासज्ञांनी इतिहासातून हिंदू-मुस्लीम ऐक्याचे सारे प्रसंग शोधून ते सोने जनतेसमोर ठेवावे. बोलपटांनी त्या ऐक्याचे प्रसंग दाखववावे. अशा रीतीने जीवनाच्या कलेभोवती बाकीच्या कलांनी उभे राहावे. जीवनाची कला म्हणजे भगवान् सूर्यनारायण. तिच्याभोवती ग्रहोपग्रहांप्रमाणे बाकीच्या कलांनी सेवेसाठी उभे राहावे. जीवनाच्या कलेपासून त्यांनी प्रकाश घ्यावा व रंगावे.

माझ्या मनात एखादे वेळेस येते की, कोठे हिंदू-मुसलमानांचा दंगा चालला असला तर एकदम तेथे जाऊन

''है बहारे बाग दुनिया चंद रोज''

हे गाणे एखाद्या स्वर्गातून उतरलेल्या गंधर्वाप्रमाणे म्हणावे. कदाचित् मी मारला जाईन. माझ्या प्राणांची तंबोरी फुटेल, परंतु संगीताची खरी उपासना केली असे होईल. हुतात्मा गणेश शंकर विद्यार्थी अशा संगीताचे भक्त होते. ते संगीत तरी मला शिकू दे थोडेसे.

पुष्कळ वेळा कलावंतांचे संसार विफल दिसतात. सतारीतून गोड बोल काढणारा आपल्या मुलांच्या थोबाडीत मारून त्याला रडवतो. बैठकीत सर्वांना डोलवणारा घरात बायकोला सतावतो व छळतो. त्याला त्याच्या घरात संगीत निर्मिता येत नाही. तेथे प्रमाण साधता येत नाही. कुटुंबातील मंडळींच्या हृदयांच्या तारा कशा छेडाव्यात हे त्याला समजत नाही.

एखादा चित्रकार असतो. तो कलावान् असतो. सुंदर रंग तो भरतो. सुंदर आकृती रंगवतो. परंतु त्याची खोली अस्ताव्यस्त असेल, वस्तू नीट ठेवलेल्या नसतील, कचरा पडलेला असेल, कागदांचे तुकडे पडलेले असतील, खोलीत झुरळे असतील, भांडी स्वच्छ नसतील. असे का व्हावे? कदाचित् थोर कलावान् कलेच्या चिंतनात दंग असेल. एखादी कल्पना त्याला सुचली असेल व ती त्याच्या डोळ्यांसमोर असेल. एखाद्या आकाराचे दिव्य दर्शन त्याला झाले असेल व त्या आनंदात तो मग्न असेल. त्याच्या डोळ्यांना मग खोलीत कचरा दिसणार नाही, चिंध्या दिसणार नाहीत, कपडे दिसणार नाहीत. त्याला सर्वत्र सौंदर्यदर्शनच होत असेल. एक

परब्रह्मच दिसत असेल. सूर्याचे किरण काळ्या ढगांवर पडल्यामुळे ते काळे ढग जसे नयनमनोहर दिसू लागतात, त्यांना अद्‌भुत व अपूर्व सौंदर्यकला चढते. त्याप्रमाणे कलावंताच्या हृदयातील त्या नवदर्शनाचा प्रकाश आसपास पडून सारे प्रकाशमयच दिसू लागत असेल. त्याच्या ध्येयाचा स्पर्श जणू खोलीतील सर्व चराचरास होतो आणि सारे सुंदरच दिसते.

''त्वस्पर्श दिव्य होता,
मृत्कण होतील माणिक राशी''

याप्रमाणे त्याची स्थिती होत असेल.

परंतु कलावंताची ही भावावस्था काही वेळ असते. ती भावना ओसरली म्हणजे तरी त्याने आसपास सौंदर्य निर्मिले पाहिजे ना? सारे स्वच्छ ठेवले पाहिजे ना? आपल्या मुलांचा शेंबूड काढून त्यांची तोंडे प्रसन्न केली पाहिजेत ना? आपले टेबल पुसून स्वच्छ आरशासारखे केले पाहिजे ना? पाणी पिण्याचे भांडे घासून स्वच्छ केले पाहिजे ना?

कलांची उपासना जीवन कलामय करण्यासाठी करा. स्वतःचे जीवन व सर्व समाजाचे जीवन. स्वतःच्या मनातील गोंधळ दूर करूया. तेथे वेणुनाद होईल असे करूया. तेथील नाना स्वार्थी वासनाविकारांचा धांगडधिंगा बंद करूया. थोडक्यात हृषिकेश होण्याची पराकाष्ठा करूया.

श्रीकृष्णाचीच मुरली जगाला मोही कारण ते हृषिकेश होते. हृषिक म्हणजे इंद्रिय. ते इंद्रियांचे ईश होते. जो इंद्रियांचा स्वामी झाला तो जीवनाची कला शिकला. तो मग जगाची अधिक सेवा करील. श्रीकृष्ण जो शंख वाजवीत, त्या शंखाला पांचजन्य असे नाव होते. वेदांमध्ये 'पंचजन' असा उल्लेख येतो. हे पंचजन कोण? पुरु, त्रित्सू, अनु, यदु, तुर्वसू या पाच वंशांचे का लोक? पुरु हेच पुढे कुरू झाले. का चातुर्वर्ण्याबाहेरचे ते पाचवे? काही असो. श्रीकृष्णाचा शंख सर्व जनतेसाठी होता. सर्वांचे दुःख दूर करण्यासाठी होता. सर्व जगाला सुखमय करण्यासाठी तो होता.

ज्यांना सर्व लोकांच्या हितासाठी शंख वाजवायचा आहे, त्यासाठी झिजावयाचे आहे, त्याने स्वतःचे जीवन आधी सुंदर केले पाहिजे, स्वतःचा क्षुद्र स्वार्थ दूर ठेवला पाहिजे. तरच त्याच्या शंखवादनात शक्ती येईल. नाहीतर ते शुष्क शंख वाजवणे होईल.

गड्यांनो, मी हे सांगत आहे, परंतु माझ्या जीवनात काय आहे ? सारी माती व धूळ. कशाचा कशाशी मेळ नाही. माझे जीवन मला कलामय करता येत नाही; परंतु मी धडपडत आहे. थोडी प्रगती आहे. मी माझ्या धाकट्या भावाला गाणे शिकवायला पाठवले, परंतु त्यालाच मी एकदा रडवले. ज्याला कला शिकण्यासाठी पाठवले त्यालाच मी विकल केले. तो प्रसंग मी कधी विसरणार नाही. त्याची स्मृती येता च माझे डोळे भरून येतात. मला लाज वाटते. मोठा झाल्यावर व माझा धाकटा भाऊही मोठा झाल्यावर त्या प्रसंगाची त्याच्याजवळ मी क्षमा मागितली होती. कोणता तो प्रसंग ?

पी अद्याप लहान होता. कोकणात आई मेल्यावर तो दीड वर्ष होता. आई होती तेव्हा त्याला काही खाऊ वगैरे मिळे. शाळेत जाताना मुले ''काही तरी'' आईजवळ मागतात. एखादी खारीक, पेपरमिंटची वडी, चार शेंगांचे दाणे पुरते. आई खाऊ पुरवून ठेवी; परंतु आई गेल्यावर पीला कोणी दिला असेल का खाऊ? त्याने मागितला असेल का कोणापाशी?

पुण्याला रामच्या घरी खाऊची पद्धत नव्हती. एखादे वेळेस आईने वड्या वगैरे केल्या तर त्या सर्वांना मिळत. परंतु रोज शाळेत जाताना कोणी काही मागत नसे. पीला खाऊ वगैरेची आठवण येत असेल का असे माझ्याही मनात आले नाही.

एके दिवशी पी गायनाच्या वर्गातून परत येत होता. वर्ग संपला होता. मी बाहेर जात होतो. तो समोरून येत होता. तो काहीतरी खात खात येत होता. पी काय खात आहे असे माझ्या मनात आले. मला पाहाताच तो लाजला. तो जरा घाबरल्यासारखा दिसला. त्याने भीत भीत माझ्याकडे पाहिले.

''काय रे आहे खिशात? काय खातोस?'' मी विचारले.

पी बोलेना. मी त्याच्या खिशात हात घातला. ते फुटाणे होते.

''फुटाणे आहेत. कोणी दिले?'' मी विचारले.

पी बोलेना.

''सांग कोणी दिले? मित्राने? कोठून आणलेस?''

तो बोलेना. पीने घरातील पैसा चोरून नेला की काय? त्याचे फुटाणे घेतले की काय? मला वाईट वाटले. राग आला. परंतु मी रस्त्यात होतो. मला कामासाठी जायचे होते.

''जा घरी.'' असे म्हणून मी निघून गेलो.

परंतु फळीवरच्या दिडक्या काय झाल्या असे सायंकाळी आई म्हणू लागली. काही सुटे पैसे तेथे फळीवर असत किंवा तेथे एका बाटलीत असत. दिडक्या काय झाल्या? माझी मान खाली. पीने ते पैसे नेले असे नक्की वाटले.

खोलीत मी एकटाच होतो. पी हळूच खोलीत आला. तो आत येताच मी दार लावून घेतले व एकदम त्याला हात धरून ओढले.

"कोठून रे ते चणे आणलेस! फळीवरचे घेतलेस ना पैसे? बोल. सांग. नाहीतर बघ. येथे का चोरी करायला आलास? तुझ्या आण्णाची मान खाली करायला आलास? नेलेस की नाही पैसे? माझ्याजवळ मागितले का नाहीस? दिले नसते? बोल पुन्हा घेशील? घेशील?" लहान भावाला मी मारू लागलो. तो कावराबावरा झाला. तो मोठ्याने रडेना. खाली ऐकतील अशी त्याला भीती वाटली. आण्णा मारतो आहे हे लोकांना कळू नये म्हणून तो अश्रू आवरीत होता. अरेरे, माझ्यासाठी तो लहान भाऊ रडला नाही. अण्णाची अब्रू सांभाळण्यासाठी रडला नाही. आण्णा राक्षस आहे हे जगाला कळू नये म्हणून तो रडला नाही. श्यामला राम व त्याची भावंडे 'देव' म्हणत. परंतु श्याम दानव होता. श्याम सैतान होता. अद्यापही पुष्कळसा तसाच आहे. माझ्या जीवनाच्या तळाशी अपरंपार चिखलच साचलेला होता. कधी तो सारा उपसता येईल? देवाला माहीत.

माझा भाऊ भिंतीजवळ केविलवाणा बसला होता. त्याची त्यावेळची ती मुद्रा अद्याप माझ्यासमोर आहे. किती अगतिक, निराधार व दीनवाणी होती ती मुद्रा! किती करुण होती ती मुद्रा! मी त्याला पुन्हा पायाने लकटले, हातांनी गदगदा हलविले. मला वाटते मी त्याला लाथ मारली. श्यामची प्रेमळ मुद्रा त्या वेळेस वृकव्याघ्राची झाली होती. काम व क्रोध, द्वेष व मत्सर माणसांचे पशू करतात. माझे तोंड प्रथम माणसासारखे होते. क्रोध येताच ते वाघाचे झाले.

मी इतका कठोर कसा झालो? आम्हाला आई नव्हती. मी मोठा झालो होतो. परंतु पी लहान होता. त्याला आईची आठवण आली असेल. तो त्याच्या आण्णाजवळ राहायला आला. "आण्णा, मला ने. नाहीतर मी जीव देईन" असे त्याने लिहिले होते. परंतु आण्णा नरसिंहाचा अवतार होता. आपल्याला जगात मायेचे कोणी नाही असे माझ्या भावाला त्या वेळेस वाटले असेल! असे वाटणे याहून दुःख कोणते, निराशा कोणती?

मारून का काय होत असते? मी त्याची समजूत घातली पाहिजे होती, किंवा मीच त्याला काही आणून दिले पाहिजे होते, किंवा मी आपण होऊनच त्याला मधून मधून एखादी दिडकी दिली पाहिजे होती. मुलांना स्वत: घेऊन खावे असे वाटते. आपण स्वतंत्र आहोत असे त्या वेळेस त्यांना वाटते. परंतु मानसशास्त्राचा अभ्यास मी थोडाच केला होता? आणि मानसशास्त्राचा अभ्यास केलेले शिक्षक तरी काय करतात? परीक्षेसाठी मानसशास्त्र. त्याचा जीवनाशी संबंधच नाही. जीवनाशी छडीशास्त्र व शिव्याशास्त्र!

काही वेळ गेला. आम्ही बोललो नाही; परंतु मी शेवटी पीला पोटाशी धरले. पुन्हा मी त्याची आई झालो. पुन्हा मी त्याचा भाऊ झालो.

"पी, असे नको हो करू. मी इतकी वर्षे रामकडे आहे. परंतु कशाला हात नाही लावला. तू तसाच राहा. चांगला हो. समजलास ना? लोकांकडे चांगले नको का राहायला?"

असे मी त्याला जवळ घेऊन म्हटले. तो रडू लागला व मीही रडू लागलो. निर्मळ भातृप्रेमाचे अश्रू... पुन्हा सारे गोड झाले.

रात्री मी माझ्या त्या बुधवारच्या बागेत गेलो. लहानपणी मी पाच रुपयांची पाहुण्यांची नोट चोरली; परंतु आईने मारले नाही. "श्याम, ही शेवटचीच चोरी हो.' असे ती म्हणाली. पुढे मामांकडे शिकायला राहिलो तेथून पैसे घेऊन पळून गेलो. श्याम चोऱ्या करूनच वाढला होता, पळापळी करून वाढला होता. माझ्या भावाला मारण्याचा, त्याच्यावर रागावण्याचा मला काय अधिकार होता? मी त्याच्याहून लहानपणी वाईट होतो. असे विचार माझ्या मनात आले.

"श्याम, तू पाच रुपये चोरलेस तरी मी तुला मारले नाही. तुझ्या भावाने दिडकी घेतली तर का त्याला तू लाथांनी मारावेस?" असे आई वरून म्हणत असेल का? असा विचार माझ्या मनात आला. मी वर आकाशाकडे हात केले व म्हटले, "आई, पीला मी पुन्हा रडवणार नाही. आम्हा सर्वांना सद्‌बुद्धी दे."

+++

साने गुरुजी लिखित अनमोल ग्रंथसंपदा

अध्यापन कार्य, समाजसेवा, स्वातंत्र्ययुध्द अशा बहुविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे 'साने गुरुजी!' मातृभूमीच्या सेवेसाठी नोकरीचा राजीनामा देऊन स्वातंत्र्यसमरात त्यांनी स्वत:ला झोकून दिले आणि अखेरच्या श्वासापर्यंत जनतेच्या सुखासाठी झटत राहिले. समाजातील अस्पृश्यता नष्ट व्हावी, एकता निर्माण व्हावी, शेतकरी-कामकरी वर्गाचे दैन्य-दारिद्र्य दूर व्हावे व सर्वत्र समाजवादाची स्थापना व्हावी या हेतूने ते सर्वत्र जनजागृती करत राहिले. लहान मुले, स्त्रिया, तरुण, दीन-दलित यांना स्वत्त्वाची जाणीव व्हावी व उत्तमोत्तम विचारांची देणगी मिळावी यासाठी अत्यंत संस्कारक्षम असे साहित्य त्यांनी निर्माण केले.

आज साने गुरुजींसारखे उदात्त व्यक्तिमत्त्व आपल्यामध्ये नसले तरीही त्यांचा हा साहित्यरूपी अनमोल ठेवा आपल्याकडे आहे. अत्यंत सोप्या भाषेतील या बोधप्रद कथा, वैचारिक लेख, इतर भाषांमधील महान लेखकांचे अनुवादित साहित्य घरोघरी पोहोचावे या हेतूने साने गुरुजींची सर्व पुस्तके एकूण ५१ खंडामध्ये आम्ही आपणासमोर सादर करीत आहोत. महाराष्ट्रातील प्रत्येक घर गुरुजींच्या विचारांनी पावन व्हावे, हीच एकमेव इच्छा !

श्यामचा जीवनविकास

₹ 140

200019

e mail : riyapublications@gmail.com